फेब्रुवारी २०१९/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



## महाराष्ट्र ॲग्रीटेक प्रकल्प

## राज्यातील शेतकरी डिजिटल प्लॅटफॉर्मवर

# मराठी भाषा
## गौरव दिन



ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस.
हा दिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो.
त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन...

**आमुच्या मनामनात दंगते मराठी**
**आमुच्या रगारगात रंगते मराठी,**
**आमुच्या उराउरात स्पंदते मराठी**
**आमुच्या नसानसात नाचते मराठी...**

– सुरेश भट

# अंतरंग




## गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार... ६

मोठ्या धरणांची विस्थापक कल्पना सोडून 'जलयुक्त शिवार अभियाना'तून सिंचनाच्या कामी लोकसहभागाची नांदी झाली. त्यानंतरचा टप्पा म्हणजे धरणांच्या वा अन्य जलाशयांमधील गाळ काढून तो शेतजमिनीवर पसरण्याची मोहीम.. तीही यशस्वी होत असल्याचे हे शुभवर्तमान, 'दुष्काळमुक्ती'च्या स्वप्नपूर्तीची चाहूल देणारे आहे.

## मनमोकळा थेट संवाद ८

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 'लोकसंवाद' या कार्यक्रमाद्वारे नागरिकांशी थेट संवाद साधत आहेत. राज्यात पहिल्यांदाच असा उपक्रम अत्याधुनिक संपर्क माध्यमे (इंटरनेट, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग इ.) याद्वारे राबवण्यात येत असून आतापर्यंत या संवादाचे दोन भाग प्रक्षेपित झाले आहेत.

## स्वच्छता हीच सेवा... १२

१८ एप्रिल २०१८ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ग्रामीण महाराष्ट्र हागणदारीमुक्त घोषित केला. सर्वसामान्यांच्या अपार मेहनतीतून हे यश मिळाले. सर्व घटकांच्या एकत्रित प्रयत्नातून महाराष्ट्राने ही उज्ज्वल कामगिरी केली आहे!


गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार... ६
मनमोकळा थेट संवाद ८
स्वच्छता हीच सेवा... १२
स्वच्छ, शाश्वत आणि सुरक्षित पाणी १७
कमी खर्च, अधिक उत्पन्न २०
नवे तंत्र, गतिमान विकास... २२
पशुपालकांना संधी २४
श्रीमंत करणारी शेती २८
शेती विकासाचा डिजिटल अध्याय ३०
पीक विमा : बीडचे यश ३३
जीव धोक्यात घालू नका...३५
स्मार्ट शाळेची गोष्ट...३६
महाराष्ट्राची भरारी ३८
सायबर अभिशाप ४०
सुरक्षित कागदपत्रे, सुरक्षित समाज... ४२
विश्वासाची साखळी ४४
राज्यसेवेची तयारी ४६
इच्छाशक्तीला प्रयत्नांची जोड ४९
असे होते २०१८ ५१

## स्वच्छ, शाश्वत आणि सुरक्षित पाणी १७

राज्यातील प्रत्येक गाव, खेडे, वाड्या आणि वस्त्यांना शाश्वत पाणी पुरवठा व्हावा, यासाठी प्रत्येक गावाला पाणी पुरवठा योजना देऊन गाव टंचाईमुक्त आणि टँकरमुक्त करण्यात येणार आहे.



## शेती विकासाचा डिजिटल अध्याय ३०



माहिती संवाद तंत्रज्ञान हे कोणत्याही क्षेत्रातील विस्तार व विकासाला चालना देणारे माध्यम आहे. शेती क्षेत्रात आढळून येत असलेला विकास किंवा सुधारणांची सुरुवात ही सुलभरित्या उपयोगात येऊ शकणाऱ्या माहितीच्या उपलब्धतेतून झाल्याचे दिसून येते.

## सायबर अभिशाप ४०




एखाद्याची बदनामी, किंवा एखाद्याला जीवनातून उठवणे, कौटुंबिक कलह व आयुष्यातील तणाव याचे अलीकडचे कारण बऱ्याचदा फेक न्यूज असल्याचे दिसून येते.

## राज्यसेवेची तयारी ४६

विद्यार्थी जेव्हा स्पर्धा परीक्षा देण्याचा निर्णय घेतात तेव्हा त्यांनी नक्की कोणती परीक्षा द्यायची आहे याचा नीट विचार करायला हवा.

वर्ष ७० वे | अंक ८ | फेब्रुवारी २०१९

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

| | |
|---|---|
| ■ मुख्य संपादक | ब्रिजेश सिंह |
| ■ प्रबंध संपादक | अजय अंबेकर |
| ■ संपादक | सुरेश वांदिले |
| ■ उपसंपादक | गजानन पाटील<br>राजाराम देवकर |
| ■ प्रशासन | मीनल जोगळेकर |
| ■ वितरण | मनीषा पिंगळे<br>मंगेश वरकड<br>अश्विनी पुजारी |
| ■ साहाय्य | स्वप्नाली जाधव<br>भारती वाघ |
| ■ मुखपृष्ठ | सीमा रनाळकर<br>सुशिम कांबळे |
| ■ मांडणी, सजावट | शैलेश कदम |
| ■ मुद्रितशोधन | उमा नाबर |
| ■ मुद्रण | डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., महापे, नवी मुंबई. |

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ०२२ - २२८१८३१२
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

# शेतकऱ्यांच्या हितांना सर्वोच्च प्राधान्य



शेती आणि शेतकऱ्यांचा विकास केंद्रस्थानी ठेवून राज्य शासनाने उपग्रह व ड्रोनच्या साहाय्याने शेतीविषयक समस्या सोडवण्यासाठी 'महाॲग्रीटेक' उपक्रम सुरू केला आहे. शेती विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरलेल्या 'मागेल त्याला शेततळे' योजनेला प्रधानमंत्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असून स्वच्छ भारत अभियानात राज्याला पाच राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. नागरिकांसाठी अनेक महत्त्वाकांक्षी योजना हाती घेऊन राज्याचा सर्वांगीण विकास साधला जात असल्याचे गौरवोद्गार राज्यपाल चे. विद्यासागर राव यांनी भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ६९ व्या वर्धापन दिनानिमित्त शिवाजी पार्क येथे आयोजित मुख्य शासकीय समारंभात काढले.

**राज्यपालांच्या भाषणातील प्रमुख मुद्दे :** ■ मुंबईत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकाचे आणि अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभे करण्याचे काम सुरू आहे. ■ २०२२ वर्षापर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यास राज्य शासन कटिबद्ध आहे. 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान' योजनेंतर्गत आतापर्यंत सुमारे ४१ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात आला. ■ प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत १०.५० लाखांहून अधिक लाभार्थ्यांनी नोंदणी केली असून ३ लाख घरे पूर्ण करण्यात आली. ■ भारतात होणाऱ्या एकूण थेट विदेशी गुंतवणुकीपैकी ३० टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात झाली. २०२५ वर्षापर्यंत महाराष्ट्र हे पहिले ट्रिलिअन डॉलरची अर्थव्यवस्था असणारे राज्य बनेल. ■ 'मुख्यमंत्री ग्रामसडक' योजनेंतर्गत ग्रामीण भागातील सुमारे ३० हजार किलोमीटर लांबीच्या ग्रामीण रस्त्यांची दर्जावाढ करण्यात येत आहे. ■ राज्याच्या गतिमान प्रगतीसाठी 'विशेष उपाययोजना कार्यक्रम-२०१८' अंतर्गत २२ हजार १२२ कोटी रुपये इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी ८९ सिंचन प्रकल्पांवर १३ हजार ४२२ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. ■ राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'जलयुक्त शिवार योजने'अंतर्गत १५ हजारांहून अधिक गावे पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाली आहेत. ■ 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेंतर्गत ५ हजार २७० जलाशयांमधून ३.२३ कोटी घनमीटर इतका गाळ काढण्यात आला आहे. 'मागेल त्याला शेततळे' योजनेंतर्गत सुमारे १.३७ लाख इतकी शेततळी बांधण्यात आली आहेत. ■ 'प्रधानमंत्री पीक विमा' योजनेंतर्गत ५२ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना २ हजार ७०० कोटी रुपये इतकी तर 'पुनर्रचित हवामान आधारित फळ पीक विमा' योजनेंतर्गत १ लाखाहून अधिक शेतकऱ्यांना ५६५ कोटी रुपये इतकी नुकसानभरपाई देण्यात आली आहे. ■ आतापर्यंत शेतकऱ्यांना ७७ लाखांहून अधिक मृदा आरोग्य पत्रिका देण्यात आल्या आहेत. ■ सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास वर्गाकरिता (एसईबीसी) आरक्षण विधेयक संमत. या अधिनियमान्वये एसईबीसी प्रवर्गातील नागरिकांना शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण आणि सरकारी सेवेतील पदांवरील नियुक्त्यांकरिता आरक्षण देण्यात येईल. ■ आदिवासी भागातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी 'डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना' राबवण्यात येत आहे. १ लाख ५९ हजार इतक्या गरोदर महिला आणि स्तनदा मातांना या योजनेचा लाभ देण्यात येत आहे. ■ 'महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य' योजनेंतर्गत राज्यातील सुमारे २.२७ कोटी कुटुंबांचा समावेश करण्यात आला आहे. ८३ लाख इतक्या अतिवंचित घटकातील कुटुंबांना 'आयुष्यमान भारत' योजनेचाही लाभ देण्यात येत आहे. ■ जनतेला सुरक्षित सायबर सेवा मिळावी, यासाठी राज्यात ४४ सायबर प्रयोगशाळा व पोलीस ठाण्यांमार्फत एक सायबर सुरक्षा प्रकल्प राबवण्यात येत आहे. ■ ग्रामीण स्वच्छ सर्वेक्षण - २०१८ अंतर्गत, सातारा, नाशिक आणि सोलापूर या जिल्ह्यांनी देशातील १० स्वच्छ जिल्ह्यांमध्ये विशेष स्थान प्राप्त केले आहे. राज्याला हागणदारीमुक्त घोषित करण्यात आले आहे.

# स्वच्छतेत अग्रेसर



**बबनराव लोणीकर**
मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता

महात्मा गांधी यांनी स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य दिले होते. त्यांच्या या कार्याला प्रभावीरीत्या पुढे नेण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वच्छता कार्यक्रमास सर्वोच्च प्राधान्य दिले. या कार्यक्रमात महाराष्ट्राने झोकून देऊन कार्य केले. गेल्या चार वर्षात जवळपास ६० लाख शौचालये ग्रामीण भागात बांधून पूर्ण झाली आहेत. 'स्वच्छता ही सेवा' हा केंद्र सरकारचा उपक्रम महाराष्ट्रात अभिनवरीत्या आणि व्यापक लोकसहभागातून राबवण्यात आला. देशातील विविध राज्यांतील सर्वेक्षणानंतर महाराष्ट्रात सर्वोत्कृष्ट कार्य झाल्याचे केंद्र सरकारने घोषित केले. केंद्र सरकारने काही दिवसांपूर्वी त्रयस्त संस्थेच्या वतीने देशस्तरीय स्वच्छ सर्वेक्षण केले. यामध्ये सातारा जिल्ह्याचा स्वच्छतेमध्ये पहिला क्रमांक आला. ही आपणा सर्वांसाठी आनंद आणि अभिमानाची बाब आहे. नाशिक आणि सोलापूर या जिल्ह्यांचा 'नागरिकांचा प्रतिसाद' या घटकामध्ये विशेष सन्मान करण्यात आला. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत देशपातळीवर 'स्वच्छता दर्पण' या घटकाखाली मूल्यांकन करण्यात आले. यामध्ये देशस्तरावर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या वर्धा, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली आणि कोल्हापूर या जिल्ह्यांचा सन्मान करण्यात आला.'स्वच्छ महाराष्ट्रासाठी – १८ लाख गृहभेटी' हा अभिनय कार्यक्रम अतिशय प्रभावीपणे राबवण्यात आल्याने स्वच्छतेची मोहीम गावागावांपर्यंत पोहोचली. त्यामुळे लोकांच्या सहभागात वाढ झाली. त्यांच्या वर्तनात बदल घडण्यास सुरुवात होऊन त्यात सातत्य राहिले. युनिसेफच्या आणि इतर सामाजिक संस्थांच्या साहाय्याने प्रत्येक गावाचा शाश्वत स्वच्छतेचा आराखडा तयार केला जात आहे. यामध्ये गावकऱ्यांचा सहभाग घेतला असल्याने यातून स्वच्छतेविषयी लोकशिक्षणही घडत आहे. असा उपक्रम राबवणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य ठरले आहे. शौचालयाच्या सुविधांचा पूर्ण लाभ देण्यात राज्य शासन यशस्वी ठरले आहे. आता घनकचऱ्याचे विकेंद्रीकरण, पुनर्वापर, त्याचे खतामध्ये रूपांतर, त्याचा शेतात वापर याबाबत ग्रामीण भागातील नागरिकांना प्रशिक्षित केले जात आहे. गावस्तरातील सांडपाण्याचे प्रश्न परसबागा, जादुई खड्डे यासारख्या उपायांद्वारे सोडवणे सुरू आहे. स्वच्छतेवर लक्ष केंद्रित केले असतानाच ग्रामीण भागात शुद्ध व पुरेसे पाणी मिळावे, यासाठी 'मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना' राबवण्यात येत आहे. ऑक्टोबर २०१८ पर्यंत ७८० नवीन नळ पाणीपुरवठा योजनांना मान्यता देण्यात आली. यापैकी ६२२ कामे सुरू झाली आहेत. या योजनेवर १६०० कोटी रुपये खर्च केले जातील. या योजनांमुळे १६७१ गावे आणि वाड्या व वस्त्यांमधील ३७ लाखांहून अधिक नागरिकांना लाभ होईल. बंद असलेल्या योजनांच्या पुनरुज्जीवनाचा कार्यक्रमही मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येत आहे. यामध्ये ४८ कोटींच्या २३ योजनांना मान्यता प्रदान करण्यात आली आहे. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रत्येक ग्रामीण व्यक्तीस स्वयंपाक, घरगुती वापरासाठी शुद्ध आणि स्वच्छ पाणी पुरवठा करण्यात येईल. यासाठी जवळपास ८ हजार कोटींच्या कृतिआराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. यामुळे १० हजारांहून अधिक गावांना लाभ होईल. गावांना मुबलक पाणी पुरवठा व्हावा यासाठी जागतिक बँकेच्या साहाय्याने १२८४ कोटी रुपयांचा जलस्वराज्य–२ हा कार्यक्रम, निरीक्षण विहिरींचे जाळे, प्रयोगशाळा आणि जलवेधशाळांचे बळकटीकरण आदी उपाययोजना राबवण्यात येत आहेत. पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवर मात करण्यासाठी व्यापक कृतिआराखडा तयार करण्यात आला आहे. यासाठी पुरेशा निधीची तरतूद करण्यात आली आहे. या सर्व बाबींचा आम्ही लोकराज्यच्या या अंकात विस्तृत आढावा घेतला आहे. याशिवाय मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी 'जलयुक्त शिवार,' 'गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार' या योजनांवर लिहिलेला विशेष लेख, त्यांनी 'लोकसंवाद' या कार्यक्रमाद्वारे घरकुले व शेतीविषयक प्रश्नांसंदर्भात नागरिकांशी प्रत्यक्ष साधलेल्या संवादाचा अहवाल; हे या अंकाचे वैशिष्ट्य आहे. गेल्या वर्षभरात शासकीय पातळीवर जे विविध कार्यक्रम झाले, निर्णय घेतले त्याचा महिनानिहाय आढावाही आम्ही या अंकात घेतला आहे, तो सर्वांनाच उपयुक्त ठरेल.




हा अंक आपणास आवडेल याची खात्री वाटते.

**बबनराव लोणीकर**
(अतिथी संपादक)



नाशिक जिल्ह्यात चांदवड तालुक्यातील राजदेरवाडी गावात 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेच्या माध्यमातून गावतलावातून १३ हजार घनमीटर गाळ काढल्याने पाणीसाठ्यात १३ टीसीएम वाढ झाली आहे.

**मोठ्या धरणांची विस्थापक कल्पना सोडून 'जलयुक्त शिवार अभियाना'तून सिंचनाच्या कामी लोकसहभागाची नांदी झाली, त्यानंतरचा टप्पा म्हणजे धरणांच्या वा अन्य जलाशयांमधील गाळ काढून तो शेतजमिनीवर पसरण्याची मोहीम.. तीही यशस्वी होत असल्याचे हे शुभवर्तमान, 'दुष्काळमुक्ती'च्या स्वप्नपूर्तीची चाहूल देणारे आहे.**

# गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार...

**देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री



महाराष्ट्रात २०१२ मध्ये सरासरीच्या ९०.३ टक्के पाऊस झाला होता आणि तरीही ते वर्ष आमच्या इतिहासातील अत्यंत कठीण दुष्काळी वर्षांपैकी एक दुष्काळी वर्ष म्हणून घोषित करण्यात आले होते. राज्यात सुमारे ८५ हजार जलाशये असताना आणि धरणांसाठी वारेमाप खर्च करूनही पावसावर अवलंबून राहण्याची वेळ या राज्यावर आली होती. अशा स्थितीत जेमतेम दहा टक्के शेती क्षेत्र सिंचनाखाली असल्यास नवल ते काय! पाण्याच्या या टंचाईमुळे, देशाचा पोशिंदा असलेल्या बळीराजाला करावा लागणारा संघर्ष हा विदारक होता. पाण्याच्या कमतरतेचा हा विपरीत प्रभाव आरोग्य, पोषण, स्वच्छतेसह जीवनाच्या प्रत्येक स्तरामध्ये झिरपत होता.

### प्रकल्प पूर्ण होण्याकडे लक्ष

२०१४ मध्ये राज्याच्या सत्तेची धुरा सांभाळल्यानंतर, या आपत्तीवर तातडीने आणि कायमस्वरूपी मात करणे, हे माझ्या सरकारचे प्रमुख लक्ष्य होते. गतकाळावर नजर टाकल्यावर लक्षात आले की, अवाढव्य सिंचन प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करण्याचा पारंपरिक प्रघात हा अयशस्वी ठरतो आणि म्हणून आम्ही नावीन्यपूर्ण मार्ग स्वीकारला. मोठमोठ्या प्रकल्पांवरील खर्चाच्या तुलनेत अत्यंत किफायतशीर ठरणाऱ्या, सामुदायिक सहभागाला चालना देणाऱ्या, गतीने पूर्ण होणाऱ्या कामांवर आम्ही लक्ष केंद्रित केले.

### जलयुक्त शिवार अभियान

महाराष्ट्रातील २५ हजार गावांना २०१९ पर्यंत दुष्काळमुक्त करण्याच्या महत्त्वाकांक्षेने



सुरू करण्यात आलेले जलयुक्त शिवार अभियान ही लोकसहभागाची लोकचळवळ आहे.

महाराष्ट्राची एकूणच भौगोलिक रचना अशी आहे की, वर्षभरात झालेल्या पावसापैकी अंदाजे ८० टक्के पाणी आणि त्यासोबत भूपृष्ठावरील मातीदेखील वाहून जाते. जलयुक्त शिवार अभियानातून या समस्येवर तोडगा निघाला. जलप्रवाहाच्या मार्गाचे खोलीकरण व रुंदीकरण करणे, सिमेंट आणि मातीचे बांध बांधणे, पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत मुरवणे, भूजल पातळी उंचावण्यासाठी नाल्यांच्या दुरुस्तीसह शेततळी बांधणे या कामांना जलयुक्त शिवारामध्ये प्राधान्य देण्यात आले. या योजनेचे महत्त्व आणि यश पाहून सर्व समुदाय कामांमध्ये सहभागी झाला आणि ही खऱ्या अर्थाने लोकांची चळवळ बनली. या अभियानाद्वारे मागील तीन वर्षांमध्ये २४ लाख टीसीएम पाणीसाठा क्षमता निर्माण झाली असून सुमारे २१ लाख ११ हजार हेक्टर कृषी क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. यासाठी, लोकसहभागातून जमलेल्या ६३८ कोटी रुपयांसह एकंदर सात हजार कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आजमितीस राज्यातील १६ हजार गावे यातून दुष्काळमुक्त झाली आहेत. कोणत्याही मोठ्या प्रकल्पावर वारेमाप खर्च करूनही इतका परिणाम साध्य करता आला नसता.

## दुहेरी फायदा

वाहून जाणाऱ्या पाण्याला अटकाव करीत जमिनीतील भूजल साठा वाढवण्याचे प्रयत्न करताना पुढचा टप्पा होता तो, जलाशयांमध्ये साठलेला गाळ काढून पाणीसाठा क्षमता वाढवण्याचा. पावसाच्या पाण्याबरोबर वाहून येणारी माती जलाशयांमध्ये साठून त्याचे गाळात रूपांतर होते, ज्यामुळे जलाशयांची पाणी साठवण क्षमता कमी तर होतेच; शिवाय जमिनीत पाणी मुरण्याच्या प्रक्रियेतही अडथळे निर्माण होतात. सुदैवाने यावर अतिशय सोपा-सरळ उपाय उपलब्ध आहे, तो म्हणजे - जलाशयांमधील गाळ काढून त्यांना 'गाळमुक्त' करायचे व हा गाळ शेतजमिनींवर पसरवून मातीचे संरक्षणही करायचे. जलाशयांमधील गाळ हा शेतीसाठी अतिशय सुपीक, जमिनीचा पोत सुधरवणारा असतो, परिणामी पिकांमध्ये लक्षणीय वाढ होते आणि खतांवरील खर्चही कमी होतो. जलयुक्त शिवार अभियानाशी या उपक्रमाचा मेळ साधल्याने पाण्याची साठवण क्षमता वाढून गावे कायमस्वरूपी दुष्काळमुक्त होण्यास मदत होत आहे.

हेच उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून, मे २०१७ मध्ये आम्ही 'गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार' योजनेचा श्रीगणेशा केला. मला हे नमूद करताना अतिशय आनंद वाटतो की, योजनेचा प्रारंभ झाल्यापासून सरकारी यंत्रणा, बिगरशासकीय संस्था, संबंधित तज्ज्ञ मंडळी आणि गाव समुदायाला यामध्ये एकत्र आणण्याची किमया सहजपणे साधली गेली आहे. मागील दोन वर्षांमध्ये राज्यभरातील मिळून पाच हजार २७० धरणे, पाझर तलाव यांतील एकूण तीन कोटी २३ लाख क्युबिक (घन) मीटर गाळाचा उपसा या योजनेच्या माध्यमातून करण्यात आला आहे. याचा थेट परिणाम म्हणून थोड्याथोडक्या नव्हे तर ३२ लाख टँकर्समध्ये मावेल इतकी पाणी साठवण क्षमता निर्माण झाली असून तब्बल ४८० कोटी रुपयांची बचत झाली आहे. सोबतच, ३१ हजार १५० शेतकऱ्यांना याचा थेट फायदाही झाला आहे. कारण हा काढलेला गाळ त्यांच्या शेतजमिनीमध्ये पसरवण्यात आला असून ज्यायोगे पिकांमध्ये दुप्पट ते चौपट वाढ झाली आहे. ('इक्रिसॅट' या आंतरराष्ट्रीय पीक संशोधन संस्थेने केलेल्या अभ्यासांवर आधारित हे निष्कर्ष आहेत.)

ही सर्व आकडेवारी चकित करणारी असली तरी, ती साध्य करणे शक्य झाले ते अंमलबजावणीच्या अद्वितीय पद्धतीमुळे आणि आपल्या लोकसमुदायाच्या उमद्या, प्रेरक वृत्तीमुळे. महाराष्ट्राला कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्याच्या ध्येयाचा पाठलाग करताना सार्वजनिक, खासगी आणि लोकसहभाग (पब्लिक, प्रायव्हेट ॲण्ड पीपल्स पार्टनरशिप) या सूत्राच्या आधारेच सर्वांचा सहभाग निश्चित होऊ शकतो, हे या दोन्ही अभियानांनी दाखवून दिले आहे. ज्या वेळी प्रत्येक जण कुठलेही काम आपले मानून त्यात सहभाग घेतो, तेव्हा चमत्कार झाल्यावाचून राहत नाही. या चळवळीचा घटक होऊन महाराष्ट्राला जलसुरक्षा देण्याच्या प्रयत्नांमध्ये सहभाग नोंदवता आला, याबद्दल मी स्वतःला भाग्यवान समजतो. महाराष्ट्रातील सर्व जलसंवर्धन योजनांचा एकत्रित परिणाम म्हणून सर्व गावे जलसमृद्ध होतील आणि यापुढे ही गावे पावसावर अवलंबून राहणार नाहीत. आकाशाकडे पाहून पावसासाठी प्रार्थना करणाऱ्या शेतकऱ्याची विदारक प्रतिमा ही जमिनीवर विपुल जलसाठे पाहून, स्मित करणाऱ्या आणि लोकसमुदायाच्या प्रयत्नांना धन्यवाद देणाऱ्या शेतकऱ्याच्या प्रतिमेमध्ये रूपांतरित होईल, हे निश्चित. (साभार : लोकसत्ता)




**राज्यात विविध क्षेत्रातील नागरिकांसाठी योजना राबवल्या जातात. या योजनांचा लाभ घेताना अडचणी येतात का? योग्य प्रकारे त्यांची अंमलबजावणी होते का? आदींबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 'लोकसंवाद' या कार्यक्रमाद्वारे नागरिकांशी थेट संवाद साधत आहेत. राज्यात पहिल्यांदाच असा उपक्रम इंटरनेट, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग इ. अत्याधुनिक संपर्क माध्यमांद्वारे राबवण्यात येत आहे. आतापर्यंत या संवादाचे दोन भाग प्रक्षेपित झाले आहेत.**

# मनमोकळा थेट संवाद

**नंदकुमार वाघमारे**

राज्यात केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची यशस्वीपणे अंमलबजावणी सुरू आहे. या योजनांमध्ये शहरी व ग्रामीण भागातील बेघरांसाठी प्रधानमंत्री आवास योजना, शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा दिलासा देणारी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, मागेल त्याला शेततळे, जलयुक्त शिवार, महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना, युवकांना रोजगारक्षम करणारी मुद्रा योजना, विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यास मदत करणारी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना, वंचित आणि उपेक्षित समूहातील विद्यार्थ्यांना मदतीचा हात देणारी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना अशा अनेक योजनांचा समावेश आहे. या योजनांवर शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला जातो.

समाजातील गरजुंसाठी खर्च करण्यास राज्य शासन कधीही हात आखडता घेत नाही. मात्र हा निधी पात्र लाभार्थ्यांपर्यंत गेला पाहिजे, या योजनांचा लाभ घेताना अडचणी येतात का, योग्य प्रकारे त्यांची अंमलबजावणी होते का? आदी माहिती प्रशासनास मिळणे आवश्यक असते. ही माहिती थेट लाभार्थ्यांकडूनच मिळू लागली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लोकसंवाद या थेट संवादाच्या कार्यक्रमामुळे राज्यात पहिल्यांदाच असा उपक्रम राबवण्यात येत असून आतापर्यंत दोन भाग प्रक्षेपित झाले आहेत.

## थेट संवाद

अनेकदा राज्य शासनाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत असतात. मात्र, त्याची अंमलबजावणी योग्य रीतीने होते की नाही, हे कळत नाही. त्यामुळेच मुख्यमंत्र्यांनी

थेट लाभार्थ्यांसाठी संवाद साधण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी मदत घेतली आधुनिक तंत्रज्ञानाची... इंटरनेटच्या युगात जग जवळ आल्याचे बोलले जाते. मुख्यमंत्री महोदयांनी याचाच फायदा घेऊन आधुनिक माध्यमाद्वारे एकाच वेळी राज्यातील सर्व जिल्ह्यातील लाभार्थ्यांशी थेट संवाद साधत जग जवळ आल्याचे सिद्ध केले. त्यांचा हा संवाद इंटरनेटमुळे जगभरातील दर्शकांपर्यंत पोहोचला.

## घरकूल संवाद

'लोकसंवाद'च्या या थेट संवाद कार्यक्रमाच्या पहिल्या भागात मुख्यमंत्र्यांनी प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी घरकूल योजना आदी योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांशी संवाद साधला. या वेळी अगदी ग्रामीण भागातील लाभार्थी विशेषतः महिलांची संख्या लक्षणीय होती. राज्याच्या प्रमुखांशी थेट संवाद साधता येत असल्याचा आणि आपण घेतलेल्या योजनांमध्ये येणाऱ्या अडचणी यांची माहिती मुख्यमंत्र्यांना देता येत असल्याचा आनंद त्यांच्या बोलण्यातून दिसून आला.

या वेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी व्यवस्थित व्हावी, लाभार्थ्यांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी धडपड असते. या योजनांची अंमलबजावणी गतीने झाल्यास विकासाची प्रक्रिया वेगवान होऊ शकेल. त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. हे प्रयत्न प्रभावी होण्यासाठी केवळ मंत्रालयात बसून पाठपुरावा पुरेसा ठरणारा नाही. जनसामान्यांची मते जाणून घेतली तर कार्यवाहीतील दोष अथवा अडचणी लक्षात येतील आणि सरकारच्या कार्यपद्धतीत आवश्यक सुधारणाही करता येऊ शकतील. या साऱ्यांसाठी आवश्यक असणारा फीडबॅक प्रत्यक्ष लाभार्थ्यांकडूनच घेता यावा यासाठी या कार्यक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे. या माध्यमातून योजनांच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती जाणून घेण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे.

२०२२ मध्ये सारा देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असताना प्रत्येक बेघर कुटुंबाकडे आपला हक्काचा निवारा असावा असा निर्धार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला आहे. त्यासाठी या कार्यक्रमाला त्यांनी गती दिली आहे. देशातील लाखो कुटुंबे स्वत:च्या घराचे स्वप्न पाहत आहेत. त्यांचे स्वप्न साकारण्यासाठी आम्ही अथक प्रयत्नशील आहोत. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत १२ लाख घरांची निर्मिती करण्याचे नियोजन केले आहे. पुढील वर्षी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती या वर्गातील एकही गरजू कुटुंब घराविना वंचित राहू नयेत, याचा निर्धार आपण केला असल्याचे त्यांनी लाभार्थ्यांना सांगितले.

या वेळी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे विविध जिल्हा मुख्यालयातून लाभार्थी मुख्यमंत्र्यांशी बोलले. त्यामध्ये विशेषतः महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग दिसून आला. मुख्यमंत्री महोदयांबरोबर बोलताना त्यांच्या प्रतिक्रिया अतिशय बोलक्या होत्या. आपल्याला आलेले अनुभव व पक्क्या घराचे बांधकाम झाल्यामुळे कुटुंबांत पसरलेला आनंद त्यांनी मुख्यमंत्र्यांना कथन केला. राज्याच्या मुख्यमंत्र्यांशी थेट संवाद साधण्याचा आनंद प्रत्येक लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. अनेकांनी नवीन घरात मुख्यमंत्री महोदयांनी यावे, असा आग्रह धरला. त्यावर मुख्यमंत्री महोदयांनीही त्यांच्या घरी येण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

## आईलाही घर द्या...

नागपूर जिल्ह्यातील लिहिगाव, (ता. कामठी) येथील हेमलता भलावी या आदिवासी समाजातील महिलेने स्वतःला प्रधानमंत्री आवास योजनेतून घर मिळाल्याचा आनंद व्यक्त केला. त्या म्हणाल्या की, मी व माझ्या आईने दोघींनीही घरासाठी अर्ज केला होता. माझ्या घराचे काम झाले, मात्र माझ्या आईच्या अर्जाचे काही झाले नाही. त्यामुळे मी त्रस्त आहे. मुख्यमंत्री महोदयांनी यामध्ये लक्ष घालावे. यावर मुख्यमंत्री म्हणाले की, 'तुमच्या आईंनाही घर मिळण्यासाठी जरूर लक्ष घालू.'

नंदुरबारच्या कौशल्याबाई यांनी आता घर मिळाल्यामुळे घराची काळजी दूर झाली. आता मुलांच्या लग्नाची काळजी असल्याचे सांगितले. तर अमरावतीच्या आशा जमदाडे यांनी शासकीय योजनेतून घर मिळाल्यामुळे आमचे घर 'हॅपी होम' झाल्याचे आवर्जून नमूद केले. वर्ध्यामधील आरती कोट्टेवार व गडचिरोली जिल्ह्यातील फुलेवाडा येथील जावेद शेख यांनी प्रधानमंत्री आवास योजनेतून घर बांधताना रेती मिळण्यास अडचणी येत असल्याचे सांगितले. त्यावर



श्री. फडणवीस यांनी या योजनेतील घरांच्या बांधकामासाठी पाच ब्रासपर्यंत रेती मोफत देण्याची घोषणा केली. यासंबंधी सर्व जिल्हाधिकारी व तहसीलदारांना सूचना देण्यात येणार असल्याचेही सांगितले.

अमरावतीतील आशा जामजोड यांच्या प्रश्नावर उत्तर देताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, या योजनेतील घरांच्या आराखड्यासाठी घेण्यात येणारे शुल्क माफ करण्यासंदर्भात केंद्र शासनाशी चर्चा सुरू असून लवकरच त्याबद्दल निर्णय घेण्यात येईल.

पंडीत दीनदयाल उपाध्याय जागा खरेदी योजनेचा लाभ मिळालेल्या वर्धा जिल्ह्यातील सुनंदा चौधरी यांनी, या योजनेमुळे जागा मिळाली आणि प्रधानमंत्री आवास योजनेमुळे घराचे बांधकाम झाल्याचे सांगितले. तर वर्धेमधीलच सविता श्रीशैल गायकवाड या लातूरमधील बाबूराव साधु कांबळे, नागपूर जिल्ह्यातील खैरी पिंजेवाड येथील दर्शना सोलंकी, नाशिकमधील नंदा पाडेकर या लाभार्थ्यांशी त्यांच्या नव्या घराच्या ठिकाणी संपर्क साधून मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला.

## 'देवेंद्र'च्या रूपात देव आला धावून

इचलकरंजी येथील ज्योत्स्ना दशरथ घोडके म्हणाल्या, 'माझे कच्चे घर होते. मात्र, घराची पडझड झाली होती. त्याच वेळी मुलीचे बाळंतपण आले होते. त्या विवंचनेत असतानाच प्रधानमंत्री आवास योजनेतून घरकूल मंजूर झाल्याचा निरोप अधिकाऱ्यांनी स्वतःहून दिला अन् 'देवेंद्रच्या रूपात देव' भेटल्याचा आनंद झाला. घराचे बांधकाम झाल्यामुळे मुलीचे बाळंतपणाचे दिवस सुखाचे झाले.'

कोल्हापूर जिल्ह्यातील कृष्णात पांडुरंग निकम यांनी सांगितले, 'पक्के घर बांधल्यामुळे आनंद झाला असून माझ्या मित्रांनी घरावर लावलेल्या कृ.पा. निकम या नावाच्या पाटीवर बदल करून 'देवेंद्र – मोदीजी कृपा' असा बोर्ड लावला.'

## कृषी संवाद

दुसऱ्या भागात मकर संक्रांतीच्या आदल्या दिवशी शेती क्षेत्रातील विविध योजनांचा आढावा, शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत संपर्क साधून श्री. फडणवीस यांनी घेतला. सुमारे तीन तास चाललेल्या या संवादपर्वात मुख्यमंत्र्यांनी विविध जिल्ह्यांतील शेतकऱ्यांशी हितगुज करून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. शेतकऱ्यांनी केलेल्या सूचनांवर योग्य ती कार्यवाही करण्याचे सांगत मुख्यमंत्र्यांनी त्यांना दिलासा दिला.

शेतीशी निगडित सर्वच बाबींवर राज्य शासनाने व्यापक उपाययोजना केल्या आहेत. त्या माध्यमातून आपणाला दिलासा देण्याचा आमचा प्रयत्न आहे. शिवार संपन्न होऊन आपले उत्पन्न दुप्पट करतानाच राज्यात समृद्धी निर्माण करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. नैसर्गिक संकट आले तरी शासन आपल्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी या वेळी व्यक्त केला.




### महाॲग्री टेक कार्यक्रमाची सुरुवात

याच कार्यक्रमात श्री. फडणवीस यांनी कृषी विभागाच्या 'महाॲग्री टेक' कार्यक्रमाची सुरुवात केली. 'महाॲग्री टेक' कार्यक्रमामुळे शेतीत आधुनिकता येईल. त्या माध्यमातून राज्यातला शेतकरी सुजलाम सुफलाम करण्याचा आमचा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांबरोबरचा संवाद प्रेरक आणि मार्गदर्शक ठरला. योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा आमचा प्रयत्न यशस्वी होईल,' अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिली.

घरकाम करणाऱ्या महिलेने प्रधानमंत्री आवास योजनेमुळे आपले घर झाल्याचे सांगून प्रधानमंत्री व मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

नांदेडमधील अर्धापूर तालुक्यातील लहान या गावातील अस्मिता राजेश वाहेवळ म्हणाल्या, कुडाचे घर असल्यामुळे इतर पाहुण्यांचे पक्के घर पाहून मुले वारंवार आपले घर चांगले का नाही, असा प्रश्न विचारत होती. घर नसल्यामुळे चांगले घर व्हावे, यासाठी मुले जोमाने अभ्यासाला लागली. प्रधानमंत्री आवास योजनेमुळे घर मंजूर झाले. नांदेड जिल्ह्यातील सुजाता दिगंबर सावंत यांनी रमाई आवास योजनेतून घर मिळाल्यामुळे मुले आनंदी असून ते आपल्या मित्रमैत्रिणींना घरी आवर्जून आणत असल्याचे सांगितले.

ठाणे जिल्ह्यातील कैलास धुळे,

## वांग्यांना चांगला भाव...

परभणी येथील प्रताप काळे या शेतकऱ्याने आपला अनुभव सांगताना आज माझ्यासाठी दिवाळी असल्याचे सांगत काल आठवडे बाजारात मी नेलेल्या वांग्यांना चांगला भाव मिळाला. मला हजार रुपये एक दिवसात मिळाले. माझ्यासाठी ही दिवाळीच, असे सांगताना प्रताप यांनी मुख्यमंत्र्यांना टोपलीभर पेढे देतो, असे उत्स्फूर्त प्रतिक्रिया या वेळी दिली.

ग्रामीण भागाचे चित्र बदलण्याची क्षमता असलेला एक मोठा प्रकल्प आपण हाती घेतला आहे. जागतिक बँकेने त्यासाठी २ हजार २०० कोटी रुपये गुंतवण्याचे मान्य केले आहे. महाराष्ट्र राज्य कृषी–व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) याद्वारे शेतमाल विक्रीसाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे, उपलब्ध सुविधांचे आधुनिकीकरण व बळकटीकरण करणे, शेतकरी उत्पादक गटांची निर्मिती करणे आणि शेतमालावर प्रक्रिया करून शेतकऱ्यांना बाजारपेठेशी जोडणे या गोष्टी करणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

या वेळी शेतात राबून विविध योजनांच्या



## सोलापूरमधील शेततळ्याचे ऑनलाइन जलपूजन

सोलापूर जिल्ह्यातील बोरमणी येथील सिद्राम बिराजदार या शेतकऱ्याने मुख्यमंत्र्यांना शेततळ्यातील पाण्याचे जलपूजन रिमोटचे कळ दाबून करावे, अशी विनंती केल्यानंतर त्याला मान देत मुख्यमंत्र्यांनी कार्यक्रम सुरू असतानाच रिमोटची कळ दाबून जलपूजन केले. अशा प्रकारे ऑनलाइन जलपूजन करण्याचा माझा पहिलाच अनुभव असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगताच उपस्थितींना हसू आवरले नाही. सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांशी संवाद साधत असताना काही शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील डाळिंब सोबत आणले होते. ते पाहून मुख्यमंत्री म्हणाले, 'डाळिंब खूप छान दिसताय. पाहताच खायची इच्छा होतेय.'



प्रभावी अंमलबजावणीतून प्राप्त झालेल्या स्वावलंबनाच्या यशोगाथा शेतकऱ्यांनी लोकसंवादमधून सादर केल्या. व्हिडिओ कॉन्फरन्सिगच्या माध्यमातून जालना, पालघर, अहमदनगर, परभणी, वाशिम, गोंदिया, सोलापूर, उस्मानाबाद, चंद्रपूर, जळगाव आणि यवतमाळ या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी मुक्तपणे मुख्यमंत्र्यांशी संवाद साधला. जळगाव, उस्मानाबाद, वाशिम, पालघर, अहमदनगर आदी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या बांधावर संपर्क साधून मुख्यमंत्र्यांनी माहिती घेतली. या वेळी मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यांशीदेखील संवाद साधला.

पालघर येथे पाच हजार शेतकरी गट तयार झाल्याचे ऐकून श्री. फडणवीस यांनी सर्व शेतकऱ्यांचे अभिनंदन केले. चर्चेदरम्यान मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना अनुदानासाठी कोणाला पैसे द्यावे लागतात का, असा थेट प्रश्न विचारला. त्यावर बहुतांश शेतकऱ्यांनी शेतीच्या कुठल्याही अनुदानाची रक्कम थेट बँक खात्यात जमा होते. ऑनलाइनमुळे भ्रष्टाचाराला आळा बसल्याचे शेतकऱ्यांनी या वेळी स्पष्ट केले.

मुख्यमंत्र्यांशी प्रत्यक्षात बोलायला संधी मिळाली याचा आनंद शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. तळागाळांतील शेतकऱ्यांशी तुम्ही संवाद साधला, आज आमच्यासाठी आनंदाचा दिवस आहे, अशी प्रतिक्रिया जालना जिल्ह्यातील वरुड येथील दीपक म्हस्के यांनी व्यक्त केली.

## हातसडी तांदळाचे कौतुक

पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यांशी चर्चा करताना शेतकरी आपल्या भागातील चिकू, नारळ, पपई, पेरू या फळांसोबतच विविध भाज्या आणि फुलांची माहिती देत होते. 'माझ्या घरी पालघर जिल्ह्यात पिकणारा हातसडीचा तांदूळ मी नेहमी आणतो. या तांदळाचा भात पौष्टिक असतो. तो मला आवडतो,' असे कौतुकाचे उद्गार मुख्यमंत्र्यांनी काढताच पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आनंद अवर्णनीय झाला.

## उच्चशिक्षित शेतकरी तरुणीचे कौतुक

गोंदिया जिल्ह्यातील राणू रहांगडाले या तरुणीने बी.ई. इलेक्ट्रॉनिकचे शिक्षण घेतले. एमबीए केले. मात्र ती शेतीकडे वळली. आता सध्या ३५ एकर शेतीवर भाजीपाल्यासह पपई, केळी यांचे उत्पादन ती घेते. स्ट्रॉबेरी पिकवते. यासाठी तिने सिंचन योजनांचा लाभ घेतला. शेती करताना शासनाच्या विविध योजनांमुळे कसा फायदा झाला. हे अनुभव सांगताना राणूने मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. या वेळी मुख्यमंत्र्यांनी राणूच्या शेती व्यवसायाकडे वळण्याच्या निर्णयाचे स्वागत केले. 'उच्चशिक्षित असूनही शेती करताय याबद्दल तुमचे अभिनंदन,' असे गौरवोद्गार मुख्यमंत्र्यांनी या वेळी काढले.




## या माध्यमातून साधला संवाद...

हा थेट लाईव्ह संवाद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या www.twitter.com/Dev_Fadnavis या ट्विटर हॅण्डलवर तसेच www.facebook.com/devendra.fadnavis या फेसबुक पेजवर आणि www.youtube.com/DevendraFadnavis या युट्यूब चॅनलसह माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे ट्विटर www.twitter.com/MahaDGIPR व www.facebook.com/MahaDGIPR या फेसबुक पेजसह www.youtube.com/maharashtradgipr या युट्यूब चॅनलवर पाहता येणार आहे. त्याशिवाय http://elearning.parthinfotech.in/ या लिंकवर या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपित झाला आहे.

**सहायक संचालक (माहिती)**



'स्वच्छता ही सेवा' या कार्यक्रमाचा शुभारंभ करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

# स्वच्छता हीच सेवा...

**बबनराव लोणीकर,**
मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता

२०१४ मध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून देशाला स्वच्छतेचे आवाहन केले. त्यामुळे देशामध्ये एक प्रकारची स्वच्छतेच्या प्रति काम करण्याची सकारात्मक लाट आली. लोकवर्तनामध्ये बदल घडवण्यासाठी सातत्याने नवीन कल्पना आणि जागृती अभियान राबवणे अत्यावश्यक होते. कधी केंद्र सरकारने आयोजिलेली तर कधी राज्य स्तरावरून योजिलेली अनेक कल्पक अभियान किंवा मोहिमा राज्यभर राबवत राहिल्यामुळे लोकमनाला स्वच्छतेची जाणीव करून

**१८ एप्रिल २०१८ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ग्रामीण महाराष्ट्र हागणदारीमुक्त घोषित केला. सर्वसामान्यांच्या अपार मेहनतीतून हे यश प्राप्त झाले. सर्व स्तरावरच्या शासकीय यंत्रणा, राजकीय नेतृत्व, सामाजिक संघटना या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून महाराष्ट्राने ही उज्ज्वल कामगिरी केली आहे.**

देण्याचे काम सातत्याने घडत गेले.

## उद्दिष्टांना गवसणी

२०१४ मध्ये जेव्हा स्वच्छ भारत मिशन या कार्यक्रमाची सुरुवात झाली तेव्हा राज्यापुढे ६० लाख शौचालये बांधण्याचे उद्दिष्ट होते. २०१४ ते २०१८ या कालावधीमध्ये महाराष्ट्राने जवळजवळ ६० लाख शौचालये बांधून इतिहास घडवला. २०१४ आणि २०१५ नंतर राज्याच्या यंत्रणेने असा काही वेग घेतला की, अशक्य वाटणारी अनेक उद्दिष्टे राज्याने दरवर्षी साध्य केली.

## १८ लाख गृहभेटी

२०१६ मध्ये महाराष्ट्राचे शौचालय बांधकामाचे उद्दिष्ट १८ लाख एवढे होते. एवढे मोठे उद्दिष्ट यापूर्वी महाराष्ट्राने कधीच साध्य केले नव्हते. यासाठी अत्यंत कल्पक आणि नावीन्यपूर्ण अभियानाची गरज असते. २२ ऑगस्ट २०१६ ते २ ऑक्टोबर २०१६ या कालावधीदरम्यान महाराष्ट्राने अभियान राबवले. या अभियानाचे नाव 'स्वच्छ महाराष्ट्रासाठी १८ लाख गृहभेटी' असे ठेवण्यात आले. लोकसहभाग आणि लोकांच्या वर्तनात बदल घडवण्यासाठी मागील चार वर्षात राज्यात सातत्याने विविध प्रयोग होत आहेत.

लोकसंवादाच्या नव्या प्रक्रिया आपण शोधल्या. समुदाय संचालित हागणदारीमुक्त गाव नियोजन प्रक्रिया राज्यातल्या गावागावांत राबवल्यानंतर ही नियोजन प्रक्रिया राष्ट्रीय स्तरावरसुद्धा पोहोचली. वर्तनबदलासाठी अभ्यासानंतर आंतरव्यक्ती संवाद हाच उपयोगी मार्ग असल्याचे लक्षात आले. त्यामुळेच त्या वर्षी आपण राज्यात २२ ऑगष्ट ते २ ऑक्टोबर २०१६ या कालावधीत स्वच्छ महाराष्ट्रासाठी – १८ लाख भेटी हे बोधवाक्य घेऊन हा उपक्रम राबवला आणि राज्यातील शौचालय नसलेल्या १८

## ग्रामीण स्वच्छतेसाठी राज्याचा सन्मान

महात्मा गांधी यांची १५० वी जयंती वर्ष सुरू होण्याच्या निमित्ताने नुकतेच स्वच्छता विषयावरचे विश्वव्यापी चर्चासत्र दिल्ली येथे पार पडले. या चर्चासत्रासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विशेष वक्ता म्हणून निमंत्रित केले होते. हा महाराष्ट्रातील स्वच्छतेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचा सन्मान होता. महाराष्ट्राने प्रधानमंत्री यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत साधारण दीड वर्ष अगोदर राज्याच्या हागणदारीमुक्तीची घोषणा केली. राज्यातील स्वच्छतेचे काम सर्व स्तरावरून पारखून घेतल्यानंतरच विविध पुरस्कार प्राप्त झाले.




**स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०१८ मध्ये उल्लेखनीय कामगिरीबद्दल केंद्राचा विशेष पुरस्कार केंद्रीय मंत्री उमा भारती यांच्या हस्ते स्वीकारताना सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष संजय शिंदे. सोबत पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री बबनराव लोणीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र भारूड व अन्य**

## पाणी दिलासा!

- दुष्काळी भागात टँकरने पाणीपुरवठा करण्याऐवजी तात्पुरत्या पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करून पिण्याचे पाणी पुरविण्यात येत आहे. थकीत वीजबिलापोटी बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजना सुरू करण्यासाठी थकित पाच टक्के बिल शासनामार्फत भरून या पाणीपुरवठा योजना कार्यान्वित केल्या जातील.

- पिण्याच्या पाण्याच्या टंचाईच्या कालावधीतच संबंधित कामे पूर्ण व्हावीत यासाठी निविदांचा कालावधी कमी करण्याचा निर्णय. यामुळे टंचाई निवारणासाठी विविध कामांसाठी कंत्राटदार नेमण्याची कार्यवाही लवकर होईल. त्यानुसार पाच लाख रुपयांपेक्षा कमी कामासाठीच्या निविदांचा कालावधी आठ दिवसांवरून पाच दिवस तसेच पाच लाख ते ५० लाख रुपयांपर्यंतच्या किमतीच्या कामासाठीच्या निविदांचा कालावधी १५ दिवसांवरून सात दिवस तसेच ५० लाख रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या कामासाठीच्या निविदांचा कालावधी २५ दिवसांवरून १० दिवस इतका कमी करण्यात आला आहे.

- विद्युतदेयके न भरल्याने विद्युतपुरवठा बंद केलेल्या सर्व नळ पाणीपुरवठा योजना सुरू करणार. त्यांचे १ वर्षाचे विद्युतदेयक शासन भरणार असून उर्वरित देयके पुनर्गठित करून देण्यात येतील.

- विहीर अथवा तलावांवरून पिण्याच्या पाण्याचे टँकर्स भरण्यासाठी वीज नसलेल्या अथवा भारनियमन कालावधीत वीज पुरवठा सुरळित नसलेल्या ठिकाणी डिझेलच्या जनरेटरचा वापर करण्यात येतो. यासाठी जिल्हा दरसूचीनुसार जनरेटरचे भाडे तसेच त्यासाठी लागणाऱ्या डिझेलचा खर्च टंचाई निधीतून भागवण्यास जिल्हाधिकाऱ्यांना मंजुरी देण्याचे अधिकार.

लाखांपेक्षा जास्त कुटुंबापर्यंत पोहोचलो. २०१६-१७ या आर्थिक वर्षात आपण १९ लाखांपेक्षा जास्त शौचालय सुविधा उभ्या करून इतिहास निर्माण केला. या अभियानात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे मंत्री या नात्याने मी कृती कार्यक्रमावर भर दिला. साधारणत: सर्व महसुली विभागात जाऊन गृहभेटी दिल्या. त्यामुळे यंत्रणेला सकारात्मक संदेश मिळाला आणि अशक्य वाटणारे उद्दिष्ट पूर्ण होण्यास सुरुवात झाली.

मागील काही वर्षात ग्रामीण जनतेचा जिव्हाळ्याचा उत्सव म्हणजे आषाढी वारी. या वारीतून प्रत्येक वारकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी, स्वच्छतेच्या या यज्ञात सहभागी करून घेण्यासाठी स्वच्छता दिंडी हा उपक्रम राबवत आहोत. लाखो भाविकांपर्यंत पोहोचण्याचा आणि लोककलेच्या माध्यमातून स्वच्छतेसाठी जागृती करण्याचा प्रयत्न करत आहोत. या दिंडीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस समारोप करतात आणि लोककलावंतांचा गौरव करतात.



**स्वच्छ भारत मिशनअंतर्गत 'स्वच्छ जालना, सुंदर जालना' मोहिमेत पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री बबनराव लोणीकर यांच्यासमवेत सहभागी झालेले नागरिक.**

## स्वच्छता ही सेवा

१५ सप्टेंबर २०१७ ते २ ऑक्टोबर २०१७ या कालावधीत 'स्वच्छता ही सेवा'हे देशव्यापी अभियान राबवले गेले. या अभियानात स्वच्छतेच्या कामाविषयी विविध उपक्रमांची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. वैयक्तिक शौचालयांची उभारणी, अभियानामध्ये व्यापक लोकसहभाग, नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन या मुद्यांच्या आधारे केंद्र सरकारने सर्व राज्यांचे मूल्यांकन केल्यानंतर महाराष्ट्र हे सर्वोत्कृष्ट राज्य म्हणून घोषित केले.

## स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण

केंद्र सरकारच्या वतीने अलीकडेच स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०१८ हा उपक्रम पार पडला. यामध्ये केंद्र सरकारने राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये त्रयस्थ संस्था निवडून अगदी बारकाईने गाव स्तरावर सर्वेक्षण केले.

सातारा जिल्हा देशातील प्रथम क्रमांकाचा स्वच्छ जिल्हा म्हणून निवडला गेला. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते सातारा जिल्हा परिषदेचा सन्मान झाला. केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते नाशिक व सोलापूर जिल्हा परिषदेचा 'नागरिकांचा प्रतिसाद' या घटकात विशेष सन्मान झाला. भारतातील पहिल्या दहा जिल्ह्यात महाराष्ट्रातील तीन जिल्ह्यांनी स्थान मिळवले आहे.

## स्वच्छतादर्पण

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यांसाठी 'स्वच्छता दर्पण' या नावाने देशस्तरावर मूल्यांकन करून जिल्ह्यांची क्रमवारी निश्चित केली गेली. यामध्ये देशस्तरावर प्रथम क्रमांकावर असलेल्या वर्धा, सिंधुदुर्ग सातारा, सांगली आणि कोल्हापूर या जिल्ह्यांचा २ ऑक्टोबर, २०१७ रोजी विज्ञानभवन, नवी दिल्ली येथे सन्मान करण्यात आला.

ही पुरस्काराची मालिका २०१४ ते २०१८ या काळात सुरूच राहिली. सर्व घटकांनी स्वच्छतेच्या चळवळीत सहभाग नोंदवला म्हणूनच सातत्याने महाराष्ट्राचा सन्मान होत आहे.

## शाश्वत स्वच्छतेचे आव्हान

अथक प्रयत्नातून उभ्या राहिलेल्या स्वच्छतेच्या सुविधा सातत्याने आणि नियमित वापरात येणे तसेच प्रत्येक व्यक्तीच्या मनात स्वच्छतेची जाणीव असणे हे यापुढील काळात एक मोठे आव्हान आहे. हे आव्हान पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने जबाबदारीने आणि नियोजनपूर्वक स्वीकारले आहे. प्रत्येक व्यक्तीच्या वर्तनात बदल व्हावा, त्यांनी स्वच्छता मनापासून स्वीकारावी यासाठी अनेक प्रकारचे प्रयत्न सुरू आहेत. प्रत्येक गावाचे स्वतंत्र नियोजन, त्या गावातील जबाबदाऱ्यांचे वाटप या प्रकारचे उपाय करण्यात येत आहे.

## शाश्वत स्वच्छता आराखडा

भविष्याचा वेध घेताना युनिसेफ, मुंबई आणि सामाजिक संस्थांच्या मदतीने प्रत्येक गावाचा शाश्वत स्वच्छतेचा आराखडा तयार करण्यात येत आहे. यामध्ये प्रत्येक गावाचे सूक्ष्म नियोजन करण्यात येत आहे.

शौचालय असणारे, नसणारे, नादुरुस्त असलेले, इतर स्वच्छतेच्या सुविधा, सांडपाणी व्यवस्थापनाच्या सुविधा, घनकचरा व्यवस्थापनाच्या सुविधा या बाबींचा बारकाईने अभ्यास करण्यात येत आहे. हा अभ्यास ग्रामस्थांच्या सहभागाने केला जात असल्याने गावाच्या स्वच्छता स्थितीचे लोकशिक्षण घडवण्यासाठी या व्यापक प्रक्रियेची मदत होत आहे. ही प्रक्रिया सुरू करणारे महाराष्ट्र हे देशातले एकमेव राज्य आहे. यासाठी जिल्हास्तरावर आणि तालुका स्तरावर मुख्य प्रशिक्षक तयार केले आहेत. हे मुख्य प्रशिक्षक गावस्तरावरच्या निवडक व्यक्तींना, स्वच्छाग्रहींना प्रशिक्षण देत आहेत.

## ग्राम स्वच्छता अभियान

ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमात ग्रामीण जनतेचा उत्स्फूर्त जनसहभाग वाढावा, या दृष्टिकोनातून राज्यातील ग्रामीण भागात 'संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान'

## पाणी दिलासा !

● काही ठिकाणी ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या उद्‌भवातून अन्य गावांसाठी पिण्याच्या पाण्याचे टँकर्स भरले जात असल्याने तेथील पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च वाढत जातो. अशा ठिकाणी नियमित विद्युत देयकापेक्षा जास्त विद्युत देयक येते. अशा वाढीव देयकाचा खर्च पाणीपुरवठा करणाऱ्या ग्रामपंचायतीला टंचाई निधीमधून देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपवण्यास मान्यता.





● प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सौरऊर्जेवर चालवणार.

● राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत यापुढे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सौरऊर्जेवर करण्यात येणार.

● प्रादेशिक पाणीपुरवठा योजना मोठ्या वीज बिलामुळे चालवण्यात अडचणी येतात. त्यावर उपाय म्हणून या योजना सौरऊर्जेवर रूपांतरित करण्यात येतील. रात्रंदिवस पंप चालवणे आवश्यक असणाऱ्या मोठ्या योजनांमध्ये सौरऊर्जा व महावितरणची वीज अशा दुहेरी पद्धतीने या योजना चालवण्यात येतील.

● टँकर मंजुरीचे अधिकार उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले असून ते तालुका स्तरावर हे अधिकार सोपवू शकतील.

सुधारित स्वरूपात राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत सर्व ग्रामपंचायतींचा जास्तीत जास्त सहभाग होण्याकरिता प्रत्येक ग्रामपंचायतीतील एका उत्कृष्ट प्रभागास, तसेच, जिल्हा परिषद गट, जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरावर उत्कृष्ट ग्रामपंचायतींची निवड करण्यात येणार आहे. राज्यातून उत्कृष्ट पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल. त्यासाठी प्रत्येक टप्प्यावर मोठ्या प्रमाणावर रोख रकमेचे पुरस्कार देण्यासाठी २०१८-१९ या वर्षासाठी रुपये ४७ कोटीचे पुरस्कार घोषित केले आहे. मागील वर्षाच्या तुलनेत पुरस्कारांच्या रकमेत भरीव वाढ करण्यात आली आहे.

### स्वच्छतेच्या पुढच्या दिशा

महाराष्ट्रात आणि देशभर प्राधान्याने ग्रामीण जनतेला वैयक्तिक शौचालयाच्या सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक होते. पात्र लाभार्थ्यांना हा लाभ पूर्णतः देण्यात राज्य सरकार यशस्वी झाले आहे. आता ग्रामीण जनतेला, घनकचरा हे संसाधन आहे, हे विकेंद्रित पद्धतीने त्याचे घरातच वर्गीकरण करणे, त्याचा पुनर्वापर करणे, कचरा कुजवून त्याचे खतामध्ये रूपांतर करणे आणि त्याचा उपयोग शेतीसाठी करणे, याबद्दल लोकशिक्षण घडवणे सुरू आहे! याबद्दलचे ज्ञान शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवण्याचे काम सध्या सुरू आहे!

यासोबतच गावस्तरावर सांडपाण्याचे जे प्रश्न आहेत ते छोट्या उपाययोजनांमधून सोडवण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहेत. कुटुंबाच्या स्तरावर परसबागा करणे, शोषखड्ड्यांमध्ये सांडपाणी मुरवणे यासारख्या उपाययोजना अनेक भागात सुरू आहेत. नांदेड जिल्ह्याने जादुई खड्ड्याच्या प्रयोगातून 'डासमुक्त गाव' ही मोहीम सुरू केली. सोलापूर जिल्हापरिषदेने या प्रकारच्या जादुई खड्ड्याच्या मोहिमेला व्यापक स्वरूप देत १ लाखापेक्षा जास्त जादुई शोषखड्डे करण्याचे नियोजन केले आहे! राज्यभर याची पुनरावृत्ती होईल, यासाठी प्रयत्न केले जात आहेत! ■■

## ग्रामीण पेयजल कार्यक्रम

● ग्रामीण भागातील पाणी पुरवठा क्षेत्रात सुधारणा करून व जनतेस शुद्ध आणि पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शासनाने ७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबवण्याचा निर्णय घेतला आहे.

● हा कार्यक्रम राज्यभरात २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षाच्या कालावधीत राबवण्यात येणार आहे.

### कार्यक्रमांतर्गत नवीन योजना

● या कार्यक्रमांतर्गत एकूण १००३ नवीन पाणीपुरवठा योजना राबवण्यात येणार आहेत. याकरिता चार वर्षाच्या कालावधीत रु.२००० कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या योजनांचा लाभ २०४६ गावे/वाड्यां-वस्त्यामधील ४७.५८ लाख नागरिकांना होणार आहे.

● ऑक्टोबर २०१८ अखेर नव्याने घ्यावयाच्या रु.१६०० कोटी इतक्या किमतीच्या ७८० नवीन नळ पाणी पुरवठा योजनांना मंजुरी देण्यात आली. या पाणीपुरवठा योजनांचा लाभ १६७१ गावे/वाड्यां-वस्त्यामधील ३७.८१ लाख नागरिकांना होईल. ● मंजुरी देण्यात आलेल्या ७८० पाणीपुरवठा योजनांपैकी ६२२ योजनांची कामे प्रगतिपथावर आहेत. ६२२ पैकी ८८ योजनांतून पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

### बंद योजनांचे पुनरुज्जीवन

● अन्य कार्यक्रमांतर्गत राबवण्यात आलेल्या परंतु सद्य:स्थितीत बंद असलेल्या ८३ प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पुनरुज्जीवित करण्यात येतील. त्याकरिता

रु.१३०.८६ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात येईल. या योजनांचा लाभ २१.५५ लाख नागरिकांना होईल.

- सद्य:स्थितीत बंद असलेल्या ८३ योजनांपैकी ४८ कोटी रुपये इतक्या किमतीच्या २३ प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पुनरुज्जीवित करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या सर्व योजनांच्या कामाचे कार्यादेश देण्यात आले असून योजनांची कामे प्रगतिपथावर आहेत. या योजनांचा लाभ १९७ गावे/ वाड्यावस्त्यांमधील ४.२० लाख नागरिकांना होणार आहे.

### प्रादेशिक योजनांची देखभाल दुरुस्ती

- या कार्यक्रमांतर्गत प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीकरिता २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीत प्रत्येक वर्षी रु.१०० कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

- विभागाच्या २६ नोव्हेंबर २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये हा निधी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांना प्रोत्साहनपर अनुदानाच्या स्वरूपात (पाणीपट्टी आकारणी व वसुलीच्या प्रमाणात) वितरित करण्यात येईल.

## राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम हा केंद्र शासनाचा 'फ्लॅगशीप कार्यक्रम आहे. त्याची अंमलबजावणी राज्यात २००९-१० पासून करण्यात येत आहे. या कार्यक्रमाची मुख्य उद्दिष्टे प्रत्येक ग्रामीण व्यक्तीस, स्वयंपाकासाठी आणि घरगुती वापरासाठी शुद्ध, पुरेसा आणि शाश्वत पाणी पुरवठा सर्वकाळ आणि सर्व परिस्थितीत सोयीच्या ठिकाणी उपलब्ध करून देणे अशी आहे.



कसबा (जि. बीड) येथील तळेकर वस्तीवर सौर ऊर्जा पंप बसवल्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी महिलांची होणारी फरपट थांबली आहे.

या कार्यक्रमांतर्गत आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस राज्यातील वाड्या/वस्त्यांची संख्या व त्यांची पेयजल स्थिती अद्ययावत करण्यात येते. त्यानुसार अंशत: हाताळलेल्या व गुणवत्ता बाधित गावे/ वाड्यांसाठी उपलब्ध निधी विचारात घेऊन कृती आराखडा तयार करण्यात येतो. या कृती आराखड्यास राज्यस्तरीय योजना मंजूर समितीची मान्यता घेऊन त्यानुसार अंमलबजावणी करण्यात येते.

या योजनेंतर्गत ७९५२ कोटी रुपये इतक्या खर्चाचा वार्षिक कृती आराखडा २०१८-१९ अंतिम करण्यात आला आहे. या आराखड्यामध्ये ६६२४ योजनांतर्गत एकूण १०,५८३ गावांचा (वाड्या/ वस्त्या) समावेश करण्यात आला आहे. राज्यातील जलस्रोत दूषित असलेल्या भागात शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आर.ओ. संयंत्रे तसेच डिफ्लोरिडेशन संयंत्रे बसवण्यात आली आहेत.

### ग्रीड पद्धतीने पाणी पुरवठा

मराठवाडा विभागातील टंचाई परिस्थितीवर मात करून, विभागात कायमस्वरूपी पिण्याच्या पाणी पुरवठ्याच्या व्यवस्थेसह, औद्योगिक पाणीपुरवठा तसेच शेतीसाठी पाणी पुरवठ्याचा या योजनेत समावेश आहे. मराठवाडा विभागासाठी या पद्धतीने पाणीपुरवठा करण्याच्या योजनेस ६ डिसेंबर, २०१६ रोजी मंजुरी दिली आहे. त्यासाठी इस्रायल शासनाच्या 'मेकोरोट' या कंपनीसोबत करार करण्यात आलेला आहे. ही कंपनी मराठवाड्यातील पाणी पुरवठ्याचा बृहत आराखडा सादर करेल. यामध्ये मराठवाड्यातील भूपृष्ठावरील पाणी, भूजल, पर्जन्यमान या सर्व गोष्टींचा समग्र अभ्यास करून मराठवाड्यातील पिण्याचे पाणी, उद्योगासाठीचे पाणी व सिंचनासाठी लागणाऱ्या पाण्याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करण्यात येईल.

**शब्दांकन : दत्तात्रय कोकरे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**दत्तात्रय कोकरे**

जलस्वराज्य-२ कार्यक्रमासाठी जागतिक बँकेकडून मिळणारे अर्थसाहाय्य हे उद्दिष्टपूर्ती आधारित निधी संवितरण निर्देशकांशी निगडित आहे. असा उपक्रम राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

## विविध उपक्रम

जलस्वराज्य-२ हा कार्यक्रम सहा महसूल विभागातील प्रत्येकी दोन याप्रमाणे कोकण-रायगड, रत्नागिरी, नाशिक-जळगाव, अहमदनगर, पुणे-पुणे, सातारा, औरंगाबाद-औरंगाबाद, नांदेड, अमरावती-अमरावती, बुलढाणा, नागपूर-नागपूर, चंद्रपूर. या १२ जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येणार आहे.

या कार्यक्रमामधील भौतिक गुंतवणूक, पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्राचे बळकटीकरण, शहरालगतच्या भागातील जनतेला वाढीव पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या सेवा सुविधा पुरवणे या तीन घटकांमार्फत करण्यात येईल. पाणी गुणवत्ता बाधित गावे वाड्या/वस्त्यांसाठी रासायनिक दूषितीकरण सौम्य करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना, दुर्गम किंवा पाणी टंचाई असलेल्या भागांमध्ये पर्जन्यजल साठवण उपाययोजना आणि अतिशोषित पाणलोट क्षेत्रामध्ये जलधर स्तरावर पाणी व्यवस्थापन विकसित करण्यात येईल.

शहरालगतच्या भागातील जनतेला वाढीव पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या सेवा सुविधा पुरवल्या जातील. जलस्वराज्य-(२) कार्यक्रम मागणी आधारित तत्त्वावर असून, प्रत्येकी ५० कोटी रुपये इतक्या रकमेच्या पाणीपुरवठा योजना हाती घेण्यात येत आहेत. शहरालगतच्या ग्रामपंचायती निश्चित करून ७० लि. दरडोई दरदिवशी पाणी पुरवठा सेवा उपलब्ध करून देण्याबाबतच्या सुधारित/नवीन पाणी पुरवठा उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात येईल. शहरालगतच्या योजनेमध्ये स्वयंचलित जलमापकासह १०० टक्के वैयक्तिक नळजोडण्या देण्यात येतील. त्याद्वारे दिवसातून किमान ८ तास व ७ मीटर दाबाने शुद्ध पाणीपुरवठा केला जाईल. या योजनेच्या कामांची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत व सामाजिक उपक्रम जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येत आहे.

शहरालगतच्या भागातील ५०८ कोटी रुपये किंमतीच्या ५९ योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये एकूण ८६१६५ नळ जोडण्या अपेक्षित आहेत. ५९ योजनांपैकी ५० योजनांचे कार्यादेश देण्यात आले आहेत. यातील ४४ योजनांची कामे सुरू करण्यात आली आहेत.

- ५०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या टंचाईग्रस्त गावांसाठी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत उपाययोजना करण्यात येत आहेत.

१२ जिल्ह्यांतील ५०० पेक्षा कमी लोकसंख्येची १०२ टंचाईग्रस्त गावे हाताळावयाची असून, या गावांना टंचाई कालावधीसाठी शुद्ध व शाश्वत पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात येईल. उपरोक्त १०२ योजनांपैकी ९४ योजनांच्या अंमलबजावणीसाठी कार्यादेश देण्यात आले. त्यापैकी ६३ योजना पूर्ण झाल्या असून ३१ योजना प्रगतिपथावर आहेत.

**पाणी गुणवत्ता बाधित गावे/वाड्या/वस्त्यांसाठी रासायनिक दूषितीकरण सौम्य करण्यासाठी करावयाच्या कमी खर्चाच्या उपाययोजना.**

या उपक्रमात ११२ गावांची निवड अंतिम करण्यात आली असून, ४६ ठिकाणी विविध क्षमतेचे आर.ओ. युनिट आणि ४० ठिकाणी डिफ्लोरिडेशन युनिट बसवण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. याकरिता पाणी व स्वच्छता साहाय्य संस्था यांच्यामार्फत कार्यादेश देण्यात आले आहेत. या योजनांपैकी ८६ योजनांच्या अंमलबजावणीसाठी कार्यादेश देण्यात आले. त्यापैकी ४३ योजना पूर्ण झाल्या असून ३६ आर.ओ. व ७ डिफ्लोरिडेशन योजना प्रगतिपथावर आहेत.

## प्रयोगशाळा बळकटीकरण

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या आधिपत्याखालील १८३ (१४८ उपविभागीय, २८ जिल्हास्तरीय, ६ विभागीय व १ राज्यस्तरीय) प्रयोगशाळांचे बळकटीकरण जलस्वराज्य-(२) कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित आहे. या उपक्रमांतर्गत विभागीय प्रयोगशाळांना अद्ययावत उपकरणे उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

३ विभागीय प्रयोगशाळांचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. २७ जिल्हा

**महाराष्ट्रातील प्रत्येक गाव, खेडे, वाड्या आणि वस्त्यांना शाश्वत पाणी पुरवठा व्हावा, यासाठी प्रत्येक गावाला पाणी पुरवठा योजना देऊन गाव टंचाईमुक्त आणि टँकरमुक्त करण्यात येणार आहे. त्या दृष्टीने गेल्या चार वर्षात अनेक पाणी पुरवठा योजना सुरू करण्यात आल्या. जागतिक बँकेच्या साहाय्याने जलस्वराज्य-२ कार्यक्रम, २०१४-२०२० या सहा वर्षांच्या कालावधीकरिता राबवण्यात येत आहे. ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता सेवा सुविधांचे नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण व शाश्वतता इत्यादी बाबी साध्य करणे हे जलस्वराज्य कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे.**

# स्वच्छ, शाश्वत आणि सुरक्षित पाणी

## निरीक्षण विहिरींचे जाळे

या उपक्रमांतर्गत सर्व गावांमध्ये निरीक्षण विहिरींची स्थापना करण्यात आली आहे. यापूर्वी केवळ ३००० निरीक्षण विहिरींची स्थापना झाली होती. गेल्या चार वर्षात एकूण ३३,४२४ गावांमध्ये निरीक्षण विहिरी स्थापन करण्यात आल्या आहेत. या निरीक्षण विहिरींच्या नोंदी जलसुरक्षकामार्फत घेण्यात येतात. या माहितीचे आदानप्रदान तसेच टंचाई घोषित करण्यासाठी संकेतस्थळ विकसित करण्याचे काम प्रगतिपथावर असून त्यावर ३० जिल्ह्यांची माहिती देण्यात आली आहे. (http://mrsac.maharashtra.gov.in/mahagsda/)




नागपूर महसूल विभागातील १११ ग्रामीण पाणीपुरवठा योजनांचे ई-भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. सोबत पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री बबनराव लोणीकर, ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव श्यामलाल गोयल आदी.

प्रयोगशाळांच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. १८ प्रयोगशाळांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. ७ प्रयोगशाळांचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. उपविभागीय प्रयोगशाळांचे बांधकाम देखील प्रस्तावित आहे.

## जलवेधशाळा बळकटीकरण

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत भूजल परिमाणकांचा अभ्यास करण्याकरिता ६ विभागात १० जलवेध शाळा प्रस्थापित करण्यात आल्या आहेत. या शाळांचे बळकटीकरण तसेच या सर्व जलवेधशाळा व अतिरिक्त २ अशा १२ ठिकाणी स्वयंचलित हवामान केंद्रे उभारण्यात येणार आहेत. सद्य:स्थितीत मठा, (जि. जालना) येथे एस स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्यात आले आहे.

# टंचाईबाबतची उपाययोजना

महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ कलम २५ व २६ च्या तरतुदीनुसार संबंधित जिल्हाधिकारी पावसाळ्याच्या कालावधीत किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या सल्ल्यानुसार किंवा पावसाचे प्रमाण व स्वरूप आणि पाणलोट क्षेत्रातील पाण्याच्या पातळीची माहिती किंवा अन्य कोणतीही संबंधित बाब लक्षात घेऊन अशा क्षेत्रास पाणीटंचाई क्षेत्र म्हणून घोषित करू शकतात.

## टंचाई कृती आराखडे

पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ या विभागाच्या स्थायी आदेशाद्वारे सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी पावसाळा संपल्यानंतर पाणी टंचाई (२० लीटर्स/दीन /व्यक्तीपेक्षा कमी) भासण्याची शक्यता असणारी गावे/ वाड्या निश्चित करून संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडून मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद व वरीष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्याशी विचारविनिमय करून १) ऑक्टोबर ते डिसेंबर २) जानेवारी ते मार्च ३) एप्रिल ते जून अशा तीन तिमाहीसाठी टंचाई कृती आराखडे तयार करण्यात येतात.

टंचाई निवारणाकरिता ■ विहीर खोल करणे, विहिरीतील गाळ काढणे ■ खासगी विहिरींचे अधिग्रहण ■ टँकर/बैलगाडीद्वारे पाणीपुरवठा ■ प्रगतिपथावरील पाणी पुरवठा योजनेची कामे तातडीने पूर्ण करणे ■ नळ योजनांची विशेष दुरुस्ती ■ विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती ■ विंधण विहिरी ■ तात्पुरत्या पूरक नळयोजना ■ धरणामध्ये अथवा तलावामध्ये चर खणणे या उपाययोजना करण्यात येतात.

## निधी वाटप

■ २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये ४५९ कोटी रुपये, २०१६-१७ मध्ये ५२३ कोटी रुपये, २०१७-१८ मध्ये २३४ कोटी रुपये निधी वितरित करण्यात आला आहे.

■ २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये प्राप्त झालेल्या मागणीनुसार पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ राबवण्यात येणाऱ्या व राबवलेल्या उपाययोजनाकरिता कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या विभागांना निधी वितरित करण्यात आला आहे.

राज्यात २१ जानेवारी २०१९ रोजी १६ जिल्ह्यातील ८८ तालुक्यात एकूण १४६१ गावे व ३२४३ वाड्यांमध्ये एकूण १७८६ टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरू आहे.

राज्यात २१ जानेवारी २०१९ रोजी एकूण १८५४ खासगी विहिर / विंधन विहीर अधिग्रहित करून त्याद्वारे टंचाईग्रस्त गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरू आहे. ग्रामीण/नागरी भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ उपाययोजना घेताना पशुधनास लागणाऱ्या पिण्याच्या

पाण्याची गरज लक्षात घेतली जाणार आहे.

जिल्हास्तरावर टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात टंचाई नियंत्रण व समन्वयासाठी एक स्वतंत्र कक्ष उप जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली निर्माण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## अशी करणार टंचाईवर मात

**विहीर अधिग्रहण दरवाढ :** पिण्याच्या पाण्यासाठी खासगी विहीर अधिग्रहित केल्यानंतर विद्युत/डिझेल पंप व कनेक्शनसह प्रतिदिन रु.४००/- व विद्युत/डिझेल पंप व जोडणी सामग्रीविना प्रतिदिन रु.३००/-संबंधित शेतकऱ्याला मिळत होते. टंचाईची परिस्थिती, उपलब्ध पाण्याचा तुटवडा तसेच पाण्याअभावी संबंधित शेतमालकाचे होणारे नुकसान गृहीत धरून ३० नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये या रकमेमध्ये ५० टक्के वाढ करून प्रतिदिन रु.६००/- व साधन सामग्रीविना प्रतिदिन रु.४५०/- इतकी दरवाढ करण्यात आली आहे. तथापि बऱ्याच ठिकाणी बागायती पिकाचे व दीर्घायुषी फळझाडांचे नुकसान होत असल्याने यामध्ये पुन्हा वाढ करून साधन सामग्रीसह प्रतिदिन रु.८००/- व साधन सामग्रीविना प्रतिदिन रु.६००/- इतकी दरवाढ करण्यात येणार आहे.

## अधिकारात बदल

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजना :**

- कार्यकारी अभियंता- ५० लाख रुपये
- अधीक्षक अभियंता - २ कोटी रुपये
- मुख्य अभियंता - ३ कोटी रुपये
- सदस्य सचिव, म.जी.प्रा.- ३ कोटी रुपये.

जिल्हा परिषदेमार्फत राबवण्यात येणाऱ्या उपाययोजनांसाठी स्वतंत्र व प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठ्यासाठी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी



अधिकारी यांना ७.५ कोटीपर्यंतचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. ७.५ कोटीहून अधिक रकमेचे निविदा स्वीकृतीचे अधिकार सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्रदान करण्यात आले आहेत. यामुळे टंचाई अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या विविध उपाययोजना टंचाई कालावधीतच पूर्ण करून पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी मदत होईल.

**निधी वाटपात सुटसुटीतपणा :** मदत व पुनर्वसन विभागाकडून प्राप्त होणारा निधी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून विभागीय आयुक्त यांचेकडे व विभागीय आयुक्तांकडून जिल्हाधिकाऱ्यांकडे आणि जिल्हाधिकाऱ्यांकडून संबंधित जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तसेच संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडे वितरित केला जात होता. यामध्ये सुलभता आणून विभागीय आयुक्तांमार्फत थेट जिल्हा परिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व संबंधित नागरी स्वराज्य संस्था यांच्याकडे वितरित करण्यात येणार आहे. यामुळे निधी वितरणातील कालापव्यय कमी होणार आहे.

**टंचाई निधीमधून विद्युत देयके अदा :** दुष्काळी भागातील सर्व नळ पाणी पुरवठा योजनांच्या थकीत विद्युत देयकांच्या मुद्दल रकमांपैकी ५ टक्के रक्कम शासनाकडून भरण्यात येईल. तसेच पाणीपुरवठा सुरू करण्यात येईल व नोव्हेंबर, २०१८ ते जून, २०१९ या आठ महिन्यांच्या कालावधीतील चालू देयक टंचाई अंतर्गत शासनामार्फत भरण्यात येणार आहे. यासाठी २४.५० कोटी रुपये जिल्ह्यांना वितरित करण्यात आले आहेत.

**जनरेटरचा खर्च :** टंचाई अंतर्गत सर्व उपाययोजना तातडीने पूर्ण करण्याच्या अनुषंगाने निविदा सूचनेचा कालावधी कमी करून व रु.५ लाखांसाठी फक्त ५ दिवस, ५ ते ५० लाखापर्यंत ७ दिवस व ५० लाखांपेक्षा अधिक किमतीच्या कामासाठी १० दिवसांची अल्प सूचना निविदा प्रसिद्ध करण्यास मान्यता प्रदान केली आहे. टँकर भरण्यासाठी वीज नसलेल्या अथवा भार नियमन कालावधीत डिझेल जनरेटरचा (जनित्रांचा) वापर करून डिझेलचा खर्च व जनरेटरचे भाडे टंचाई निधीतून भागवण्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे. पाणीपुरवठा योजनांच्या उद्‌भवातून इतर गावांच्या पिण्याच्या पाण्याचे टँकर्स भरले जातात. त्या गावाच्या विद्युत देयकाचा खर्च टंचाई निधीमधून संबंधित ग्रामपंचायतीला अदा करण्याची मान्यता देण्यात आली आहे.

### नागरी क्षेत्रातील पाणी टंचाई

नागरी क्षेत्रामध्ये दरडोई दरदिवशी नियमित मिळणाऱ्या पाणीपुरवठ्यापेक्षा ५० टक्के किंवा त्यापेक्षा कमी अथवा दरडोई दरदिवशी ५० लीटर एवढाच पाणीपुरवठा प्रत्यक्षात होत आहे. यापैकी जे कमी असेल तेथे पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ उपलब्ध पाण्यामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने विहित उपाययोजना करण्यात येतात. जानेवारी २०१९ ते मार्च २०१९ तसेच एप्रिल २०१९ ते जून २०१९ या कालावधीचे जिल्हानिहाय टंचाई कृतिआराखडे तयार करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**औरंगाबाद जिल्ह्यात खुलताबाद तालुक्यातील वेरूळ,पळसवाडी परिसरातील ४० शेतकऱ्यांनी आणि मलकापूर, कसाबखेडा, सहजतपूर येथे ५० शेतकऱ्यांनी आदर्श सेंद्रिय शेतकरी गट स्थापन करून सेंद्रिय शेतीचा मार्ग अवलंबला आहे. १४० एकरांवर प्रायोगिक तत्त्वावर स्वत:च्या शेतात चांगल्या प्रकारे या शेतीचे प्रयोग केले आहेत. टाकळी राजाराय, कानडगाव, घोडेगाव येथील शेतकरीदेखील स्वेच्छेने अशी शेती करत आहेत. कमी खर्चाच्या आणि अधिक उत्पन्नाच्या शोधात असलेल्या शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीचे हे मॉडेल म्हणजेच नवीन तीर्थक्षेत्रे वाटत आहेत.**

# कमी खर्च, अधिक उत्पन्न

**विजय चौधरी**

मुळातच पारंपरिक पद्धतीने शेतीचा व्यवसाय करण्याची पद्धत देशाच्या सर्वच भागात रूढ आहे. नैसर्गिक शेतीचे प्रयोग गेली ३० – ३५ वर्षांपासून सुरू आहेत. सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून निसर्गाचा लहरीपणा व बाजारभावाची अनिश्चितता या दोन्ही विषम परिस्थितीत सापडलेला शेतकरी पावसावर आधारित शेती करत असल्याने तसेच आजची शेती महागडी झाल्याने शेतकरी मेटाकुटीला येत आहे. रासायनिक खतांचा वाढता वापर आणि संकरित बियाणांमुळे शेतीच्या लागवड खर्चात दिवसेंदिवस वाढ होत आहे. मात्र त्या तुलनेने हाती येणारे उत्पादन फार कमी असल्याने शेतकऱ्यांना शेती करणे परवडत नाही. शिवाय रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे मानवी आरोग्यावर दुष्परिणाम होत आहेत. या सर्वांना सक्षम पर्याय म्हणून पर्यावरणपूरक सेंद्रिय शेतीचा पर्याय पुढे आला आहे. या शेतीचे महत्त्व शेतकऱ्यांना पटू लागल्याने खुलताबाद तालुक्यातील ९० शेतकऱ्यांच्या गटाने १०० एकर क्षेत्रावर या शेतीची कास आहे.

अधिक उत्पादन घेण्याच्या लालसेमुळे रासायनिक खतांचा अधिक वापर केला जातो आहे. परिणामी जमिनीची उत्पादकता कमी होत आहे. रासायनिक खते व कीटकनाशकांच्या माध्यमातून घेतलेल्या पिकांमुळे विविध आजारांचे प्रमाण वाढत असल्याची बाब एका सर्वेक्षणात पुढे आली आहे. या सर्व प्रकाराला पायबंद घालण्यासाठी सेंद्रिय आणि नैसर्गिक शेती करण्याचे आवाहन कृषी विभागाच्या वतीने केले जात आहे. ही बाब शेतकऱ्यांना पटू लागल्याने ते सेंद्रिय शेतीच्या लागवडीकडे वळत आहेत.





## शेतकरी गट

प्रकल्प संचालक आत्मांतर्गत परंपरागत कृषी विकास योजना सेंद्रिय शेतीमध्ये खुलताबाद तालुक्यातील अनेक गावांमध्ये ९० शेतकरी गट स्थापन करण्यात आले. या एका गटांमध्ये ४० ते ५० शेतकऱ्यांचा समावेश आहे. या गटांना आत्मांतर्गत प्रशिक्षण, शेतकरी सहल, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, सेंद्रिय कीटकनाशके, बुरशीनाशके, आणि सेंद्रिय खते यांचे युनिट उभारण्याकरिता साहित्य, उपकरणे आदीचे

प्रशिक्षण दिले आहे. शेतकऱ्यांना पीजीएसमार्फत प्रमाणीकरण मिळण्यासाठी ऑनलाइन नोंदणी केली आहे. जेणेकरून उत्पादनाबाबत खात्रीशीर बाजारपेठ उपलब्ध होऊन आत्मविश्वास वाढेल, अशी सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे.

## सेंद्रिय शेतमालाबाबत जनजागृती

सेंद्रिय शेतीचे महत्त्व व जमिनीच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण केली आहे. नावीन्यपूर्ण कार्यक्रमांमुळे सेंद्रिय शेतीकडे शेतकऱ्यांना वळवण्यास आणि सेंद्रिय शेतमालाबाबत जनजागृती करण्यास मदत होत आहे. सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये शेतकरी कृष्णा पांडव, राजेश इंगळे, जयश्री इंगळे, सीताराम वाघ, नारायण वाघ, सुखराम चव्हाण यांचा विशेष उल्लेख करावा लागेल.

## शेतकरी ते ग्राहक थेट विक्री

सर्व शासकीय अधिकारी व व्यापारी गटांमार्फत वेगवेगळ्या स्तरांवरून सेंद्रिय भाजीपाला, कडधान्यांची, अन्नधान्याची मागणी येत आहे. सेंद्रिय अन्नधान्याची चव चाखलेल्या ग्राहकांकडून सेंद्रिय पद्धतीने वाढवलेला भाजीपाला, फळे यांची मागणी वाढत असल्याचे राजेश इंगळे या शेतकऱ्यांने सांगितले.


## शेतकऱ्यांचा पुढाकार

सेंद्रिय शेती करण्यासाठी पुढे आलेले शेतकरी हे वेरूळ, कसाबखेडा, मलकापूर, सहजतपूर गावातील आहेत. या गावातील शेतकरी मागील १७ वर्षांपासून या शेतीकडे वळले आहेत. तालुक्यात सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे ९० गट तयार करण्यात आले आहेत. कृषी विभागाच्या वतीने आत्मांतर्गत त्यांची गट नोंदणी करून त्यांना तीन वेळा प्रशिक्षण देण्यात आले आहे.

नैसर्गिक शेतीच्या कानमंत्राबाबत शेतकरी कृष्णा पांडव यांनी सांगितले की, आपल्याकडील पारंपरिक बियाणे आणि नैसर्गिक पद्धतीने शेती प्रयोग योग्य प्रकारे व्हावा, यासाठी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रोत्साहन दिल्याने, खुलताबाद तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेती करण्यासाठी पुढाकार घेतला. कोरडवाहू शेतीत महागडी बियाणे, खते, कीटकनाशके औषधे वापरली आणि पावसाने दगा दिला तर उत्पादनात एकदम घट येते. झालेला खर्च निघत नाही. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होतो. त्याऐवजी खर्चीक बियाणे ,खते न वापरता, कर्ज न घेता अत्यंत कमी खर्चात सेंद्रिय शेतीतून निव्वळ उत्पन्न शेतकऱ्यांना फायद्याचे ठरते.

## भाजीपाल्यातून आर्थिक समृद्धी

या भागात शेतात शेततळे खोदण्यात आले. त्याद्वारे पारंपरिक पीक पद्धतीच्या जोडीला भाजीपाला उत्पादनास सुरुवात झाली. या पिकांशी जुळलेली ग्रामस्थांची नाळ आजही कायम आहे. औरंगाबाद



शहरात सिडको येथे फ्रेश वेजेस नावाने राजेश इंगळे यांनी सेंद्रिय पद्धतीने पिकवलेला माल थेट ग्राहकांसाठी विक्रीला ठेवला आहे. वेरूळ परिसरातून टमाटर, मिरची, वांगी, कोबी, शेवगा, कारले, गवार, भेंडी, डांगर विक्रीला जाते. शेतकऱ्यांच्या अर्थार्जनाचे साधन सेंद्रिय भाजीपाला आणि नैसर्गिक फळेपिके आहे. बारमाही घेतल्या जाणाऱ्या या भाजीपाला पिकांसाठी लागणाऱ्या पाण्याची सोय शेततळ्याच्या माध्यमातून झाली आहे. पाण्याचा नियोजनबद्ध वापर करण्याच्या उद्देशाने बहुतांश शेतकऱ्यांनी ठिबकचा पर्याय निवडला आहे.

मागील दोन वर्षांपासून सेंद्रिय – शेतमाल उत्पादनासाठी काम करत आहे. शेतातील गवत, काडी–कचरा न जाळता त्यापासून उत्कृष्ट खत तयार होत आहे . गांडूळ खत, जिवामृत, दशपर्णी अर्क याद्वारे एकूण क्षेत्रापैकी चार एकर क्षेत्रात पिकाचे संगोपन करून उत्पादन घेत आहे. रासायनिक खते औषधीचा वापर कमी करून सेंद्रिय खते औषधींचा वापर केल्यामुळे खर्चात बचत होत आहे. चांगल्या प्रतीचे शेतमाल उत्पादन होत आहे. यावर्षी मोसंबी, शेवगा, तूर, डांगर ही पिके घेण्यात आली आहे.

औरंगाबादचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. तुकाराम मोटे, वैजापूरचे उपविभागीय कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, खुलताबादचे तालुका कृषी अधिकारी वैजनाथ हंगे, मंडळ कृषी अधिकारी अशोक अहिरे , कृषी पर्यवेक्षक जी.जी. मुंडे, कृषी साहाय्यक भारत जाधव, आत्माचे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक प्रदीप पाठक, साहाय्यक पल्लवी गायकवाड यांचे मार्गदर्शन मिळाल्यामुळे सेंद्रिय शेतीतून उत्पादित शेतमालाची औरंगाबाद शहरात विक्री करणे शक्य झाले असल्याचे शेतकरी राजेश इंगळे यांनी सांगितले. यासाठी त्यांनी व्हॉट्सॲप तसेच फेसबुकसारख्या समाजमाध्यमाचा वापर केला असून त्याद्वारे फोनवर मागणी वाढत आहे. परंतु सेंद्रिय शेतमाल उत्पादनास मर्यादा असल्याने पाहिजे तेवढा पुरवठा होत नाही. म्हणून आम्ही औरंगाबादला सिडको कनॉट प्लेस येथे साधारण भाजीपाला फळे 'फ्रेश व्हेजीस' या ब्रँडखाली घरपोच विक्री व पॅकिंग व्यवसाय चालू केला आहे. सध्या दररोज साडेचार ते पाच क्विंटलपर्यंत पुरवठा केला जातो. त्यालाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. सेंद्रिय शेतमाल उत्पादन वाढवण्यासाठी जवळपासच्या शेतकऱ्यांकडून शेतमाल उत्पादित करून त्यांना कायम हमीभाव मिळवून देणे व शहरातील ग्राहकांना विषमुक्त शेतमाल रास्त दरात उपलब्ध करून देणे, विषमुक्त अन्नधान्य, फळे, भाजीपाला यासाठी पण हेच उद्दिष्ट ठेवले आहे. औरंगाबाद शहरात सिडको एन – ३ भागात व वेरूळ येथे जय बाबाजी कॉम्प्लेक्समध्ये स्वतंत्र सेंद्रिय शेतमाल विक्री केंद्र सुरू करत असल्याचे राजेश इंगळे यांनी सांगितले.

**महाराष्ट्र टाइम्स प्रतिनिधी, खुलताबाद**



# नवे तंत्र, गतिमान विकास...

**कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) ही भारतातील उद्योजकांची शिखर संस्था. या संस्थेमार्फत दरवर्षी जागतिक परिषदेचे आयोजन केले जाते. या वर्षी ही २५ वी परिषद होती. मुंबईला आयोजक होण्याचा मान या वर्षी पहिल्यांदाच मिळाला. यंदा 'न्यू इंडिया रायजिंग ग्लोबल ओकेजन्स' ही या परिषदेची संकल्पना होती. केंद्र शासनाचा वाणिज्य विभाग, राज्य शासन आणि सी.आय.आय. यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या या परिषदेमध्ये जगभरातील ४० देशांतील सुमारे एक हजार उद्योजक, गुंतवणूकदारांनी सहभाग घेऊन विविध क्षेत्रात काम करण्याची तयारी दर्शवली.**

**अर्चना शंभरकर**

दुष्काळ, नैसर्गिक आपत्तीमुळे शेती आणि शेतकरी संकटात आहे. हे संकट दूर करण्यासाठी या क्षेत्रात क्रांती होण्याची गरज आहे. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला योग्य बाजारपेठ मिळत नाही, त्यामुळे केलेला खर्च भागवताना शेतकऱ्यांना अडचणी येतात. आपल्याकडील बहुतांश शेतकरी अल्पभूधारक आहेत. ७० टक्क्यांहून अधिक शेतकऱ्यांकडे दोन किंवा तीन हेक्टर शेती आहे. निसर्गाने साथ दिल्यास शेतकऱ्यांच्या हाती थोडेफार उत्पन्न येते. तसे न झाल्यास शेती तोट्यात जाते. आज देशात शेती तोट्यात जाण्याची शक्यता अधिक आहे. त्यावर मार्ग काढण्यासाठी शासनस्तरावर विविध उपाय योजले जात आहेत. या उपाययोजनांवर या परिषदेत देश-विदेशातील जाणकारांशी चर्चा केली.

कृषी मूल्यवर्धन करण्यासाठी शेतकऱ्यांनी पारंपरिक शेती पद्धतीत बदल करून घेण्याची गरज आहे. शेतमालाला भाव मिळत नसेल तर शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन कृषी उत्पादन कंपन्या स्थापन कराव्यात, त्यासाठी शासन सर्वोतोपरी सहकार्य करण्याच्या तयारीत आहे. शासनाने शेतकरी उत्पादक कंपन्यांना औद्योगिक वसाहतीमध्ये भूखंड देण्याचा निर्णय घेतला आहेत. यामुळे शेतमालाला योग्य भाव मिळणार असून शेतमाल वाया जाण्याची शक्यता कमी होऊ शकते. उत्पादित मालावर प्रक्रिया करण्याचा पर्यायदेखील शेतकऱ्यांनी अजमावण्याची गरज आहे. ज्या भागात एखाद्या शेतमालाचे उत्पादन अधिक होते, तेथे प्रक्रिया केंद्र सुरू झाल्यास मालाला योग्य भाव मिळू शकतो. त्यामुळे प्रक्रिया उद्योगांसाठी शेतकऱ्यांनी पुढे येण्याची गरज आहे. हा या परिषदेत विविध परिसंवादातून सूर उमटला.

### अरब राष्ट्रांसोबत करार

महाराष्ट्र कृषी क्षेत्रात क्रांती करणारे राज्य आहे. येथे मुबलक प्रमाणात कृषिमालाचे उत्पादन घेतले जाते. भाजीपाला, कडधान्य, मांस आदी क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर आहे. अरब राष्ट्रांमधून भारतातील या पदार्थांना मोठी मागणी आहे. त्यामुळे युएईच्या प्रतिनिधींनी अन्न सुरक्षेवर काम करण्यात स्वारस्य दाखवले आहे. त्यासाठी भारतासोबत करार करण्याचा निर्णय घेतला. यामुळे दोन्ही देशातील कृषी उत्पन्नातील देवाणघेवाणाची ही क्रांती ठरेल.

कुक्कुटपालन क्षेत्रात राज्यात काम करण्यास मोठी संधी आहे. महाराष्ट्राला दररोज दोन कोटी अंडी लागतात. ती

परराज्यातून मागावे लागतात. महाराष्ट्रात कुक्कुटपालन व्यवसायाची वृद्धी झाल्यास यातून कोट्यवधींची उलाढाल होऊन शेतकऱ्यांची आर्थिकदृष्ट्या समृद्धीकडे वाटचाल सुकर होईल. या आशयाची चर्चा परिसंवादातून घडली.

## कृषी-अन्न प्रक्रिया उद्योगांवर चर्चा

निर्यातीसाठी भारत ही मोठी बाजारपेठ आहे. जगातील ५ हजार दशलक्ष लोकांसाठी अर्जेंटिना फळांचा पुरवठा करते. आधुनिक तंत्रज्ञानामुळे अन्न सुरक्षेवर सर्वाधिक भर दिला जात आहे. गेल्या तीन वर्षांत ७० टक्के उत्पन्न वाढले आहे. शासनाची धोरणे आणि कररचनेतील बदल आदी बाबींमुळे हे शक्य झाले आहे. बाजारपेठेच्या मागणीनुसार शासन धोरण ठरवते. मागणीनुसार शासनाचे धोरण ठरते. महाराष्ट्रातदेखील हे शक्य आहे. राज्यात सर्वाधिक फळे, भाजीपाला, कडधान्यांचे उत्पादन घेतले आहे, त्याला आधुनिकेची जोड मिळाल्यास शेती फायदेशीर ठरू शकेल.

कृषी सचिव अनुप कुमार म्हणाले, महाराष्ट्र कृषी क्षेत्रात क्रांती करण्यासाठी सज्ज आहे. मार्केटिंग क्षेत्रात महाराष्ट्राने जोरदार काम सुरू केले आहे. मूल्यवृद्धीसाठी शासन नवीन कायदे करत आहेत. येत्या काही दिवसांत फूड-अँग्रो प्रोसेसिंग धोरण आणणार आहे. त्याचाही शेतकऱ्यांना फायदा होईल.

या वेळी गोदरेज कंपनीचे संशोधन शाखेचे कार्यकारी संचालक अरविंद दास म्हणाले, गेल्या चार वर्षांत झालेल्या धोरणात्मक बदलामुळे कृषीक्षेत्रात बदल होत आहेत. आदर्श भूसंपादन कायदा येणे गरजेचे आहे, महाराष्ट्रातून कांदा, केळी मोठ्या प्रमाणात निर्यात होते. बागायती क्षेत्रात आपण प्रगती करत आहोत. मागणीनुसार अन्न, फळे भाज्यांचा पुरवठा करण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. 'ईज ऑफ डुईंग अॅग्रिकल्चर' मध्ये काम करण्याची गरज आहे. कृषी मॅन्युफ्रॅक्चरिंगमध्ये आपला मोठा वाटा आहे. शेतकऱ्यांपर्यंत विविध साधने पुरवण्याचा प्रयत्न केला जावा. कृषिमाल टिकवून ठेवण्यासाठी स्टोअरेज वाढावेत. हे क्षेत्र वाढत आहे. त्यासाठी साधन सुविधांची सोय करून देणे आवश्यक आहे.

कुक्कुटपालन क्षेत्रात काम करणारे श्रीकृष्ण गांगुर्डे म्हणाले, पणन धोरणे शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरत आहेत. फार्म प्रोड्युसर कंपनीची भूमिका महत्त्वाची आहे. अमूल ३५ हजार कोटींचा धंदा करू शकते. अशाच प्रकारे शेतकरी आपल्या दुधाला भाव का मिळवू शकत नाही. अमूलप्रमाणे आम्ही सह्याद्री फार्मर्स कंपनी स्थापन केली. ३१० कोटीचा धंदा केला. ७० टक्के नफा निर्यातीतून झाला. रसायनांचा वापर कमी केला. ताजा भाजीपाला, फळे देण्याचा आम्ही प्रयत्न करतो. मागणी आणि पुरवठा यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला. आम्ही शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत देतो. बाजार कोसळला तरी शेतकरी अडचणीत येत नाही. ग्राहकांना जे हवे ते आम्ही पुरवतो. द्राक्षांमध्ये कोट्यवधींची उलाढाल होते. प्रत्येक शेतकऱ्याला किमान पाच ते सात लाख रुपयांचा फायदा होतो.

कृषी क्षेत्रातील निर्यातदार आणि उद्योजकांसाठी महाराष्ट्र नंदनवन आहे. ते म्हणाले, डाळिंब निर्यात करण्यात महाराष्ट्र आघाडीवर आहे. केळी निर्यातीतदेखील महाराष्ट्र अग्रेसर आहे.

महिंद्रा अॅण्ड महिंद्राचे वरिष्ठ उपाध्यक्ष रमेश रामचंद्रन यांनी उत्पादक हा घटक लक्षात घेता तंत्रज्ञानाशी निगडित घटक अवलंबवण्याची गरज व्यक्त केली. नाशिक जिल्ह्यातील द्राक्षावर पडणाऱ्या रोगावर इलाज शोधण्याचा आमचा प्रयत्न सुरू आहे. मृदा नकाशावर आमचे काम सुरू आहे. सप्लाय चेन, कंत्राटी पद्धतीने शेती करण्यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

जगभरातील तज्ज्ञ, उद्योजक आणि लोककल्याणकारी निर्णय घेणारी शासकीय यंत्रणा यांचा एकत्रित संगम या जागतिक परिषदेच्या निमित्ताने घडून आला. या परिषदेचे उद्घाटन उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांच्या हस्ते झाले. समारोपाच्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही एका परिसंवादाला संबोधित केले.




**सीआयआयच्या जागतिक परिषदेतील चर्चासत्राच्या व्यासपीठावर निमंत्रित मान्यवरांसोबत हस्तांदोलन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.**

**विभागीय संपर्क अधिकारी**



# पशुपालकांना संधी

**'भारत कृषिप्रधान देश । शेतीसाठी हवा गोवंश । गोरसा इतुका नसे सत्त्वांश । अन्यत्र शुद्ध ।।', या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या अभंगातच पशुसंवर्धनाचे महत्त्व, गरज आणि व्यापकता समाविष्ट आहे. शेतकरी आणि उपेक्षिताना प्रगतीची संधी देत उन्नत महाराष्ट्राच्या विकासात सर्वंकष योगदान देणारा पशुसंवर्धन विभाग पशुपालकांच्या हितासाठी विविध योजना तसेच विकासाभिमुख उपक्रम राबवत आहे.**

**कांतिलाल उमाप**

मराठवाडा आणि विदर्भातील धवलक्रांतीचा अनुशेष भरून काढण्यासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत विदर्भ व मराठवाड्यात दूध उत्पादन वाढीसाठी विशेष प्रकल्प राबवत आहे. विदर्भ मराठवाड्यातील शेतकरी आणि पशुपालकांचे प्रबोधन व्हावे, त्यांच्यामध्ये पशुपालनाविषयी जागृती व्हावी, त्यांना उचित मार्गदर्शन मिळावे, त्यांचा उत्साह द्विगुणित व्हावा, आणि धवलक्रांतीचा प्रवाह प्रत्येक पशुपालकाच्या अंगणापर्यंत पोहोचावा, या हेतूने जालना येथे भव्य व अत्याधुनिक तंत्रज्ञानाने परिपूर्ण असलेल्या पशुप्रदर्शनाचे आयोजन माहे जानेवारी २०१९ मध्ये करण्यात आले.

### उच्च वंशावळीची पैदास

विदर्भ आणि मराठवाड्यातील दुधाचे उत्पादन खूप कमी आहे. पशुधनाची आकडेवारी पाहता विदर्भात ५५.३७ लक्ष आणि मराठवाड्यामध्ये ४७.७२ लक्ष गायी / म्हशींची संख्या असूनही त्या प्रमाणात दुधाचे उत्पादन दिसून येत नाही. यासाठी विदर्भ व मराठवाड्यात उच्च वंशावळीची पैदास करणे अत्यावश्यक आहे. या विभागातील सरासरी दूध उत्पादन ३.२१ किलो प्रतिदिन इतके आहे. ही सरासरी राज्याच्या ४.३२ किलो प्रतिदिन यापेक्षा आणि ४.४२ किलो प्रतिदिन या राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. या विभागाध्ये फक्त २२ टक्के पैदासक्षम जनावरांना कृत्रिम रेतन करण्यात येते. ५८ टक्के घरामध्ये फक्त एकच दुधाळ जनावरांचे संगोपन केले जाते.

२०१६-१७ मध्ये महाराष्ट्रात १०४०२ हजार मेट्रिक टन दूध, ५४८ कोटी अंडी, १४०७ मेट्रिक टन लोकर व ८४५ मेट्रिक टन मांसाचे उत्पादन झाले. भारतीय

आयुर्विज्ञान अनुसंधान परिषद (आयसीएमआर) यांच्या शिफारशीनुसार दरडोई दरवर्षी १८० अंडी आहारात असणे अपेक्षित आहे.

राज्यातील लोकसंख्या ११.२३ कोटी असून, दरडोई उपलब्धता ४७ अंडी आहे. जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्यूएचओ) यांच्या शिफारशीनुसार दरडोई दरदिवशी २८३ ग्रॅम इतकी दुधाची आवश्यकता असून, उपलब्धता २४३ ग्रॅम आहे. महाराष्ट्रात उपलब्ध पशुजन्य उत्पादने आणि मागणी या आकडेवारीकडे लक्ष टाकल्यास पशुसंवर्धनाशी निगडित व्यवसायांना मोठा वाव असल्याचे दिसून येते.

या विभागात १७० ग्रॅम दरडोई दुधाची उपलब्धता आहे. राज्याच्या २४३ ग्रॅम प्रतिदिन व राष्ट्रीय स्तरावर ३३७ ग्रॅम प्रतिदिन प्रतिव्यक्ती या उपलब्धतेपेक्षा विभागातील उपलब्धता खूप कमी आहे. दूध सेवनाचे प्रमाणदेखील या विभागात खूप कमी असल्याचे कुपोषणाच्या समस्या या विभागात अधूनमधून निर्माण होत असल्याचे आढळते.

दूध संकलनासाठीची व्यवस्था या भागात खूप कमी आहे. दुधावरील विपणन व प्रक्रियेसाठी सुविधा नसल्याने दुग्धोत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांवर मर्यादा पडतात. हा व्यवसाय वाढीस लागत नाही. शेजारील राजस्थान आणि गुजरातसारख्या राज्यांमध्ये महाराष्ट्रासारखेच हवामान आहे. तथापि, राष्ट्रीय पातळीवर दूध उत्पादनामध्ये ही दोन्ही राज्ये अनुक्रमे दुसऱ्या आणि चौथ्या क्रमांकावर आहेत. दुग्धव्यवसायाकडे या राज्यातील ग्रामीण शेतकरी चरितार्थाचे साधन म्हणून पाहतो. राज्यामध्ये इतर विभागामध्ये दुग्ध सहकारी संस्थांचे जाळे बळकट आहे. या तुलनेत विदर्भ आणि मराठवाडा या विभागामध्ये दुग्ध सहकारी संस्था कमी प्रमाणात आहेत. या विभागामध्ये दुग्ध व्यवसाय हा येथील शेतकऱ्यांच्या चरितार्थाचे साधन होऊ शकतो. दुग्धव्यवसाय हा शेतीपूरक जोडधंदा न बनता तो एक मुख्य व्यवसायदेखील बनू शकतो. विदर्भ आणि मराठवाडा या विभागामध्ये दूध उत्पादनाला प्रचंड वाव आहे.

### गाईंचे वाटप

गावपातळीवर ९ पशू आरोग्य सुविधा या बाबी अंतर्गत लसीकरण, गोचीड निर्मूलन शिबिरे, वंध्यत्व शिबिरांचे आयोजन, जंत निर्मुलन शिबिरे, यांद्वारे या भागातील जनावरांच्या आरोग्याची काळजी घेतल्याने दूध उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल. दूध उत्पादन वाढीसाठी १६ हजार ४०० गाईंचा पुरवठा या विभागात करण्यात येत आहे. यामध्ये गीर, थारपारकर, राठी, हरियाणा या प्रवर्गातील गायींचा समावेश आहे. यापैकी ९८४० जनावरे खुल्या प्रवर्गासाठी, ६५६० जनावरे अनुसूचित जाती-जमातीसाठी वाटप करण्यात येतील. या प्रकल्पाच्या माध्यमातून नियमित आर्थिक उत्पन्नाचे साधन निर्माण होत आहे. हजारो ग्रामीण युवकांना वेगवेगळ्या माध्यमातून रोजगार मिळत आहे. त्याबरोबरच अप्रत्यक्षरीत्या वाहतूकदार संस्था, वितरक व किरकोळ विक्रेते यांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. सध्या या माध्यमातून प्रतिदिन २ ते २.२५ लाख दुधाचे संकलन होते. याद्वारे २०० कोटी रुपये विदर्भ व मराठवाडा पशुधन व पशुवैद्यकीय सेवा यामध्ये सुधारणा होऊन दूध उत्पादनामध्ये वाढ होईल. सद्य:स्थितीत निवडलेल्या गावांमध्ये योजनेचे काम सुरू झाले असले तरी याच धर्तीवर इतर गावांमध्येसुद्धा या प्रकल्पामध्ये प्रस्तावित कामे पशुसंवर्धन विभागामार्फत केली जातील. याद्वारे प्रकल्प विभागामधील सर्वच गावांमध्ये आधुनिक पशुपैदास, पशुवैद्यकीय सेवा, वैरण विकासाच्या माध्यमातून दूध उत्पादनात निश्चितपणे वाढ होईल.



### दुप्पट उत्पन्न

केंद्र शासनाने जेव्हा शेतकऱ्यांचे उत्पन्न २०२२ पर्यंत दुप्पट करण्याची घोषणा केली. त्यानुसार लगेच महाराष्ट्र शासनाने विदर्भ मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी व तेथील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत. या अनुषंगाने विदर्भ व मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत विविध योजनांची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे.

### विशेष दुग्ध विकास प्रकल्प

राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत असणाऱ्या अर्थसाहाय्यातून विदर्भ व मराठवाडा विशेष दुग्ध विकास प्रकल्प ही योजना मंजूर करण्यात आली आहे. हा प्रकल्प महाराष्ट्र शासन व राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येणार असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाबरोबर १६ डिसेंबर २०१३ रोजी सामंजस्य करार केला आहे. या कराराप्रमाणे तेलंखेडी, नागपूर येथील शासकीय दूध योजनेची ९.८८ एकर जमीन तेथील दुग्धशाळेसह राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ यांच्या वतीने मदर डेअरी फ्रुटस ॲण्ड व्हेजिटेबल लि. यांना ३० वर्षांच्या दीर्घ मुदतीकरिता भाडे तत्त्वावर देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तेथे मदर डेअरी फ्रुटस ॲण्ड व्हेजिटेबल लि. कंपनीमार्फत दूध संकलनाची प्रक्रिया सुरू आहे.

या प्रकल्पांतर्गत विदर्भातील अमरावती, बुलढाणा, वर्धा, नागपूर, अकोला, चंद्रपूर, यवतमाळ असे ७ जिल्हे आणि मराठवाड्यातील लातूर, नांदेड, उस्मानाबाद, जालना या चार जिल्ह्यांचा समावेश करण्यात आलेल्या ११ जिल्ह्यांतील २९३० गावांचा समावेश करण्यात आला आहे. पशुधनाच्या उत्पादनात वाढ करत त्यामध्ये सातत्य ठेवणे आणि दुधाचे संकलन, प्रक्रिया व

विपणन करणे, या दोन्ही बाबींवर संपूर्ण प्रकल्प अवलंबून असेल.

## कृत्रिम रेतन

सध्या अस्तित्वात असलेल्या शासनाच्या कृत्रिम रेतन कार्यक्रमाबरोबरच शेतकऱ्याच्या दारात कृत्रिम रेतन सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. विदर्भ मराठवाड्यातील मोठ्या प्रमाणातील पशुधन हे कमी दूध उत्पादन देणारे आहे. यामुळे उच्च उत्पादन क्षमतेच्या वळूंच्या रेतमात्रांचा वापर करून कृत्रिम रेतन केल्यास या विभागात जनावरांची क्षमता वाढण्यास मदत होईल. सध्या १३३३ शासकीय संस्थांमार्फत कृत्रिम रेतन सुविधा पुरवण्यात येतात. राज्यातील सध्याची कृत्रिम रेतनाची व्याप्ती ४२ टक्के असून, या विभागांतर्गत व्याप्ती फक्त २२ टक्के आहे. अतिरिक्त ५५२ कृत्रिम रेतन सेवादाता खासगी संस्थेमार्फत पुरविण्यात येतील. याशिवाय लिंग वर्गीकृत रेतमात्रांचा वापर करून उच्चतम गुणवत्तेच्या मादी वासरांची पैदास वाढविण्याकडे पशुसंवर्धन विभागाचा भर राहील. केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे ५०० बहुउद्देशीय तंत्रज्ञ तयार करण्यात येतील. राष्ट्रीय गोकुळ मिशन या केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत हे पुरवण्यात येतील.

## दुष्काळ एक संधी

अनियमित पर्जन्यमानामुळे विदर्भ व मराठवाड्यातील ग्रामीण जीवन काहीसे प्रभावित झाले आहे. काही ठिकाणी दुष्काळाच्या झळा जाणवू लागल्या आहेत. अशा प्रतिकूल अवस्थेत शेतीला पूरक व्यवसाय म्हणून सांभाळलेल्या पशुधनाचे संगोपन करायचे कसे, असा प्रश्न शेतकरी / पशुपालकांना पडणे स्वाभाविक आहे. पण दुष्काळसुद्धा एक संधी ठरू शकते, यासाठी पशुसंवर्धन विभागाने विविध उपक्रम घेतले आहेत. चारा बियाण्यांचे वाटप आणि अनुदान, कमी क्षेत्रात अधिकचे चारा उत्पादन घेण्याचे प्रगत तंत्रज्ञान, उपलब्ध वैरणीची पौष्टिकता वाढवून पशुधनाची उत्पादन क्षमता टिकवून ठेवणे, यासारखे उपाय विभागाच्या वतीने योजण्यात येत आहेत. त्यामध्ये पशुपालकांना मार्गदर्शन करण्यावर पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

जालना येथील पशुपक्षी प्रदर्शनात याबाबत शेतकऱ्यांना विविध चर्चासत्रांच्या माध्यमातून तज्ज्ञ व्यक्तींकडून याबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. त्यामुळे दुष्काळसदृश परिस्थितीवरही पशुपालक/ शेतकरी सहज मात करू शकतील, असे आश्वासक प्रयत्न विभागामार्फत करण्यात येत आहेत. परिणामी, दुष्काळसदृश परिस्थिती हे नैसर्गिक संकट न राहता संधी, बनेल असा विश्वास आहे. या परिस्थितीचे सुयोग्य नियोजन करण्यात आले असून, पशुपालक / शेतकरी यांना कुठल्याही गैरसोयीला सामोरे जावे लागणार नाही.

## कडबाकुट्टी यंत्रे



वैरण वाया जाऊ न देण्यासाठी कुट्टी करून दिल्यास त्याचा फायदा दूध

## हिरव्या वैरणीची कमतरता



नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ॲनिमल न्युट्रिशन ॲण्ड फिजिओलॉजीच्या सर्वेक्षणानुसार देशामध्ये हिरव्या वैरणीची २५ टक्के कमतरता आहे. वाळलेल्या वैरणीची कमतरता २२ टक्के आहे. दिवसेंदिवस पशुखाद्याच्या किंमती सामान्य शेतकऱ्यांना न परवडणाऱ्या होत आहेत. हिरवी वैरण दुधाळ जनावरांना उपयुक्त ठरते. राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या अर्थसाहाय्यातून प्रकल्प भागात प्रत्येक गावातून १० लाभार्थी, असे ३००० गावांमध्ये ३० हजार शेतकऱ्यांना १२ हजार रुपये अनुदान देण्यात येते. त्यामुळे किमान १२ हजार हेक्टर जमीन वैरणीच्या लागवडीखाली येऊ शकेल. ५०० किलो क्षमतेच्या १० बॅगा प्रतिलाभार्थीला देण्यात येतात. ६०० रुपये प्रतिबॅग याप्रमाणे ३० हजार लाभार्थ्यांना साधारणपणे ३ लाख सायलो बॅगा हिरव्या वैरणीच्या साठ्यासाठी तयार करण्यात आल्या आहेत. यामध्ये कायमस्वरूपी सायलेज खड्डा बांधकामाचा पर्याय आहे.

### समतोल आहार



समतोल आहार मिळाल्यास त्यांच्या क्षमतेनुसार जनावरे दूध देऊ शकतात. साधारणपणे एकूण दूध उत्पादनाच्या ७० टक्के खर्च हा खाद्यावर होतो. त्या-त्या भागातील उपलब्ध चारा, वैरण, खाद्य यांचा आहारात उपयोग करून घेऊन, समतोल आहार तयार करून जनावरांना दिल्यास कमी खर्चात जास्त उत्पादन मिळू शकते. दूधउत्पादनात वाढ आणि आरोग्य सेवेबरोबर वैरण आणि पशुखाद्य या बाबींवर पशुपालकांचा ७० टक्के खर्च होतो. या बाबतीतही लोकांना नगदी पिकाबरोबरच वैरणीसाठी राखीव क्षेत्र ठेवून वैरण उत्पादन घेण्यासाठी प्रबोधन करणे, त्यांना वैरण बियाणे, ठोंब हे अनुदानावर व मोफत पुरवठा करणे सुरू केले आहे. वैरण व्यक्तिगत पातळीवर जास्तीचे उत्पादन झाल्यास त्याला मुरघासच्या स्वरूपात साठवण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी निरनिराळ्या अनुदानित योजना सुरू केल्या आहेत. चराऊ कुरणांचा शास्त्रीय पद्धतीने वापर करून चांगल्या प्रकारच्या पौष्टिक वैरण लागवडीतून तसेच अशा कुरणांना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून देऊन त्यामध्ये वाढ करण्याचा प्रयत्न सुरू आहे. यामुळे वैरणीवरील खर्चात बचत करून उत्पन्नात वाढ होऊ शकेल.

या प्रकल्पांतर्गत समतोल आहाराच्या सुविधांसह समूह गट तयार करण्यात येत असून, त्याअंतर्गत ५० गावांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये प्रत्येक गावातून ६० जनावरे आणि ३० सभासद निवडण्यात येणार आहेत. या प्रक्रियेमध्ये ३००० गावांना आणि ९० हजार शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. गावपातळीवर एल.आर.पी. (लोकल रिसोर्स पर्सन) निवडून त्यांना एनडीडीबीने तयार केलेली संगणक प्रणाली असलेले नोटबूक किंवा टॅब्लेट पुरविण्यात येत आहेत. एल.आर.पी. प्रकल्पांतर्गत सर्व जनावरांची उत्पादनविषयक, पैदासविषयक आणि आरोग्यविषयक माहिती संकलित करण्यात येत आहे. समतोल आहाराबाबतची सुविधा व मार्गदर्शन हे मदर डेअरी व एनडीडीबी या संस्थेच्या सहकार्यातून प्रकल्प भागात पुरवले जात आहे.

उत्पादनात होऊ शकतो. या माध्यमातून चाऱ्याची ३० टक्क्यांपर्यंत बचत होऊ शकते. राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत ५० टक्के अनुदानावर १५ हजार कडबाकुट्टी यंत्रे ३००० गावांमध्ये पुरविण्यात आली आहेत. जनावरांना चारा, वैरण, खाद्य आणि पूरक घटकांचा पुरवठा केल्यास दूध उत्पादन वाढेल. महाराष्ट्रात देशी गाय, संकरीत गाय आणि म्हशी यांना अनुक्रमे ०.५५ किलो आणि १.१० किलो प्रतिदिन प्रतिजनावर याप्रमाणे पशुखाद्य दिले जाते. हे प्रमाण आदर्श फिडिंग प्रॅक्टिसेसच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार खूप कमी आहे. याचे मुख्य कारण म्हणजे पशुपालकांची आर्थिक दुर्बलता, जागरूकतेचा अभाव. ही बाब विचारात घेऊन २५ टक्के अनुदानावर पशुखाद्य व क्षार खनिज मिश्रण वाटप करण्यात येत आहे.

### पशुप्रदर्शन

या भागातील शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजना आणि उपक्रमांची माहिती व्हावी, आधुनिक तंत्रज्ञानाने व्यवसायाची व्याप्ती कशी वाढवावी, पूरक उद्योग तसेच उत्पादनांच्या निर्मितीला चालना कशी द्यावी, यासह विविध विषयांवर पशुपालकांचे प्रबोधन करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरचे हे प्रदर्शन जालना जिल्ह्यात आयोजित करण्यात आले.

राष्ट्रीय दर्जाचे पशुपक्षी प्रदर्शन महाराष्ट्रात तब्बल २० वर्षानंतर आयोजित करण्यात येत आहे. देशभरातील विविध राज्यांतील पशुधनाच्या उच्च वंशावळीच्या विविध जाती या प्रदर्शनात पशुपालकांना पाहावयास मिळतील. आदर्श गाव (मॉर्डन व्हिलेज) या संकल्पनेवर आधारित गावाची निर्मिती या प्रदर्शनात करण्यात येणार आहे.

### मार्गदर्शन

सुधारित चारा पीक पद्धती तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने दर हेक्टरी चाऱ्याची उपलब्धता वाढवण्यासाठी या प्रदर्शनात पशुपालकांना विशेष मार्गदर्शन करण्यात येईल. दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन, वराहपालन, ससेपालन, बटेरपालन आदी पशुसंवर्धनाशी निगडित व्यवसायांमध्ये प्रगत साधनांचा वापर करून व्यवसाय कसा किफायतशीर करावा, याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी विविध कंपन्या स्टॉल्स उभारतील.

**आयुक्त पशुसंवर्धन, औंध, पुणे.**



**मराठवाड्याची ओळख कमी पर्जन्यमान असलेला व डोंगराळ भागाचा प्रदेश अशी आहे. या भागात शेती कामासाठी लागणाऱ्या मनुष्यबळाचा तुटवडा आहे. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आणि शेती फायदेशीर होण्यासाठी बांबूची लागवड हा शाश्वत उपाय ठरू शकतो.**

# श्रीमंत करणारी शेती

**अशोक रामलिंग माळगे**

निपाणी म्हणजेच पूर्वी पाणी नसलेले गाव. उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्यात निपाणी गावात राहणारे राजशेखर मुरलीधरराव पाटील. सध्या ते मुरुड (ता.जि. लातूर) येथे वास्तव्यास आहेत. त्यांच्याकडे वडिलोपार्जित ५४ एकर शेती होती. त्यांनी १९९३ मध्ये कृषी पदवी प्राप्त केली.

बांबू शेतीची संकल्पना मनात धरून त्यांनी सुरुवातीस जपान येथील कायटो येथे जाऊन निसर्ग शेतीची (जंगल शेती) पाहणी केली. शास्त्रज्ञ फुकोआका यांच्या प्रेरणेतून गावात निसर्ग शेती करण्याचे ठरवले. पडीक जमिनीत, कमी कष्टात आणि दीर्घकाळ उत्पन्न देणाऱ्या बांबूची लागवड, वृक्षलागवड, वृक्षसंवर्धन करत असताना आपल्या शेतीला बांबूची भिंत तयार केली. हे करत असताना फळलागवडीत आंबा, चिकू, आवळा, नारळ, जांभूळ, चिंच याचबरोबर कडूलिंबाची लागवड करून ठिंबक सिंचनाने जमिनीत ओलावा निर्माण केला. बांबूची रोपे शेतीच्या कडेला लावून शेताला बांबूचे कुंपण तयार केले.

सुरुवातीस दीड ते दोन फुटांवर रोपे लावली. एक लाख रोपे ५४ एकरमध्ये लावली असून सर्व रोपांना ठिंबक सिंचनाद्वारे पाणी दिले जाते. एका रोपांपासून १०० ते २०० काठया ३० ते ४० फूट लांबीच्या मिळतात. एका काठीचे ५० रुपये उत्पन्न मिळते. हे उत्पन्न तीन ते चार वर्षांपासून मिळण्यास सुरुवात होते. ते उत्पन्न ६० वर्षांपर्यंत घेता येते. एकरी १००० ते ३००० पर्यंत घन लागवड करून त्यापासून २० ते ३० लाखांचे उत्पन्न मिळत आहे.

त्यांच्याकडे एक लाख ४० हजार रोपे घनलागवड जंगल आहे. शेतीमध्ये चालणारे कोणतेही अवजार नाही. बांबूच्या शेतीला इतर पिकांप्रमाणे मजूर लागत नाहीत. बांबूमध्ये मानवेल, कष्टांग, रुपाई, मेसकाठी, मानगा आदी १४० जातींची रोपे आहेत. विशेष म्हणजे बांम्बोसा बल्कोवा वाणाच्या बांबूला फांद्या आणि काटे येत नाहीत.

## पाणीदार शिवार

पाणीदार गाव करण्यासाठी लोकसहभागातून दहा किलोमीटर नाला खोलीकरणाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प त्यांनी हाती घेतला. या कामाचे महत्त्व लक्षात घेऊन रांजणी शुगरचे प्रशासकीय संचालक बी.बी.ठोंबरे यांनी ४० लाखांचे सहकार्य केले. या गावात एकूण एक कोटीची कामे झाली. त्यामुळे शासनाने इंधनासाठी दहा लाख रुपयांची मदत केली. या भागात ४० कि.मी. नाला खोलीकरणाची कामे लोकसहभागातून करण्यात आली. या कामास आमदार राणा जगजितसिंह यांच्याकडून दहा लाख रुपयांचा निधी मिळाला. शासन व तसेच इतर लोकप्रतिनिधींनीही निधी दिला. त्यामुळे पाणी नसलेले शिवार पाणीदार करण्यात यश मिळाले. पाणलोट विकासाची कामे करण्यासाठी राळेगणसिद्धी येथे जाऊन अण्णा हजारे यांच्या प्रतिष्ठानमध्ये शेती व पाणलोट विकासासंबंधी घेतलेल्या प्रशिक्षणाचा फायदा झाला.

## बांबूपासून चांगले उत्पन्न

खेळणी, बांधकामापासून ते ऊर्जानिर्मितीसाठी बांबूचा वापर वाढलाय. पेपरमिल, प्लायवूड, उदबत्ती कारखाने, फर्निचर, इथेनॉल, कोळसा, नोटा आदी उद्योग बांबूवर अवलंबून आहेत. सर्वसाधारण शेतकरी बांबूच्या शेतीकडे वळल्यास त्याच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. परंतु यावर मात करत राजशेखर पाटील यांनी बांबू शेती केली. बऱ्याच प्रमाणात आपल्याला बांबूची आयात करावी लागते. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांनी बांबूशेतीकडे वळले पाहिजे. बांबूला सध्या प्रचंड मागणी आहे. व त्यापासून चांगले उत्पन्नही मिळत आहे.

बांबूला वृक्षाच्या श्रेणीतून वगळून गवत बनवण्याची तरतूद असलेले महत्त्वपूर्ण विधेयक मंजूर झाल्याने शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या चांगला फायदा झाला. याचबरोबर केंद्रीय अर्थसंकल्पात राष्ट्रीय बांबू मिशनचे काम हाती घेतले आहे. त्यासाठी भरीव तरतूदही केली आहे. आता देशात बांबूला वन विभागाच्या वाहतूक परवान्यातून मुक्त करण्यात आल्याने बांबूची वाहतूक आणि त्यापासूनची उत्पादन या प्रक्रियेला गती येईल.

## बांबूच्या शेतीकडे का वळावे?

शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी बांबूलागवड शाश्वत शेतीचा मार्ग आहे. आजच्या घडीला कृषी आधारित उपक्रम म्हणून बांबूकडे पाहिले जाते. बदलत्या शेतीच्या पद्धतीत आणि स्पर्धेच्या युगात बांबू लागवड आदर्श ठरू शकते. अतिशय कमी भांडवलात शेतकरी उत्तम शेती करून आपले भविष्य सुखकर करू शकतील. यासाठी शेतकऱ्यांनी बांबू शेतीकडे वळायला हवे.

बांबू हा जलद वाढणारा गवताचा प्रकार आहे. लवचिक व दणकट गुणधर्मामुळे त्याला फार महत्त्व आहे. एकदा बांबू लावल्यानंतर त्याचे जीवनचक्र साधारणपणे ४० वर्षांपर्यंत चालू राहते व चार ते पाच वर्षांपासून सतत नियमितपणे बांबूचे उत्पादन मिळते. मानवेल जातीची लागवड महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर दिसून येते. बाबूपासून कागद, चटया, दांड्या, टोपल्या, खोकी, फर्निचर आदी उत्पादने तयार होतात. या उत्पादनाला मोठ्या प्रमाणावर मागणी असते.

## रोप कसे लावावे?

बांबूची लागवड साधारणपणे ३ x ३ मीटर ते ७ x ७ मीटर अंतरापर्यंत करण्यात येते. त्याचप्रमाणे त्याचा कालावधी ३५ ते ४० वर्षांपर्यंत असल्याने जास्त अंतरावर बांबूची लागवड करणे फायदेशीर असते. बांबूची लागवड करण्यासाठी एप्रिल–मे महिन्यात 'पाच ५ मीटर अंतरावर ६० x ६० x ६० सें.मी. आकाराचे खड्डे खोदावेत. बांबू रोपे लावताना व वाहतुकीमध्ये योग्य ती काळजी घेतल्यास रोपे मरण्याचे प्रमाण फारच अल्प असते.

बियाण्याची पेरणी साधारणपणे सप्टेंबर–ऑक्टोबर महिन्यात करावी. तीन ते चार महिन्यांनी रोपे पॉलिथिन पिशवीत लावावीत. या तऱ्हेने तयार केलेली रोपे जून–जुलै महिन्यांत लागवडीसाठी वापरता येतात. पॉलिथिन पिशवीत लावून बांबूच्या रोपांची निर्मिती, बियाणे पॉलिथिन पिशवीतसुद्धा लावून करता येते. कंदाद्वारे केलेल्या बांबूच्या लागवडीमध्ये झाडे जगण्याचे प्रमाण चांगले असते व वाहतुकीचा खर्च कमी येतो. लागवडीसाठी कंदाची निवड करताना कंदावर दोन ते तीन डोळे असणे आवश्यक असते. बांबूची काढणी ही नोव्हेंबर ते फेब्रुवारी या महिन्यात करावी. एप्रिल ते ऑक्टोबर या महिन्यात बांबूची काढणी करू नये, कारण त्या काळात बांबूची वाढ गतीने होते.

कंदांपासून लागवड केल्यास चार ते पाच वर्षांपासून उत्पादनास सुरुवात होते. जर रोपापासून केली असेल तर सहा ते आठ वर्षांनी उत्पादन मिळते. बांबू शेतीचे नियोजन व व्यवस्थापनातून आंतरपिके घेता येतात. बांबू लागवड हा सिंचनाची सुविधा असलेल्या भागामध्ये उत्तम पर्याय आहे. ही लागवड दीर्घकाळ उत्पन्न देणारी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल. मोकाट जनावरे, वन्यप्राणी आणि आगीपासून बांबूंचे संरक्षण करता येते.

**विभागीय माहिती कार्यालय, लातूर**

### हिरवे सोने



बांबूवर फवारणी करावी लागत नाही. खत लागत नाही. कीड लागत नाही. गवती प्रकार असल्यामुळे जनावरे या रोपांना खात नाहीत. रोपे वाळत नाहीत. पाणी नाही मिळाले तर पानगळ होते नि पाणी मिळाल्यास पुन्हा पाने फुटतात. शक्यतो रोपे मरत नाहीत. त्यामुळेच तर शेतकऱ्यांना हे वरदान असून त्यास हिरवे सोने असे म्हणतात. ही शेती केल्यास लोक हसतात; परंतु बाबू शेती करणारा शेतकरी १०० टक्के श्रीमंत होतो, हे या शेतीचे वैशिष्ट्य आहे.

मी माझ्या संपर्कात येणाऱ्या जास्तीत जास्त शेतकऱ्यांना बांबू शेतीकडे वळवण्याचा नेहमी प्रयत्न करत असतो. शेतकऱ्यांनी भ्रमणध्वनी क्रमांक ९८६०२०९२८३ वर संपर्क साधल्यास त्याच्या ज्या काही अडचणी असतील त्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहीन.

**– राजशेखर मुरलीधरराव पाटील, मुरुड (ता.जि. लातूर)**

**माहिती संवाद तंत्रज्ञान हे कोणत्याही क्षेत्रातील विस्तार व विकासाला चालना देणारे माध्यम आहे. शेती क्षेत्रात आढळून येत असलेला विकास किंवा सुधारणांची सुरुवात ही सहज आणि सुलभतेने वापरता येईल अशा उपययोजनांच्या माहितीद्वारे झाल्याचे दिसून येते. मागील ५० वर्षात शेती क्षेत्रातील उत्पादन व उत्पन्न वाढीचे श्रेय हे शासनाने राबवलेल्या विविध कार्यक्रमांना जाते. यामध्ये पीक तंत्रज्ञान अवलंबण्याच्या विविध योजना, हरितक्रांतीसारखे उपक्रम, प्रशिक्षण व भेट योजना अथवा आत्मा योजनेसारख्या विस्तार कार्यक्रमांमधून प्रसार, वैयक्तिक संपर्क, गटचर्चा, बैठका, प्रशिक्षणे, शेतीशाळा, सहली, शिवार फेऱ्या, प्रदर्शने यांचा समावेश आहे. माहिती तंत्रज्ञान प्रसारांतर्गत शेतकरी वनराई, आदर्शगाव अशी मासिके, वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन याबरोबरच दूरध्वनी, मोबाईल, संगणक व इंटरनेट यांचेही महत्त्व अनन्यसाधारण आहे. या उपाययोजना व त्यास शेतकऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद यामुळेच सुधारणा दृश्य स्वरूपात आल्या आहेत.**



# शेती विकासाचा डिजिटल अध्याय


**अनिल बनसोडे / धर्मेंद्र कुलथे**

देशातील कष्टकरी शेतकऱ्यांचे उत्पन्न २०२२ पर्यंत दुप्पट करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे दृष्टीने शासन आहे. यासाठी राज्य शासनामार्फत शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवण्यात येत आहेत. या सर्व योजनांचा फायदा शेतकऱ्यांना निश्चित होत आहे. त्यासाठी माहितीचे अचूक व वेगवान प्रसारण महत्त्वाचे आहे. कृषीक्षेत्राचे निसर्गावरील अवलंबित्व लक्षात घेता कोणत्याही निर्णय प्रक्रियेसाठी बिनचूक व अद्ययावत माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे.

शासकीय स्तरावर कृषी विभागाच्या प्रशासकीय कामकाजात गतिमानता, सुलभता आणण्यासाठी संगणकीकरणाचा अवलंब, राज्यस्तर ते तालुकास्तरावरील कार्यालयात संगणक आणि प्रिंटरचा वापर, विविध सॉफ्टवेअरचा (आज्ञावल्याचा) वापर यामुळे कृषी क्षेत्रातील डिजिटल पर्वाची सुरुवात झाली आहे. कृषी विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला दररोज किमान ५००० वापरकर्ते भेट देतात.

या संकेतस्थळामुळे पीक तंत्रज्ञान, कृषियोजना, राबवण्यात येणारे विविध उपक्रम, सांख्यिकी माहिती याबाबतचा अद्यावत तपशील उपलब्ध होऊ लागला यामुळे क्षेत्रीय स्तरावरील माहिती संकलन, तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसारकार्य सुलभ झाले आहे.

**अग्रीसनेट** – राज्यातील आयुक्तालय ते तालुकास्तरापर्यंत सर्व कार्यालयांना इंटरनेट सुविधा या उपक्रमाच्या माध्यमातून कृषी विभागासाठी इंटरनेट ई-मेल सुविधा बळकट करण्यात आली.



**सायबर एक्सटेंशन** – प्रकल्पांर्गत पुरवठा झालेल्या लॅपटॉप व डाटाकार्ड यामुळे क्षेत्रीय कर्मचाऱ्यानांही, शेतकऱ्यांना शेती तंत्रज्ञानाची दृकश्राव्य स्वरूपातील माहिती पुरवता येते. माहिती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे ग्रामस्तरावर कृषी तंत्रज्ञानाचा विस्तार करणे, बहुमाध्यमाच्या साहाय्याने प्रभावी तंत्रज्ञान हस्तांतरित करणे याद्वारे कृषी योजनांची माहिती, कृषी





विद्यापीठे, शास्त्रज्ञांचा संदेश, कीड व रोगांविषयी उपाययोजना इत्यादीबाबतची माहिती शेतावरच त्वरित उपलब्ध करून देण्यात आली आहे. याद्वारे शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसनही करता येणे शक्य झाले आहे.

## सामूहिक आकाशवाणी केंद्र

राज्याच्या कृषिविस्तार कार्यक्रमांना विस्तारविषयक सुधारणाकरिता साहाय्य या कार्यक्रमांतर्गत राज्यात पाच सामूहिक आकाशवाणी केंद्राची (सीआरएस) स्थापना करण्यात आली आहे.

कृषी विज्ञान केंद्र बारामती, कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर, कृषी विज्ञान केंद्र करडा (वाशिम), कृषी विज्ञान केंद्र दुर्गापूर (अमरावती), कृषी विज्ञान केंद्र जत (सांगली) येथील आकाशवाणी केंद्राद्वारे शेतकऱ्यांच्या यशोगाथा इतरांना प्रेरणा देण्याचे काम करत आहेत.

## टोल फ्री यंत्रणा

शेतीविषयक समस्या सोडवण्यासाठी कृषी विभागाने राज्यात १८००-२३३-४००० ही किसान संचार टोल फ्री सेवा जून २०११ पासून कार्यान्वित केली आहे.

म्हणून १ जुलै २०१० पासून महाकृषिसंचार (एमकेएस) ही रास्त दरातील मोबाइल सेवा उपलब्ध करून देण्यात आली.


सध्या या सेवेत राज्यातील १२ लाख शेतकरी अधिकारी/कर्मचारी, शास्त्रज्ञ, विक्रेते जोडले गेले आहेत. याद्वारे हवामानाचा वेध, पिके, नवीन वाण, खते, बियाणे कीटकनाशके यांचा पुरवठा व वापर, आधुनिक पीक तंत्रज्ञान, उत्पादन, बाजारपेठा व शेतमाल बाजारभाव आणि शेतीपूरक व्यवसाय तसेच करायची कामे याबाबत सल्ला व मार्गदर्शन प्राप्त करून त्याचे अवलंबन करीत आहे.

## मोबाइल ॲप्लिकेशन्स

मोबाइलधारक शेतकऱ्यांना माहिती तंत्रज्ञानांतर्गत मोबाइल ॲपमधून कृषी माहितीचा खजिना उपलब्ध झाला आहे. मोबाइल ॲप ही उपयुक्त सुविधा असून

### एमकिसान पोर्टल : मोफत सल्ला सेवा

केंद्र शासनाने शेतकऱ्यांना मोबाइलद्वारे सहजतेने माहिती उपलब्ध व्हावी म्हणून mKisan Portal विकसित केले आहे. यामध्ये देशपातळीवरील ४२३ लाख शेतकऱ्यांची नोंद असून, त्यामध्ये महाराष्ट्रातील ५० लाख शेतकऱ्यांची विक्रमी नोंद आहे. या पोर्टलद्वारे शेतकऱ्यांना हवामान व पावसाचा अंदाज, पीक तंत्रज्ञान, कीड-रोग नियंत्रण, बाजारभाव याचबरोबर पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय व रेशीम उद्योग याबाबत एसएमएसद्वारे सल्ले पाठवता येतात. या नोंदणीबरोबरच पाठवलेले सल्ले व संदेश संख्या यामध्ये देशपातळीवर महाराष्ट्र अग्रेसर आहे.




कृषी निविष्ठाविषयक तक्रारी तसेच कृषिविषयक अडचणीवर या यंत्रणेच्या माध्यमातून मोफत सल्ला तथा मार्गदर्शन केले जाते.

## महाकृषिसंचार

भारत संचार निगम लि. व कृषी विभागाचा संयुक्त उपक्रम - रुपये १४१/- मध्ये १.५ जीबी प्रतिदिन डाटा - अनलिमिटेड कॉल्स- १२ लाख लाभार्थी- शेतकऱ्यांना कृषी विभागातील अधिकारी/कर्मचारी, कृषी विद्यापीठांतील शास्त्रज्ञ व प्रगतशील शेतकरी यांच्याशी सुलभतेने संपर्क साधता यावा

त्यामधून इंग्रजी हिंदीबरोबरच स्थानिक भाषेतूनही माहिती मिळवता येते. राज्य शासनाने विकसित केलेल्या शेतकरी मासिक, क्रॉपसॅप, क्रॉप क्लिनिक, कृषिमित्र या ॲप्लिकेशन्सचा वापर शेतकरी करत आहेत.

## सॅटेलाईट व ड्रोन टेक्नॉलॉजी

रबी २०१८ पासून ६ निवडक तालुक्यांत पथदर्शी प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. पिकाखालील क्षेत्र निश्चित करणे, पीक आरोग्य पाहणी (ग्राऊड ट्रुथिंग, कीड रोग सर्वेक्षण इ.) व पीक उत्पादन निश्चित करण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर सुरू

## सोशल मीडिया

मोबाइलमधील व्हॉट्सअॅपद्वारे चित्र, संदेश व आवाज स्वरूपाचा माहितीचा खजिना उपलब्ध झाला आहे. शेतकऱ्यांचे क्षेत्रनिहाय, पीकनिहाय (फळपीक/फूलपीक संघ), तसेच निर्यात/विपणनाच्या अनुषंगाने गट स्थापन करून व्हॉट्सअॅप ग्रुप्स कार्यान्वित आहेत. यातून मार्गदर्शन, संपर्क व सेवा उपलब्ध करून घेण्यात येत आहे. पीक उत्पादनाशिवाय सध्या शेती आधारित जोडधंदे करणाऱ्यांचे म्हणजे शेळीपालन, गोपालन, दुग्धव्यवसाय, रेशीमउद्योग, मधमाशापालन अशा प्रकारच्या स्मार्टफोनधारक शेतकऱ्यांचे गट अस्तित्वात येत आहेत. व्हाट्सअॅप या मोबाइल अॅप्लिकेशनवरील एका ग्रुपमध्ये २५६ पर्यंत स्मार्टफोन धारक शेतकऱ्यांना सहभागी होता येते. यामध्ये दृकश्राव्य माहितीची देवाणघेवाण करता येते. ग्रुपमध्ये शेतकरी, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, व्यावसायिक, मार्गदर्शक अशा प्रकारच्या व्यक्तींचा समावेश केल्यास माहितीच्या देवघेवीसोबतच सल्ला, मार्गदर्शन, उपाययोजना प्राप्त करून घेता येतात. शेतकऱ्यांना कोठेही न जाता, प्रवासावर खर्च न करता, घ्यावयाची पिके, जाती, बियाणे/



खते/औषधे यांची उपलब्धता, किमती याबाबत मार्गदर्शन प्राप्त करून घेता येईल. यामध्ये शेतकरी शेतातील पिकांचे, किडीचे, नुकसानीचे फोटो, चलचित्र अपलोड करून जाणकार/तंत्रज्ञाकडून मार्गदर्शन प्राप्त करून घेत आहेत. या तंत्रज्ञानाचा व एकूणच वापरकर्त्यांचा सध्या वेगाने प्रसार होत आहे.

करण्याची कार्यवाही प्रगतिपथावर आहे. कृषी विभागातील विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) चा अवलंब करण्यात येत आहे. तसेच सर्व योजनांसाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही प्रगतिपथावर सुरू आहे. शेतकऱ्यांचे श्रम, माहिती तंत्रज्ञानाचे योगदान व सुधारित शेती तंत्रज्ञानाचा अवलंब यातून ग्रामीण भागात विकास झालेला दिसतो. यामध्ये पिकाबद्दल, नवीन व सुधारित जातींची लागवड, आधुनिक पीक तंत्रज्ञानाचा अवलंब, पाण्याचा काटकसरीने वापर, कीडरोग व्यवस्थापन, अधिक व निर्यातक्षम शेतमालाचे उत्पादन, मूल्यवृद्धी याद्वारे उत्पन्नात वाढ दिसून येते. डाळी व तेलबियांच्या आयातीतील अवलंबित्व कमी झाले असून, दिवसेंदिवस शेतमालाची निर्यात वाढत आहे. यातून शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होत आहे.



कृषिक्षेत्रात नव्या जोमाने सुरू झालेल्या या डिजिटल पर्वामध्ये सर्व शेतकऱ्यांचा सहभागही तितकाच महत्त्वाचा आहे. एम-किसान पोर्टलवरून नियमितपणे सल्ला घेणारे ५० लाख शेतकरी या पर्वामध्ये सहभागी झाले आहेत.

## किसान कॉल सेंटर

ही केंद्र शासनाची सेवा शेतकऱ्यांसाठी आयएफएफसीओच्या माध्यमातून कार्यरत आहे. यासाठी १८००-१८०-१५५१ हा टोल फ्री क्रमांक पुरवण्यात आला आहे. ही सेवा दररोज सकाळी ६ ते संध्याकाळी १० या कालावधीमध्ये निरंतर सुरू असते. या क्रमांकावरुन देशभरातल्या विविध २२ स्थानिक भाषांमध्ये शेतकऱ्यांशी संवाद साधला जातो. महाराष्ट्र व गोवा या दोन राज्यांसाठी पुणे मुख्यालयी कार्यरत किसान कॉल सेंटरवरून मराठी व कोकणी या दोन भाषेत शेतकऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली जातात. दररोज दोन शिफ्टमध्ये चालणारे हे कामकाज ७२ विषयतज्ज्ञांच्या मदतीने चालवले जाते. कृषी क्षेत्रातील माहिती व तंत्रज्ञानसोबतच शेतकऱ्यांना भेडसवणाऱ्या आर्थिक व सामाजिक समस्यांवर देखील समुपदेशन केले जाते.



**(लेखक अनुक्रमे संचालक आत्मा व कृषी उपसंचालक संगणक प्रकल्प, कृषी आयुक्तालय, पुणे या पदावर कार्यरत आहेत.)**

**प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत बीड जिल्हा देशात प्रथम ठरला आहे. जिल्हाधिकारी एम.डी.सिंह यांच्या प्रयत्नांमुळे या अंमलबजावणीला वेग आला. बीड जिल्ह्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर श्री. सिंह यांनी पीक विमा, प्रधानमंत्री आवास योजना, शबरी योजना, रमाई आवास योजनांसारख्या विविध योजनांमध्ये विशेष लक्ष घातले आणि प्रभावी अंमलबजावणी करत उत्कृष्ट कार्य केले.**

# पीक विमा : बीडचे यश

**मनोज शिवाजी सानप**

बीड जिल्ह्यात विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करून त्याचा लाभ जनसामान्यांना मिळवून देण्यात आला आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजना त्यापैकीच एक. या योजनेची अंमलबजावणी करण्यात बीड जिल्ह्याने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे.

मतदार नोंदणीबाबत बीएलओ नेट (बूथ लेवल ऑफिसर) ॲपच्या कामामध्येही बीड जिल्ह्याने देशात प्रथम क्रमांक मिळवला आहे. रिएडीट आज्ञावलीद्वारे १०० टक्के ७/१२ चे संगणकीकरण करण्यात आले आहे. मिशन दिलासा योजनेतंर्गत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना प्रत्यक्ष गृहभेट देऊन शासनाच्या विविध योजनांतर्गत रोजगार निर्मितीबाबत प्रेरित केले जाते. विविध शासकीय योजनेचा लाभ त्यांना देणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे.

## अधिकाधिक शेतकऱ्यांना संरक्षण

शेतकऱ्यांचा प्रधानमंत्री पीक विमा योजनेवर विश्वास निर्माण करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. जिल्ह्यातील एकूण ६ लाख ५१ हजार ७८३ शेतकऱ्यांपैकी ५ लाख ४३ हजार २०० (८३%) शेतकऱ्यांनी या योजनेत भाग घेऊन १२ लाख १८ हजार २५७ अर्जांद्वारे पिकांचे विमा संरक्षण केले.

पीक विमा भरताना शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी प्रत्येक बँक शाखा, आपले सरकार सेवा केंद्रावर शेतकऱ्यांना अर्ज भरण्यासाठी आवश्यक ती मदत करण्यासाठी तलाठी, कृषिसेवक यांना आदेश दिले गेले.



पीक विमा योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी
प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून सन्मान स्वीकारताना जिल्हाधिकारी एम.डी. सिंह.

## समाज माध्यमांचा प्रभावी वापर

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था आबाधित राखण्यासाठी समाज माध्यमांचा उत्कृष्टपणे वापर केला गेला. यासाठी व्हॉट्सॲप ग्रुप तयार केला गेला. यामध्ये पालकमंत्री पंकजाताई मुंडे, खासदार डॉ. प्रीतम मुंडे यांचेसह इतर लोकप्रनिधी, प्रशासकीय व पोलीस अधिकारी तसेच बँक व विमा अधिकाऱ्यांचाही यात समावेश करण्यात आला. या योजनेसंदर्भात एखादी तक्रार प्राप्त होताच तक्रार ग्रुपवर टाकून संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत तक्रारीचे निवारण तत्काळ करण्यात येत होते. शेतकऱ्यांना पीक विमा अर्ज दाखल करता यावा, यासाठी जिल्ह्यातील सर्व बँकांना सुटीच्या दिवशीदेखील पीक विमा

## सर्वांगीण विकास

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएम) योजनेद्वारे जिल्ह्यातील गोरगरीब महिलांना स्वयंसाहाय्यता गटांद्वारे तसेच बचतगटांद्वारे स्त्रियांचे संघटन करून त्यांच्यातील उद्योग व्यवसायाला चालना देण्यात आली. तसेच ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसंघ तर जिल्हा परिषद प्रभाग स्तरावर प्रभागसंघ तयार केले. या संस्थांच्या माध्यमातून गरिबांचे अधिकार, हक्क, वित्तीय सेवा तसेच शाश्वत उपजीविकेच्या संधी प्राप्त होण्यासाठी वातावरण निर्मिती केली गेली. बीड जिल्ह्यामध्ये आदर्श गावांमध्ये शासनाच्या विविध विभागांमार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनांद्वारे गावातील नागरिकांना अधिकाधिक सुविधा मिळवून देण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या वारंवार बैठका घेतल्या. तसेच संबंधित गावांना भेटी देऊन योजना यशस्वी होण्यासाठी लक्ष केंद्रित केले गेले. जलयुक्त शिवार अभियानामध्ये नियोजनपूर्व काम करून जलस्रोत वाढवणे तसेच या योजनेची उद्दिष्टे साध्य करण्याच्या अनुषंगाने प्रशंसनीय काम केले.

मुख्यमंत्री ग्रामपरिवर्तन योजनेंर्गत जिल्ह्यातील ग्रामपरिवर्तक दूतामार्फत ग्रामीण भागातील विविध विकासकामांना चालना दिली गेली. पाणी फाऊंडेशन अंतर्गत बीड जिल्ह्यातील निवड झालेली गावे पाणीदार करण्याच्या उद्देशाने गावकऱ्यांना प्रशिक्षण तसेच गावामध्ये अधिकारी/कर्मचारी व गावकरी यांच्याद्वारे श्रमदान करून योजनेची यशस्वी अंमलबजावणी करण्यात जिल्हाधिकारी श्री. सिंह यांनी विशेष परिश्रम घेतले आहे.

बीड शहरातील बिंदुसरा नदीवरील पूल २००१ मध्ये झालेल्या पावसाने पूर्णपणे वाहून गेला. त्यामुळे वाहतुकीस मोठ्या प्रमाणावर अडथळा निर्माण झाला होता. हा पूल नव्याने बांधणे मोठे आव्हान होते. परंतु सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे व नियोजनपूर्वक कामांमुळे पुलाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग २११ साठीची भूसंपादन प्रक्रिया व अहमदनगर-बीड-परळी (वै) रेल्वे भूसंपादनाचे आणि मावेजा वाटपाचे काम अंतिम टप्प्यात आहे.

अर्ज स्वीकारण्यास सांगितले गेले. या योजनेच्या अंमलबजावणीत जिल्ह्यातील सर्वच यंत्रणांनी टीम वर्क म्हणून काम केले.

## नियोजन व जनजागृती

पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान सर्व संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय राखणे अत्यंत महत्त्वाचे होते. सर्व महत्त्वाचे शासन निर्णय, प्राप्त तक्रारी या ग्रुपवर टाकण्यात येत होत्या. जिल्ह्यातील नियमित आढावा बैठकांमध्ये या योजनेचा समावेश करण्यात आला होता. बँकांना नियमितपणे सूचना देण्यात येत होत्या. तालुका पातळीवर शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्यात आले. आपले सरकार सेवा केंद्र चालकांसाठी जिल्हा प्रशासनामार्फत पीक विमा अर्ज भरण्यासंदर्भात प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

## सूचना व मार्गदर्शन

पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली या योजनेची बैठक आयोजित करण्यात आली. यामध्ये सर्व यंत्रणांना अंमलबजावणीसंदर्भात सूचना देण्यात आल्या होत्या. पालकमंत्र्यांचा व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये समावेश असल्यामुळे या योजनेविषयी जिल्ह्यातील परिस्थितीची अद्ययावत माहिती त्यांना मिळत होती. वेळोवेळी त्यांच्याकडून आवश्यक त्या सूचना व मार्गदर्शन होत होते.

## अडचणींवर मात

ही योजना राबवताना प्रामुख्याने तीन अडचणी आल्या होत्या. विमा हप्ता बँकेत भरताना होणारी गर्दी, संकेतस्थळ सर्व्हरमध्ये तांत्रिक दोष



निर्माण होणे आणि आधार संदर्भातील अडचणी. या अडचणींवर मात करून उत्कृष्ट काम करण्याचा प्रयत्न केला गेला. सर्व्हरमध्ये तांत्रिक दोष दिवसा मोठ्या प्रमाणात येत असल्यामुळे जिल्ह्यातील सर्व २ हजार ९२९ सीएससी चालकांना रात्रीच्या वेळी अर्ज सादर करण्याचे सुचवले. त्यामुळे बँकेवरील गर्दीचा ताण कमी झाला व शेतकऱ्यांना अर्ज सादर करणे शक्य झाले.

अर्ज सादर करताना आधार क्रमांक अत्यावश्यक असल्यामुळे ६० वर्षावरील काही शेतकऱ्यांचे बोटाचे ठसे उमटत नसत. तसेच त्यांच्या आधार क्रमांकाशी मोबाइल क्रमांक अद्ययावत नसल्यामुळे अर्ज सादर होत नव्हते. अशा प्रकारच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी सीएससी चालकांना शेतकऱ्यांचे मोबाइल क्रमांक अद्ययावत करून अर्ज सादर करण्याबाबत आदेशित केले. ज्यामुळे जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांचे अर्ज सादर करणे शक्य झाले. या योजनेशी आधार क्रमांक जोडणे अनिवार्य केल्यामुळे पारदर्शकता निर्माण होऊन कोणत्याही शेतकऱ्याद्वारे बोगस अर्ज सादर झाला नाही.

## लाभार्थींच्या भेटी

या योजनेची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी श्री. सिंह यांच्याकडून लाभार्थी शेतकऱ्यांच्या नियमितपणे भेटी घेण्यात आल्या. या वेळी त्यांना या योजनेचे महत्त्व तसेच या योजनेतून होणारा फायदा या सर्वांची इत्थंभूत माहिती देण्यात आली. कृषी विभागामार्फत प्रत्येक गावात मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले.

**जिल्हा माहिती अधिकारी, बीड**




**केंद्र शासनाच्या रस्ते, परिवहन आणि महामार्ग मंत्रालयाच्या रस्ता सुरक्षा विभागामार्फत ४ ते १० फेब्रुवारी २०१९ या कालावधीत तिसावा राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह आयोजित करण्यात येत आहे. महाराष्ट्रात या कालावधीत रस्ते सुरक्षेबाबत जनजागृतीसाठी विविध मोहिमा राबवण्यात येत आहेत. देशभरात दरवर्षी १.४७ लाखांपेक्षा जास्त व्यक्ती रस्ते अपघातात मृत्युमुखी पावतात. असंख्य व्यक्ती रस्ते अपघातात गंभीर जखमी होतात. याचा त्रास त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक तसेच मानसिक स्तरावर होतो. देशाच्या सक्षम मनुष्यबळाची ही खूप मोठी हानी असते. त्यामुळे हे जीव वाचविण्याची तातडीची गरज आहे.**

# जीव धोक्यात घालू नका...

**इर्शाद बागवान**

जनतेमध्ये रस्ते सुरक्षेबाबत जागृती निर्माण करणे, तसेच त्यांना अपघात कमी करण्याच्या कामी सहभागी करून घेणे आवश्यक आहे. या दृष्टीने दरवर्षी रस्ता सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात येते.

यानिमित्ताने रस्ते अभियांत्रिकी, वाहन अभियांत्रिकी, अंमलबजावणी, प्रशिक्षण आणि जनजागृती यासोबतच आकस्मिक प्रसंगी अपघातग्रस्तांना मदत करणे या बाबीकडे या निमित्ताने सर्वांचे लक्ष वेधण्यात येत आहे. दुचाकी सोबत हेल्मेटचा वापर करणे, चारचाकी वाहनात सीटबेल्टचा वापरकरणे, वेगमर्यादा पाळणे व मद्यपान करून वाहन न चालविणे, प्रवासी तसेच मालाच्या क्षमतेनुसार वाहतूक करणे, मालवाहू वाहनांना सुरक्षा साधने बसवणे तसेच परिवहन वाहनांना परिवर्तिका (रिफ्लेक्टर टेप) बसविणे आदी बाबी रस्ते सुरक्षेच्या दृष्टीने फार आवश्यक आहेत.

वाहन चालवताना मोबाइलचा वापर करणे, वाहतुकीच्या उलट्या दिशेने प्रवास करणे (नो एंट्री), लाल सिग्नल तोडून प्रवास करणे, झेब्रा क्रॉसिंगवर वाहने उभी करणे इत्यादी बाबी अत्यंत गंभीर व स्वत:सह इतरांचे जीव धोक्यात घालणाऱ्या आहेत. या गुन्ह्यांसाठी विशेष मोहीम या कालावधीत राबवण्यात येते.

## रस्ता सुरक्षा परिषदेतील निर्णय

- दारू पिऊन वाहन चालवल्यास संबंधित वाहनचालकाचा परवाना (लायसन्स) ६ महिन्यांसाठी निलंबित करण्यात येईल.
- विमा नसलेले किंवा विम्याची मुदत संपलेले वाहन रस्त्यावर उतरवल्यास अशा वाहनावर तात्पुरत्या जप्तीची कारवाई करण्यात येईल.
- न्यायालयाच्या निर्देशानुसार अतिरिक्त भार वाहणाऱ्या (ओव्हरलोड) मालवाहतूक वाहनांवर फक्त दंडात्मक कारवाई न करता त्यांच्यावर थेट गुन्हे दाखल करण्यात येईल.
- नोव्हेंबर अखेर २४६ कोटी रुपयांचा रस्ते सुरक्षा निधी उपलब्ध झाला आहे. अपघात रोखण्याकरिता विविध उपाययोजनांसाठी हा निधी खर्च करण्यात येईल.

**विभागीय संपर्क अधिकारी**

## वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन व्हावे



''रस्त्यांवरील बहुतांश अपघात हे वाहतुकीचे नियम न पाळल्यामुळे होतात. रस्ते वाहतुकीमध्ये शिस्त आणल्यास अपघातांचे प्रमाण बऱ्याच अंशी कमी होईल. शासनाने केलेले वाहतुकीचे नियम हे प्रवाशांच्या हितासाठी असतात, हे सर्वप्रथम सर्वांनी लक्षात घेणे गरजेचे आहे. हेल्मेटचा वापर, सीटबेल्टचा वापर, लेनची शिस्त पाळणे, दारू पिऊन वाहन न चालवणे, मोबाइलवर बोलताना वाहन न चालवणे हे नियम पाळले तरी बहुतांश अपघात कमी होऊ शकतील. आपण वाहन घेऊन बाहेर निघतो तेव्हा घरी कोणीतरी आपल्या परतीची वाट पाहत असते. त्यांच्यासाठी आणि स्वत:साठीही आपला जीव अनमोल असतो. हे लक्षात घेऊनच सर्वांनी वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन करावे.''

**– दिवाकर रावते, परिवहन मंत्री**



सातारा तालुक्यातील अपशिंगे (मिलिटरी) जिल्हा परिषद शाळेने गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबर खेळ आणि स्पर्धा परीक्षेत उत्कृष्ट यश मिळवले आहे.

# स्मार्ट शाळेची गोष्ट...

**युवराज पाटील**

सातारा जिल्हा हा सैनिक जिल्हा म्हणून ओळखला जातो. स्वराज्यासाठी रक्त सांडण्याचा आणि देश सेवेचा इतिहास इथल्या मातीतला डी.एन.ए आहे. हा जिल्हा शैक्षणिक प्रगतीत नवनवे उच्चांक स्थापित करतो आहे. हा धडपडणारा गुण प्रत्येक क्षेत्रात दिसतो. त्याला शिक्षण क्षेत्रही अपवाद नाही. प्राथमिक शिक्षणात ज्या झपाट्याने जिल्ह्याची प्रगती होत आहे. ती उल्लेखनीय आहे.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत सातारा जिल्ह्यात जिल्हा परिषद शाळांची कामगिरी कौतुकास्पद आहे. जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील विखळे, खंडाळा तालुक्यातील शिरवळ, कोरेगाव तालुक्यातील ल्हासुर्णे, पाटण तालुक्यातील तारळे (मुळी), वाई तालुक्यातील निकमवाडी, जावळी तालुक्यातील ओझरे या जिल्हा परिषद शाळांनी उत्कृष्ट प्रगती केली आहे.

### मॉडेल शाळा

अपशिंगेची जिल्हा परिषद शाळा ही सर्वांसाठी आता आदर्श शाळा ठरली आहे.

इथले शिक्षक आणि स्थानिकांची शाळा समिती हे पाहण्यासाठी गेलो असता, अनेक सुखद धक्के बसले. शाळेचे सुशोभित कपाऊंड, गेटच्या आत गेल्यानंतर कमालीची स्वच्छता, मोजकीच पण योग्य त्या जागी हिरवाई, झाडे, मधल्या बाजूला शाळेपर्यंत जाण्यासाठी पेवर ब्लॉकचा रंगीत रस्ता (हा गावकऱ्यांनी निधी गोळा करून केल्याचे

समजले), त्याच्या दोन्ही बाजूला खेळाचे प्रशस्त मैदान. या मैदानाच्या पुढे अतिशय सुबक दगडी इमारत. ही शाळा पहिली ते सातवी पर्यंतची आहे. एकूण ९ शिक्षक आहेत. एका शिक्षिकेचा अपवाद वगळता बाकी आठही शिक्षक पदवीधर आहेत. मुख्याध्यापकाच्या कक्षेत प्रवेश केल्यानंतर शाळेतील शिस्त लक्षात आली. मुख्याध्यापकाच्या डाव्या बाजूला एका मोठ्या सरकती काच असलेल्या आलमारीत या शाळेने काय केलेय, याच्या सुवाच्च अक्षरांमध्ये विविध रंगांच्या फाईल्स शिस्तीत लावल्याचे बघूनच शाळेचे प्राथमिक रुपडे आवडले.

## ८०० पुस्तकांचे ग्रंथालय

प्रभारी मुख्याध्यापक जमिला बागवान यांच्या नेतृत्त्वाखाली मागच्या मेपासून ही शाळा सुरू आहे. गेल्या तीन वर्षातील या शाळेच्या प्रगतीचा आलेख खूप भरीव आहे. आज या शाळेचा पट २८३ एवढा असून यातील ४० विद्यार्थी दुसऱ्या गावावरून स्वखर्चाने शाळेत येतात. गावकऱ्यांच्या सहकार्याने आणि शिक्षकांच्या तळमळीने ८०० पुस्तकांचे ग्रंथालय सुरू करण्यात आले आहे. मुले खरेच वाचतात का, याची उलट तपासणी केली असता, ते त्या



पुस्तकाचे सार अगदी न अडखळता सांगत होते. 'एक होता कार्व्हर', 'अग्निपंख', 'श्यामची आई' अशी पुस्तके आवडीने हे विद्यार्थी वाचत आहेत.

## शिष्यवृत्तीच्या संख्येत वाढ

शाळेची वेळ सकाळी दहाची असते मात्र जी मुले विशेष प्रावीण्य मिळवणारी आहेत, त्यांच्यासाठी सकाळी ९ वाजता शाळा सुरू होते. संध्याकाळी शाळा सुटल्यानंतरचा एक तास ज्यांची अभ्यासात गती थोडी कमी आहे त्यांच्या प्रगतीसाठी घेतला जातो. यामुळे या शाळेच्या १० मुलांना २०१४-१५ पासून नवोदय विद्यालयात प्रवेश मिळाला. एवढ्या मोठ्या प्रमाणात असे यश मिळवणारी ही जिल्ह्यातील एकमेव जिल्हा परिषद शाळा आहे. चौथीच्या शिष्यवृत्तीतही या शाळेचे विद्यार्थी जिल्ह्यात चमकतात. या विद्यार्थ्यांमध्ये ही गुणवत्ता कशी काय येते, याचे प्रात्यक्षिक वर्गात जाऊन पाहता आले.

## दृकश्राव्य माध्यमाचा वापर

बी.एस.सी. डी.एड. असलेले कदम सर मुलांना एलईडीच्या स्क्रीनवर पचन संस्थेविषयी पहिल्यांदा इंग्रजीमधून आणि नंतर त्याचे मराठी रूपांतर करून शिकवत होते. त्या स्क्रीनवर आपण घास घेतल्या नंतर कुठे कुठे जातो हे त्या चलचित्रातून दिसत होते, त्यामुळे विद्यार्थ्यांना हे दृकश्राव्य माध्यम डोक्यात पक्के बसत असल्याचे लक्षात आले. मी त्यानंतर उलट तपासणी म्हणून निकम नावाच्या विद्यार्थ्याला आता सरांनी काय शिकवले पुढे येऊन सांग, म्हटल्यानंतर तो न घाबरता पुढे आला. त्या एलईडी स्क्रीनवर पचनसंस्था सांगू लागला. मी अवाक झालो, हा पाठ कालच सुरू झाला असल्याचे कळले. एवढ्या लवकर ही मुले केवळ दृकश्राव्य माध्यम आणि सरांची त्यांच्याप्रति असलेली आपुलकी यामुळे हे विद्यार्थी पटकन अचूकपणे लक्षात ठेवतात असे वाटले. पुढच्या वर्गात इतिहासाचा तास होता. तिथे मिर्झा राजे जयसिंग बरोबर पुरंदर किल्यावरील तह हा पाठ सुरू होता. तिथल्याही विद्यार्थ्यांनी तशीच पटापट उत्तरे दिली. हा प्रगत शाळा पॅटर्न, डिजिटल शाळा यांच्या समन्वय आणि शिक्षकांची शासनाच्या पॅटर्नची १०० टक्के अंमलबजावणी आणि विद्यार्थ्यांप्रति असलेले समर्पण यामुळेच हे यश या शाळेच्या पदरी पडत असल्याचे लक्षात आले.

## क्रीडाक्षेत्रातही नावलौकिक

शैक्षणिक गुणवत्तेत वरचष्मा असलेल्या या शाळेचा इयत्ता सातवीत असलेला सुमीत घाडगे बॉक्सिंगमध्ये राज्यस्तरावर खेळतो आहे. दोन वर्षापूर्वी ७ वीत बॉक्सिंग सुरू केलेली प्राची गुरव ही या शाळेची विद्यार्थिनी आता बालेवाडीच्या बॉक्सिंग प्रशिक्षण प्रबोधिनीत प्रशिक्षण घेत आहे. शाळेच्या खो-खो च्या संघातील दोन मुलींची निवड विभागीय पातळीवर झाली आहे. खेळात प्रावीण्य असणाऱ्या विद्यार्थ्यांना वेगळे प्रशिक्षण आणि प्रोत्साहन असल्यामुळे ही शाळा क्रीडा क्षेत्रातही आपला नावलौकिक मिळवत आहे. यासाठी गावातील नागरिकांच्या आर्थिक पाठबळाबरोबर प्रोत्साहनही असल्याचे सर्व शिक्षक सांगतात.

## लोकवर्गणीतून विविध सुविधा

लोकवर्गणीतून शाळेचा सुसज्ज हॉल, ग्रंथालय, ढोलताशे, प्रत्येक वर्गात एलईडी, आयडीबीआय बँकेनी बांधून दिलेले शौचालय, तर इन्फोसीसने बनवून दिलेली लॅब. गावकऱ्यांच्या मागणीवरून २०१३ पासून पाचवी सुरू झाली आता सहावी, सातवी सुरू झाली. आता या जिल्हा परिषद शाळेचे नाव सर्वदूर पोहोचले आहे. त्यामुळे गावात इंग्रजी माध्यमाची शाळा असूनही पहिलीच्या वर्गात प्रवेश मिळावा म्हणून पालक आतापासूनच शाळेत येऊन जात असल्याचे श्रीमती बागवान यांनी सांगितले.

सातारा जिल्ह्याचे सहपालकमंत्री सदाभाऊ खोत यांनी हे गाव दत्तक घेतले असून शाळेसाठी जिल्हा वार्षिक योजनेतून साहाय्य देणार आहेत, असे शिक्षकांनी सांगितले. आता ही शाळा पाहण्यासाठी लोक दूरवरून येत आहेत. शाळेचे प्रतिक्रिया पुस्तक विविध लोकांच्या प्रतिक्रियांनी भरून गेले आहे. 'मला माझ्या मुलीला या शाळेत घालायला आवडले असते, तत्कालीन सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सध्याचे लातूरचे जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांची ही बोलकी प्रतिक्रिया या पुस्तकात आहे. अशा शाळा सगळीकडेच झाल्या तर जिल्हा परिषद शाळेत प्रवेशासाठी प्रतीक्षा यादी लागेल.

**जिल्हा माहिती अधिकारी, सातारा**

**विश्व बँकेतर्फे नुकतेच जाहीर झालेल्या डुईंग बिझिनेस वुइथ इझ क्रमवारीमध्ये भारताने ७७ व्या स्थानावर झेप घेतली आहे. २०१४ च्या तुलनेने विचार करता ही वाढ ६५ अंकांची आहे. गेल्या चार वर्षांत घेतलेल्या अनेक निर्णयांचा हा परिपाक आहे. या क्रमवारी सुधारणेचे अनेक फायदे होणार आहेत. मुख्य म्हणजे देशात परकीय गुंतवणूक वाढणार असून त्यातून रोजगारनिर्मितीला चालना मिळेल.**

# महाराष्ट्राची भरारी

**डॉ. शैलेंद्र देवळाणकर**

जागतिक बँकेकडून अलीकडेच 'व्यवसाय सुगमताः रोजगार निर्मिती २०१८' हा अहवाल प्रकाशित करण्यात आला. या अहवालासाठी १८९ देशांचे सर्वेक्षण करण्यात आले असून 'इज ऑफ डुईंग बिझनेस'च्या या क्रमवारीत भारताने ७७ वा क्रमांक मिळवला आहे. विशेष म्हणजे २०१७ मध्ये भारत १०० व्या, २०१६ मध्ये १३८ व्या आणि २०१४ मध्ये १४२ व्या स्थानावर होता. याचाच अर्थ २०१४ ते २०१८ या चार वर्षांच्या काळात भारताने व्यवसाय सुगमतेच्या जागतिक क्रमवारीत तब्बल ६५ अंकांनी भरारी घेतली आहे. ही आपली सर्वात मोठी झेप आहे. याचे श्रेय गेल्या चार वर्षांच्या काळात आर्थिक पातळीवर केल्या गेलेल्या मूलभूत संरचनात्मक सुधारणांना जाते. या सुधारणांमुळेच भारताने ही प्रगती केली आहे.



## दहा क्षेत्रांमधील सर्वेक्षण

जागतिक बँकेने २००३ पासून व्यवसाय सुगमता क्रमवारीची घोषणा करण्यास सुरुवात केली. यासाठी जागतिक बँकेमध्ये वेगळा विभाग कार्यरत आहे. प्रतिवर्षी १८९ देशांचे सर्वेक्षण या विभागामार्फत केले जाते. व्यवसाय करण्यामध्ये देशादेशांमध्ये असणाऱ्या परिस्थितीचा, तेथील अडचणींचा आढावा घेऊन ही क्रमवारी तयार केली जाते. ही क्रमवारी लावताना तुलनात्मक अभ्यास केला जातो. सुमारे दहा क्षेत्रांमधल्या ४१ निकषांच्या आधारे हे सर्वेक्षण केले जाते आणि त्यानंतर क्रमवारीची यादी जाहीर होते.

यामध्ये पहिला मुद्दा असतो तो परवान्यांचा. व्यवसाय सुरू करण्यासाठी बांधकाम, वीज, पाणी आदी अनेक स्वरुपाचे परवाने घ्यावे लागतात. हे परवाने मिळण्याची प्रक्रिया देशा-देशांमध्ये कशी आहे याचा अभ्यास केला जातो. याखेरीज कर भरणा पद्धती, सीमापार व्यापार, कराराची अंमलबजावणी, दिवाळखोरी, लघू गुंतवणूकदारांचे संरक्षण अशा स्वरूपाच्या १० निकषांमध्ये प्रत्येक देश कशा पद्धतीने सुविधा उपलब्ध करून देतो, त्यानुसार त्याची क्रमवारी ठरते. ज्या देशात सुलभतेने व्यवसाय करणे शक्य आहे तिथे परकीय गुंतवणूक वाढते. ताज्या क्रमवारीमध्ये सर्वात सहज गुंतवणूक करणे आणि व्यवसाय सुरू करणे शक्य असलेला देश म्हणून न्यूझीलंडचे नाव पुढे आले आहे. या देशात तत्काळ आणि सुलभतेने व्यवसाय सुरू करता येतो. त्या खालोखाल सिंगापूर, डेन्मार्क, दक्षिण कोरिया, हाँगकाँग, अमेरिका आणि इंग्लंड हे देश आहेत. या क्रमवारीत चीनचा क्रमांक ४६ वा आहे. म्हणजेच चीन पहिल्या ५० मध्ये समाविष्ट आहे.

गेल्या वर्षी चीनचा क्रमांक ७७ होता. २०१४ मध्ये जेव्हा केंद्रात नवे सरकार आले तेव्हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी येणाऱ्या पाच वर्षांच्या काळात व्यवसाय सुगमतेच्या क्रमवारीत पहिल्या ५० देशांत भारताचा क्रमांक असेल, असे आश्वासन दिले होते. ताज्या क्रमवारीमध्ये भारताने घेतलेली झेप पाहता भारताची वाटचाल त्या दिशेने सुरू झाली आहे, ती सकारात्मक आहे. कदाचित, पुढील वर्षी भारत पहिल्या ५० मध्येही दिसू शकतो.


## परकीय गुंतवणुकीत वाढ

गेल्या चार वर्षात भारताची प्रतवारी वाढत आहे तशी भारतात येणारी परकीय गुंतवणूकही वाढत आहे. उदाहरणार्थ, २००० मध्ये भारतात प्रतिवर्षी ०.२ अब्ज डॉलर्स परकीय गुंतवणूक होत होती. २०१७ मध्ये हे प्रमाण वाढले असून हा आकडा ५.५ अब्ज डॉलर्सवर पोहोचल्याचे दिसून आले आहे. याचाच अर्थ भारताची या क्षेत्रात भरपूर प्रगती झाली आहे आणि भारतात परकीय गुंतवणुकीचा ओघही वाढतो आहे.

भारताची ही वाढती क्रमवारी शासनासाठी सध्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. या क्रमवारी सुधारणेमुळे आगामी काळात पुन्हा परकीय गुंतवणूक वाढण्याच्या शक्यता प्रबळ झाल्या आहेत.

## कमी कालावधीत परवाने

भारताने गेल्या चार वर्षात काही



महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत, त्याचे फलित म्हणजे ही झेप आहे. २०१४ मध्ये एखादा व्यवसाय भारतात सुरू करण्यासाठी १३० दिवस लागायचे. यासाठी १०० पेक्षा अधिक परवाने घ्यावे लागत असत. पण आजमितीला असा व्यवसाय सुरू करण्यासाठी फक्त ३० दिवस लागतात आणि परवान्यांची संख्या १०० वरून २० वर आणण्यात आली आहे. त्यासाठी शासनाने सिम्प्लिफाईड प्रोफार्मा फॉर इन्कॉपोरेटिंग कंपनी इलेक्ट्रॉनिकली ही प्रणाली लागू केली आहे. या प्रणालीमुळे भारतात व्यवसाय सुरू करणे हे अत्यंत सुलभ झाले आहे. त्याचप्रमाणे परवान्यांची संख्या कमी झाली आहे. लालफितीच्या कारभारात अडकणाऱ्या फायलींमुळे होणारा त्रास कमी झाला आहे. जुलै २०१७ मध्ये देशात जीएसटी ही नवी करप्रणाली लागू झाली. त्यामुळे भारतासारख्या खंडप्राय देशाची – ज्याची लोकसंख्या १ अब्ज आहे – बाजारपेठ ही एकसमान झाली. कर भरण्याची प्रक्रिया सोपी झाली आणि सीमापार व्यवसाय सुरू करण्यातील अडथळे कमी झाले. याखेरीज भूमी अभिलेख किंवा जमिनीच्या नोंदीकरणाचे संगणकीकरण करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्र अग्रस्थानी आहे. त्यामुळे व्यवसायासाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या कागदपत्रांची निकड आता कमी झाली आहे.

२०१६ मध्ये आपण इन्सॉल्व्हन्सी आणि बँककरप्सी कोड बिल पारित केले. त्यामुळे व्यवसाय करणे सुलभ सुरू झाले.

हे सर्वेक्षण भारतात करण्यात आले असले तरी ते केवळ मुंबई आणि दिल्ली या दोनच शहरांत झाले आहे. दिल्ली ही देशाची राजधानी असली आणि मुंबई ही आर्थिक राजधानी असली तरीही भारतातील प्रगती किंवा औद्योगिकीकरण केवळ या दोन शहरांतच एकवटलेले नाही. आज चीनचे उदाहरण पाहिले तर चीनमध्ये कॉर्नर्ड डेव्हलपमेंट म्हणजे काही बेटांमध्ये किंवा सीमारेषेनजीकच्या काही भागातच औद्योगिकीकरण मोठ्या प्रमाणात झाले आहे. अमेरिकेतही तसाच प्रकार आहे. ईस्टर्न आणि वेस्टर्न कोस्ट या भागातच अमेरिकेची प्रगती झाली आहे. मेनलँड अमेरिकेमध्ये – ज्याला हिंबरलँड म्हटले जाते तिथे– औद्योगिकीकरण कमी झाले आहे. भारतात तसे नाही. भारतात औद्योगिकीकरणाची गंगा विस्तारलेली आहे. त्याची अनेक विशेष क्षेत्रे आहेत; पण त्याचे सर्वेक्षण यात झालेले नाही. ते होणे गरजेचे आहे. तसे झाल्यास कदाचित भारताचा क्रमांक आणखी उंचावलेला दिसू शकतो. व्यवसाय सुगमतेच्या या सर्वेक्षणात एकूण १० पैकी ६ निकषांमध्ये भारताची कामगिरी अत्यंत उत्तम आहे; परंतु ४ निकषांमध्ये भारताला सुधारणा करणे आवश्यक आहे.


**रजिस्ट्रेशन ऑफ प्रॉपर्टी**ः मालमत्तेच्या नोंदींसंदर्भात भारताची कामगिरी चांगली नाही. वास्तविक, हा घटक राज्य सरकारच्या अखत्यारीत आहे. त्यामुळे याबाबत केंद्राने पुढाकार घेऊन चालणार नाही तर राज्याने पुढाकार घेणे गरजेचे आहे. संपत्तीच्या नोंदीचे नियम राज्यानुसार वेगवेगळे आहेत. त्यामुळे संपत्तीची नोंद करण्यास खूप वेळ लागतो. राज्यांनी या संदर्भात सुधारणा करणे आवश्यक आहे.

**एन्फोर्समेंट ऑफ कॉन्ट्रॅक्ट**ः करारांची अंमलबजावणी हा न्यायालयीन विषय असल्यामुळे त्यामध्ये गतिमानता येण्यासाठी आपल्याला न्यायव्यवस्थेत खूप मोठ्या सुधारणा कराव्या लागतील. आपल्याकडे जिल्हा पातळीवर दिवाणी, फौजदारी न्यायालये आहेत तशी कर्मिशिअल किंवा व्यावसायिक न्यायालये असली पाहिजेत. आज घडीला तशी व्यवस्था भारतात नाही.

**करभरणा** : जीएसटी लागू झाला असला तरीही भारताची करभरणा यादीतील क्रमवारी खाली घसरलेली आहे. याचा अर्थ जीएसटीमध्ये अद्यापही काही त्रुटी आहेत. येणाऱ्या काळात त्या दूर केल्या पाहिजेत.

आणखी एक मुद्दा म्हणजे, सामान्यांच्या भाषेत सांगायचे तर भारतात व्यवसायाच्या एन्ट्री पॉईंटविषयी आपण खूप छान काम केले आहे. व्यवसाय थाटण्याबाबत भारतात स्थिती चांगली आहे. पण त्यापुढील टप्पे म्हणजे तो सुरू ठेवण्यासाठी आणि व्यवसायातून बाहेर पडण्यासाठी भारताची प्रणाली कमकुवत आहे त्यावर भारताला काम करावे लागणार आहे.

लेखक : परराष्ट्र धोरण विश्लेषक
(पीएच.डी., जेएनयू, दिल्ली)



## सुधारलेल्या क्रमवारीचे फायदे

व्यवसाय सुगमतेच्या क्रमवारीतील ही भरारी भारताला अनेकार्थांनी फलदायी ठरणार आहे. यामुळे आपल्याकडे परकीय गुंतवणुकीचा ओघ वाढणार आहे. त्यातून रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे. हा रोजगार प्रामुख्याने बांधकाम व्यवसायात वाढेल. कारण परकीय गुंतवणूक ही प्रामुख्याने पायाभूत सुविधांच्या विकासात म्हणजेच बांधकाम क्षेत्रातच होत आहे. आज जपानच्या मदतीने मुंबई दिल्ली, चेन्नई बंगलोर हे औद्योगिक परिक्षेत्र, बुलेट ट्रेन, मेट्रो त्याचप्रमाणे उत्तर पूर्व भागात रस्ते बांधणी यामध्ये २० अब्ज डॉलरची गुंतवणूक झाली आहे. ही गुंतवणूक वाढत गेल्यास रोजगारनिर्मितीही वाढणार आहे.

**महसुलातील वाढ**ः जगभरातील अनेक नव्या कंपन्या भारतात आल्यास त्यांच्याकडून मिळणाऱ्या करामधून करउत्पन्न वाढणार आहे.

**प्रगत तंत्रज्ञान**ः परदेशी कंपन्यांसोबत प्रगत तंत्रज्ञानही भारतात येणार आहे. त्यामुळे आपल्या तांत्रिक विकासास चालना मिळणार आहे. तसेच यातून खासगी क्षेत्राचाही विकास होणार आहे.

सध्या भारत परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून जगावर प्रभाव पाडू इच्छित आहे; मात्र आर्थिक प्रगती सातत्यपूर्ण नसेल तर महासत्ता म्हणून भारत पुढे येऊ शकत नाही. आज आर्थिक ताकद वाढवूनच चीन जगातील दुसऱ्या क्रमाकांची महासत्ता झालेला आहे. भारताने २०१४ पासून प्रगतिशील वाटचाल सुरू केली असली तरी आपण गाफील राहता कामा नये. कारण आपली स्पर्धा चीनशी आहे. चीनच्या प्रगतीचा वेग भारताच्या दुप्पट आहे. आताच्या यादीतही चीनची क्रमवारी सुधारलेली आहे. त्यामुळे भारताला सातत्यपूर्ण प्रयत्न, प्रगती करावी लागणार आहे. आगामी काळात 'इज ऑफ डुईंग बिझनेस'च्या यादीत भारत ५० व्या स्थानावर पोहोचला आणि प्रधानमंत्र्यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण झाले तर रोजगार, महसूल, आणि परकीय गुंतवणुकीचे प्रश्न मार्गी लागतील. तेव्हा भारताने याकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.




**फेक न्यूज म्हणजे नेमके काय? जीवितहानी, एखाद्याची बदनामी, किंवा एखाद्याला जीवनातून उठवणे, कौटुंबिक कलह व आयुष्यातील तणाव याचे अलीकडचे कारण बऱ्याचदा फेक न्यूज असल्याचे दिसून येते. हे सायबर युगातील मोठे दुर्दैव ठरले आहे.**

# सायबर अभिशाप

**ॲड. प्रशांत माळी**

आज सायबर विश्वामध्ये पोहणाऱ्या कुठल्याही बातमीकडे आपण संशयित दृष्टीने बघत असतो. याचा अर्थ असा की, सायबर विश्वातील लोकांची असलेली निष्ठा कमी होत चालली आहे. मागील काही दिवसांत अफवांनी घातलेल्या थैमानामुळे व्हॉट्सॲप, फेसबुक या समाज माध्यमांना गालबोटच लागले आहे.

फेक न्यूजच्या पसरण्यामुळे निर्दोष जीव चिरडले जात आहेत. दुःख याचे वाटते की, व्हॉट्सॲप व फेसबुक यांचेच यूजर्स या फेक न्यूज पसरवत आहेत व यांचेच यूजर्स या फेक न्यूजमुळे आपला जीव गमावत आहेत. यालाच कायद्याच्या भाषेमध्ये 'Abetment' (गुन्ह्याला प्रोत्साहन देणे) असे म्हणतात. सामान्यपणे गुन्ह्याला प्रोत्साहन देणारी व्यक्ती ही गुन्हा करणाऱ्या व्यक्तीइतकीच गुन्हेगार असते.

प्रत्येकाच्या हातात असलेला स्मार्ट फोन, मोफत डेटा, ग्रुपच्या माध्यमातून एका क्षणात त्याचा प्रसार करण्याचे तंत्र आणि समाज माध्यमातील प्रत्येक संदेशाला खरे मानण्याची अज्ञानी मानसिकता यामुळे कायदा हातात घेत निष्पापांच्या जीवावर उठणाऱ्या या फेक न्यूजना अटकाव घालणे पोलीस प्रशासनासमोरील सर्वात मोठे आव्हान ठरले आहे.

फेक न्यूजच्या शोधात समाज माध्यमातील समूहांमध्ये शिरून मागोवा घेण्यासोबतच, येणारी प्रत्येक माहिती गांभीर्याने घेणे, हे जिल्हा आणि शहर पोलीस तसेच राज्यातील सायबर सेल्स यांची जबाबदारी बनली आहे. त्यासाठी लोकांची मराठीमधून जनजागृती आणि पोलीस कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण यावर राज्याच्या सायबर विभागाचा भर असणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

## एकत्रित प्रयत्न

समाज माध्यम कंपन्या आणि प्रशासन यांचे एकत्रित प्रयत्नच फेक न्यूजच्या फैलावावर मात करू शकतात. समाज माध्यम कंपनीजवळ उपयोगकर्त्यांच्या प्रतिक्रियांबद्दल माहिती असते, जी प्रशासनाजवळ नसते, तसेच कोणा तिऱ्हाईत संशोधकांकरवी माहितीचे प्रसरण कसे होते याचा अंदाज घेता येऊ शकतो. याचाच अर्थ, आपणा सर्वांकडे या अफवांच्या कोड्याबद्दल तुटक-तुटक अशी माहिती आहे आणि फेक न्यूजच्या जाळ्यातून बाहेर पाडण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन तोडगा काढणे महत्त्वाचे आहे. समाज माध्यमातील फेक न्यूजरूपी अभिशापातून मुक्त होण्यासाठी जबाबदार नागरिक म्हणून आपण सर्वांनी ठोस पावले उचलणे अनिवार्य आहे. त्यासाठी एखादा संदेश पुढे पाठवण्याऐवजी मजकूर नक्की कोणी लिहिला



आहे, याबाबतीत खातरजमा करावी आणि मगच तो पुढे प्रसारित करावा; जेव्हा एखाद्या माहितीमुळे आपण अस्वस्थ होतो, रागावतो किंवा घाबरतो तेव्हा ती माहिती आपल्याला त्रास होण्याच्या उद्देशानेच आपल्यापर्यंत दिली गेली आहे का, हे तपासावे आणि या प्रश्नाचे उत्तर जर होकारार्थी असेल, तर तो मजकूर पुढे पाठवण्याआधी दोनदा विचार करावा; ज्या गोष्टी घडणेच जवळजवळ अशक्य असते, त्या गोष्टी सहसा अफवाच असतात. त्यामुळे अशा प्रकारच्या माहितीचा पाठपुरावा करावा; छायाचित्र आणि व्हिडिओवर विश्वास ठेवणे सहज सोपे असते. परंतु, हे छायाचित्र आणि व्हिडिओदेखील लोकांना फसवण्याच्या दृष्टीने संपादित करता येऊ शकतात. कधी-कधी छायाचित्र खरे



असतात, पण त्यासंबंधित सांगितली जाणारी कथा मात्र खोटी असू शकते. त्यामुळे अशा छायाचित्रांबद्दल तसेच व्हिडिओबद्दल इंटरनेट माध्यमाद्वारे माहिती काढून त्यांचा उगम नक्की कुठून होत आहे, याची शहानिशा करावी; फेक न्यूजमधील मजकूर शक्यतो काही ना काही चुकांनी भरलेला असतो. उदाहरणार्थ, शब्दांची जोडणी, लिहिण्याची पद्धत, आकार, उकार, इत्यादी. म्हणजेच, मेसेजमधील विविध चिन्हे, शब्दांची मांडणी, व्याक्रणाच्या चुका यावरून त्या संदेशाची वैधता लक्षात घ्यावी. आपण कोणती माहिती बघावी, कोणत्या गोष्टींवर विश्वास ठेवावा याबाबतचे नियंत्रण नेहमी आपल्याकडे असते. त्यामुळे ज्या क्रमांकावरून वा ज्या कोणत्या समूहातून अफवा आणि तत्सम मजकूर पसरवले जातात त्या क्रमांकांना (ब्लॉक) थोपवावे, ग्रुपमधून आपण बाहेर पडावे. याकरवी आपला व्हॉट्सअ‍ॅपचा अनुभव नियंत्रित राखला जाईल. सहसा खोट्या बातम्या खूप जास्त प्रमाणात पसरविल्या जातात. विशिष्ट संदेश जर खूप वेळा आपल्याला मिळाला तर त्याकडे दुर्लक्षच करावे. कारण, एकच माहिती अनेक लोकांकडून मिळाली म्हणजे ती सत्य आहे, असा निष्कर्ष काढणे चुकीचे ठरते. म्हणून अशा माहितीला आणखी पुढे पसरवू नये.

## सामाजिक जबाबदारी

व्हॉट्स अ‍ॅप हा भारतीय दळणवळणाचा अविभाज्य भाग बनून राहिला आहे, म्हणून त्याने सामाजिक जबाबदारी आणि सलोख्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. काही मुद्दे व्हॉट्सअ‍ॅपने केल्यामुळे व्हॉट्सअ‍ॅप अफवांना आटोक्यात आणू शकते. जसे की: ● व्हॉट्सअ‍ॅपच्या संदेशवर क्लिक केल्यास येणाऱ्या पर्यायांपैकी, जसे की, रिप्लाय, फॉरवर्ड, कॉपी व्यतिरिक्त 'फेक न्यूज', 'अब्युझिव्ह मेसेज' असे पर्याय व्हॉट्स अ‍ॅप अमलात आणू शकते. ● व्हॉट्सअ‍ॅपच्या सेटिंग्समध्ये एक असा पर्याय उपलब्ध करून देता येईल, जिथे आलेला संदेश उपयोगकर्ता छापू शकतील आणि त्याच्या वैधतेबद्दल जाणता येईल. मेसेजबद्दलची वैधता 'क्राउड-सोर्सिंग' या उपक्रमातून करता येईल.

व्हॉट्सअ‍ॅप व फेसबुक यांनी त्यांचे माध्यम वापरून झालेल्या हानीच्या भरपाईसाठी तसेच अनुसंधानासाठी किती पैसे गुंतवले, असा सवाल सरकारने विचारणे अपेक्षित आहे. फेसबुकसारख्या धनाढ्य कंपनीने तंत्रज्ञानाच्या कमकुवतीचा आव आणणे म्हणजे भाबड्या नागरिकांचा विश्वासघात करणे होय. अशा अफवांविरोधात सामाजिक उद्बोधन करून जनजागृती करणे, हीदेखील या कंपन्यांची जबाबदारी आहे.

## तरतूद आवश्यक

फेक न्यूजवर मात करण्यासाठी भारतीय कायद्यामध्ये विशेष अशी अफवांविरोधी कोणतीही तरतूद नाही. भारतीय संविधानांतर्गत १९ व्या अनुच्छेदानुसार भाषास्वातंत्र्य प्रदान केल्यामुळे कोणीही काहीही खोट्या बातम्या, माहिती प्रसारित करतात. खोट्या बातम्यांमुळे त्रस्त झालेल्या व्यक्तींकरिता कायदे प्रणालीद्वारे विशिष्ट आसरा दिला जातो. असे असले तरी, भारतीय दंडसंहिता अफवांच्या बाबतीत अधिक सामर्थ्यवान म्हणता येईल. कलम १५३ आणि कलम २९५ अंतर्गत अफवांविरुद्ध आवाज उठवता येतो. कलम १५३ अंतर्गत दंगा घडवून आणण्याकरिता बेछूटपणे चिथावणी देण्याचा गुन्हा दाखल होऊ शकतो. इतकेच नव्हे, तर माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० अंतर्गत कलम ६६-फ अन्वये सायबर आतंकवादासाठी आजीवन कारावासाची शिक्षा होऊ शकते. तर, कलम २९५ अंतर्गत कोणत्याही वर्गाच्या धर्माचा अपमान करण्याच्या उद्देशाने उपासनास्थानाचे नुकसान करण्याविरुद्ध गुन्हा दाखल होऊ शकतो. अफवा वा खोट्या बातम्यांच्या प्रसारामुळे देशभरात प्रतिकूल पडसाद उमटू शकतात. या फैलावामुळे सांप्रदायिक शांतता भंग होऊ शकते आणि म्हणून याचा योग्य त्या वेळी, योग्य तो छडा लावणे ही काळाची गरज आहे.

## एक अभिशाप

फेक न्यूज हा एक अभिशाप बनू नये, यासाठी विविध माध्यमांद्वारे व समाज माध्यमे, संकेतस्थळाद्वारे सरकारने लागलीच तंत्रज्ञानयुक्त पावले उचलणे गरजेचे झाले आहे. तुम्ही-आम्ही मिळून चला असा संकल्प करू की, कोणत्याही बातमीची शहानिशा केल्याशिवाय ती पुढे कोणालाच पसरवणार नाही व कोणतीही बातमी फेक न्यूज आहे असे आढळल्यास त्या बातमीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी मदत करू आणि फेक न्यूज पसरवून सामाजिक व कायद्याचे गुन्हेगार होणार नाही.

**सायबर कायदा आणि सुरक्षा तज्ज्ञ**



**राज्य शासनाचा नोंदणी व मुद्रांक विभाग हा प्रामुख्याने नोंदणी अधिनियमानुसार दस्तांची नोंदणी करणे व मुद्रांक अधिनियमाची अंमलबजावणी करून शासनासाठी महसूल संकलन करणे ही दोन कामे पार पाडतो. विशेष विवाह कायद्याची अंमलबजावणी करण्याचे कामही या विभागाद्वारे केले जाते. विविध उपक्रमांच्या माध्यमातून हा विभाग अधिकाधिक लोकाभिमुख बनला आहे.**

# सुरक्षित कागदपत्रे, सुरक्षित समाज...

**संतोष हिंगने**

नोंदणी कायदा हा केंद्रीय कायदा आहे. सध्याचा कायदा १९०८ पासून अंमलात आलेला असला तरी नोंदणी यंत्रणेचे अस्तित्व अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून असल्याचे आढळून येते. 'पक्षकारांनी आपापसात दस्त लिहून देण्याचे कृतीस राज्य संस्थेतर्फे साक्षीदार असणे, त्या दस्ताचे अभिलेख जतन करून मागणीनुसार त्याच्या प्रती उपलब्ध करून देणे व एखाद्या स्थावर मिळकती संदर्भात दोन व्यक्तींमध्ये झालेल्या व्यवहाराची माहिती इतर व्यक्तिंना मिळण्याची सोय उपलब्ध करून त्या मिळकतीचा दुबार व्यवहार होऊन एखाद्याची फसवणूक होणार नाही अशी व्यवस्था करणे' असे नोंदणी कायद्याचे प्रमुख उद्देश सांगता येतील.

राज्यात दरवर्षी सुमारे २२ लाख दस्तऐवजांची नोंदणी होते. या दस्तऐवजांमध्ये साधारणतः स्थावर मिळकतीची खरेदीखते, विक्री करारनामे, भाडेपट्टे, गहाणखते, लिव्ह ॲण्ड लायसन्स करारानामे अशा विविध प्रकारच्या दस्तऐवजांचा समावेश होतो. खरेदीखतासारखे काही प्रकारचे दस्तऐवज मालमत्ता हस्तांतरण कायदा किंवा तत्सम कायद्यानुसार नोंदणी करणे आवश्यक असते. या दस्तांची नोंदणी केली नाही तर त्याद्वारे अपेक्षित असणारा परिणाम साध्य होत नाही. मृत्युपत्रासारखे काही प्रकारचे दस्तऐवज नोंदणी करणे कायद्याने अनिवार्य नाही, तरी देखील जर त्याची नोंदणी केली असेल तर भवितव्यात त्या दस्तऐवजाचे खरेपणाबद्दल शंका घेण्यास वाव राहत नाही, म्हणून पक्षकार स्वतःहून अशा प्रकारचे दस्तऐवज नोंदणीसाठी सादर करतात.

या सर्व दस्तऐवजांचे अभिलेख विभागाकडे जतन केले जाते व नागरिकांच्या मागणीनुसार त्याच्या प्रती उपलब्ध करून दिल्या जातात. तसेच त्या दस्तऐवजांची माहिती 'शोध प्रक्रियेद्वारे नागरिकांना उपलब्ध करून दिली जाते. एखाद्या मिळकतीचा व्यवहार करण्यापूर्वी त्या मिळकतीचे अगोदर कोणते व्यवहार झालेले आहेत हे समजून येण्यासाठी ही शोध सुविधा उपयुक्त ठरते.

## नवे सदर




**नोंदणी व मुद्रांक विभागाच्यावतीने आपल्या जीवनाशी निगडित विविध दस्तांची म्हणजेच कागदपत्रांची नोंदणी केली जाते. अशी नोंदणी करणे कागदपत्रांच्या वैधतेसाठी आवश्यक असते. महत्त्वाच्या कागदपत्रांची नोंदणी करण्याची आवश्यकता व गरज यांची माहिती देणारे 'नोंदणी व मुद्रांक शुल्क' हे सदर दर महिन्याला प्रसिद्ध करण्यात येईल.**

## मुद्रांक अधिनियम

देशात दस्तऐवजांवर मुद्रांक शुल्क रुपाने कर आकारणीची सुरुवात १९व्या शतकाच्या सुरुवातीस झाली. सुरुवातीला संपूर्ण देशासाठी भारतीय मुद्रांक अधिनियम हा एकच कायदा होता, पुढे महाराष्ट्रासाठी मुंबई मुद्रांक अधिनियम हा स्वतंत्र कायदा १९५८ पासून अस्तित्वात आला, जो सध्या महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम या नावाने ओळखला जातो.

या कायद्यामध्ये कोणत्या प्रकारच्या दस्तऐवजास किती दराने मुद्रांक शुल्क द्यावे लागेल ते कोणत्या पद्धतीने भरावे लागेल याच्या तरतुदी आहेत. या विहित दराप्रमाणे व पद्धतीने मुदांक शुल्क न भरल्यास तो दस्तऐवज यथोचित मुद्रांकित समजला जाणार नाही आणि कोणत्याही न्यायालयीन कार्यवाहीमध्ये तो पुरावा म्हणून ग्राह्य धरला जाणार नाही. शिवाय दस्तातील संबंधित पक्षकारास दंडात्मक कार्यवाहीस सामोरे जावे लागेल अशाही तरतुदी या कायद्यामध्ये आहेत. एखाद्या दस्तऐवजाच्या बाबतीत असे घडू नये म्हणून त्यास किती मुद्रांक शुल्क लागेल हे पक्षकारांना अधिकृतरीत्या समजून घेण्यासाठी अभिनिर्णय हीदेखील व्यवस्था या कायद्यामध्ये आहे. त्याच रीतीने जादा भरलेल्या किंवा वापर करावयाचा नसलेल्या मुद्रांकाचा परतावा देण्याच्या तरतुदीदेखील या कायद्यामध्ये आहेत.

## महसूल संकलन

नोंदणीसाठी सादर होणाऱ्या व न होणाऱ्या दस्तऐवजांना मिळून वर्षाला साधारण २५ हजार कोटी इतका महसूल मुद्रांक शुल्क रूपाने शासनाकडे संकलित होतो. राज्यासाठी महसूल संकलन करणाऱ्या विभागांमध्ये, हा विभाग दुसऱ्या क्रमांकावर असून राज्याच्या विकासामध्ये या महसुलाचे योगदान लक्षणीय आहे.

स्थावर मिळकत स्वतःच्या निवासासाठी, उद्योग व्यवसायासाठी किंवा भवितव्यातील फायद्याकरिता गुंतवणूक म्हणून संपादित करण्याचा स्थायिभाव सर्वसाधारण नागरिकांमध्ये असतो. या संपादन प्रक्रियेत किंवा वित्तीय साहाय्य घेण्याच्या प्रक्रियेत नागरिकांचा मुद्रांक व नोंदणी या विषयांशी संबंध येत असतो. दस्तऐवजांची नोंदणी करणे, जुन्या व्यवहारांचा शोध घेणे, प्रमाणित नकला घेणे, मूल्यांकन व मुद्रांक शुल्क जाणून घेणे, मुद्रांक शुल्क भरणे, परतावा घेणे अशा विविध कामकाजांसाठी दरवर्षी साधारण २ कोटी लोकांचा याविभागाशी संबंध येत असतो.

## गतिमान प्रशासन

अशा रीतीने राज्याचे नागरिक आणि शासन या दोन्हींसाठी या विभागाचे कामकाज महत्त्वाचे आहे. विभागानेदेखील याची जाणीव ठेवून मागील काही वर्षात आपल्या कामकाजामध्ये आमूलाग्र बदल केले आहेत. साधारण २००२ मध्ये विभागाने 'भवितव्यात, दस्तनोंदणीची सेवा देणे व मुद्रांक शुल्क रूपाने महसूल संकलन करणे या दोन्ही क्षेत्रांमध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारा विभाग अशी जनसामान्यात ओळख स्थापित व्हावी' असे लक्ष समोर ठेवून, लोकाभिमुख व गतिमान प्रशासनाच्या दृष्टीने पावले उचलायला सुरुवात केली.

## दस्त नोंदणीसाठी सरिता

गतिमान प्रशासनाकरिता विभागाने नियम, मार्गदर्शक सूचना, कामकाज पद्धती यामध्ये सुसूत्रीकरण व सुलभीकरण केले आहे. कामकाजामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करून सेवेची गतिमानता व दर्जा वाढवण्यात आला आहे. २००२ मध्ये दस्त नोंदणीसाठी सरिता (Stamp and Registration Information Technology Application) या संगणकीकृत प्रणालीचा राज्यात वापर सुरू करण्यात आला. पुढे वेळोवेळी उपलब्ध झालेल्या आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करत विभागाने ई-गव्हर्नन्स ही संकल्पना प्रत्यक्षात अंमलात आणली. २०१२ पासून मध्यवर्ती सर्व्हरवर आधारित 'आय-सरिता' प्रणाली राज्यात कार्यान्वित आली.

पक्षकारांना त्यांच्या दस्ताची डेटा एन्ट्री स्वतः करता यावी, याकरिता पब्लिक डेटा एन्ट्री, कोणत्याही मिळकती संदर्भात या पूर्वी नोंदणी झालेल्या दस्तांची माहिती घरबसल्या मिळावी, याकरिता ई-सर्च, मिळकतीचे मूल्यांकन जाणून घेण्यासाठी ई-एएसआर, दस्त नोंदणीसाठी दुय्यम निबंधक कार्यालयाची वेळ आरक्षित करण्यासाठी ई-स्टेप ईन, दस्तऐवजासाठीचे मुद्रांक शुल्क घरबसल्या भरता यावे, याकरिता ई-पेमेंट असे विविध ई-उपक्रम सुरू करण्यात आले.




नागरिकांना त्यांचे कामे कोणत्याही मध्यस्थांशिवाय, कोणत्याही ठिकाणावरून व कोणत्याही वेळी करता यावेत, हा या ई-उपक्रमांमागील मुख्य उद्देश आहे. त्याचप्रमाणे आय-सरिता प्रणाली महसूल विभागाच्या प्रणालीशी जोडणी करून ई-म्युटेशन हा उपक्रम संयुक्तरीत्या राबवण्यात येत आहे. ज्यामुळे दस्त नोंदणीनंतर ७/१२ उताऱ्यावरील मालकी हक्कांमध्ये बदल होण्याची प्रक्रिया गतिमान व पारदर्शी झाली आहे. नोकरी, व्यवसाय व शिक्षण अशा गरजांमुळे गावांकडून शहरांकडे किंवा एका शहरातून दुसऱ्या शहरांकडे तात्पुरत्या स्थलांतरणाचा ओघ वाढत आहे. अशा तात्पुरत्या रहिवासाच्या कालावधीत एखादी सदनिका भाडेकरार (लिव्ह ॲण्ड लायसन्स) तत्त्वावर घेऊन राहण्याची पद्धत मोठ्या प्रमाणात प्रचलित आहे. अशा व्यवहारातील लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनाम्यास नाममात्र दराने मुद्रांक शुल्क भरून त्याची नोंदणी करणे अनिवार्य असते. तथापि, कायदेशीर तरतुदींची माहिती नसणे किंवा वेळ कमी असणे अशा कारणांनी या तरतुदीचे पालन होत नाही. सर्वसामान्यांना या दस्तांची नोंदणी दुय्यम निबंधक कार्यालयात न येता ऑनलाइन पद्धतीने घरबसल्या केव्हाही करता यावी, याकरिता विभागाने ई-रजिस्ट्रेशन ही सुविधा २०१४ पासून उपलब्ध करून दिली आहे. आजपर्यंत साधारण २० लाख नागरिकांनी ७ लाख दस्तांची नोंदणी दुय्यम निबंधक कार्यालयात न येता स्वतः च्या सोयीनुसार ठिकाणावरून व वेळेनुसार करून घेतली आहे. देशात अशी सुविधा देणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे.

## नागरिकांच्या सुविधेसाठी

एकापेक्षा जास्त दुय्यम निबंधक कार्यालये असणाऱ्या शहारांमध्ये, दस्ताची नोंदणी नागरिकांना सोयीच्या, त्या शहारामधील कोणत्याही दुय्यम निबंधक कार्यालयात करण्याची सुविधा २००५ पासून उपलब्ध करून दिली आहे. मुंबई, पुणे, ठाणे यासारख्या शहरांमध्ये काही दुय्यम निबंधक कार्यालये सकाळी ७ ते रात्री ९ पर्यंत कार्यान्वित ठेवण्यात आली आहेत. काही कार्यालये दुसरा-चौथा शनिवार व रविवारीसुद्धा कार्यान्वित असतात. नागरिकांच्या व्यस्त वेळापत्रकाचा विचार करून असे प्रशासकीय उपक्रम विभाग नेहमीच राबवत असतो.

ई-उपक्रमांची माहिती व त्यांचे फायदे याबाबत नागरिकांमध्ये जागृती करून वापरामध्ये साहाय्य करणे यासाठी विभाग प्रयत्नशील आहे. याकरिता २०१५ पासून विभागाने सारथी (Stamp and Registration Assistance Through Helpline Information) हा उपक्रम राबवला आहे. माहितीयुक्त संकेतस्थळ, नागरिकांना पडणारे प्रश्न व त्यांची सुलभ भाषेत उत्तरे असलेले पुस्तक, वेब ॲप्लिकेशन, मोबाइल ॲप यांचा या उपक्रमामध्ये समावेश आहे. शिवाय नागरिकांच्या शंका समाधानासाठी व ई-सेवा वापरताना साहाय्य करण्यासाठी ८८८८००७७७७ या क्रमांकावर हेल्पलाइन उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**नोंदणी महानिरीक्षक कार्यालय**



कोल्हापूर येथे पोक्सो कायदा जागरूकता कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण घेतलेले नागरिक.

**राजश्री शाहू महाराजांच्या आदर्श सामाजिक कार्याचा वारसा घेऊन कोल्हापूर येथे अनेक प्रकल्प राबवले जातात. हाच आदर्श घेऊन 'मुख्यमंत्री फेलो'नी राबलेला एक प्रकल्प म्हणजे कोल्हापूर जिल्ह्यातील 'पॉक्सो जागरूकता कार्यक्रम'. लैंगिक शोषणापासून मुलांचे संरक्षण करणाऱ्या या कायद्याच्या जनजागृतीदरम्यान एक पाऊल सकारात्मकतेने टाकल्याचे समाधान हा उपक्रम राबवणाऱ्यांना मिळाला.**

# विश्वासाची साखळी

**रोहिणी कळंबे, आकांक्षा नरोडे, निकिता निंबाळकर**

सामाजिक प्रगती आणि आर्थिक विकास यांची सांगड घालून शाश्वत विकासाकडे आपण वाटचाल करत आहोत. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगती देखील अचंबित करणारी आहे. जग जितक्या झपाट्याने पुढे जाण्याच्या प्रयत्नात आहे तिथे एक प्रश्न पडतो की, या जगाचे उद्याचे नेतृत्व करणारी पिढी आज सुरक्षित आहे का? बलात्कार, बाललैंगिक शोषण, बालकामगार, स्त्री भ्रूणहत्या यांवर रोज येणाऱ्या वृत्तपत्रातील बातम्या आणि लेख आपण वाचतच असतो. यातील अनेक गोष्टी आपल्या आजूबाजूला किंबहुना आपल्यासोबतही घडलेल्या असतात. 'एक जबाबदार नागरिक म्हणून आपण काय करू शकतो' यावर आपण कितपत विचार करतो हे देखील महत्त्वाचे आहे. अर्थात अनेकदा प्रश्न माहीत असतात पण योग्य उत्तर, त्यावरील उपाययोजना शोधणे अवघड असते आणि ते मिळाले तरी हे सामाजिक प्रश्न एवढे विक्राळ आहेत की, त्यासाठी योग्य व्यासपीठ मिळणे महत्त्वाचे आहे. हेच व्यासपीठ आम्हाला मिळाले ते 'मुख्यमंत्री फेलोशिप'च्या माध्यमातून. मुख्यमंत्री फेलो म्हणून काम करत असताना शासन कशाप्रकारे काम करते ते जवळून पाहण्याची संधी तर मिळतेच परंतु त्याचबरोबर नवनवीन कल्पना वापरून सामाजिक, आर्थिक प्रश्नांवर कशाप्रकारे मात करू शकतो हे अनुभवता येते.

## नवा अनुभव

मुख्यमंत्री फेलोशिप अंतर्गत आमची नियुक्ती कोल्हापूर येथे झाली. कोल्हापूर हा महाराष्ट्राच्या दक्षिणेस वसलेला, ऐतिहासिक, सांस्कृतिक महत्त्व, सहकाराचा आणि त्याचबरोबर राजश्री शाहू महाराजांचा शैक्षणिक वारसा लाभलेला जिल्हा. राजश्री शाहू महाराजांच्या आदर्श सामाजिक कार्याचा वारसा घेऊन येथे अनेक प्रकल्प राबवले जातात. हाच आदर्श घेऊन आम्ही राबवलेला एक प्रकल्प म्हणजे कोल्हापूर जिल्ह्यातील 'पॉक्सो जागरूकता कार्यक्रम'.

पॉक्सो (Protection of Children from Sexual Offences (POCSO) Act) या कायद्यामध्ये बालकांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराबबत सर्व तरतुदी आहेत. या कायद्याची योग्य अंमलबजावणी झाल्यास निष्पाप बालके लैंगिक शोषणापासून दूर राहण्यास मदत होईल. त्यासाठी जनजागृतीही तेवढीच महत्त्वाची आहे. अनेक ठिकाणी सर्वसामान्य जनतेला या कायद्याबाबत माहिती नाही.


सध्या उपलब्ध असलेल्या 'नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो' (एनसीआरबी) च्या आकडेवारीनुसार भारतीय राज्यघटना कलम ३७६ आणि पॉक्सो कायदा कलम ४ व ६ या अंतर्गत नोंदणी झालेल्या बालकांवरील बलात्काराच्या गुन्ह्यांमध्ये

२०१५ सालापेक्षा २०१६ मध्ये ८२% वाढ दिसून आली आहे. याच अहवालानुसार २०१४ मध्ये भारतात बालकांवरील अत्याचाराबाबतीत ८९,४२३ गुन्हे नोंद झाले आहेत, ही संख्या २०१६ मध्ये १,०६,९५८ झाली आणि यामध्ये राज्यनिहाय गुन्हे पाहिले तर उत्तर प्रदेश (१५% गुन्हे), महाराष्ट्र (१३.६%) आणि मध्य प्रदेश (१२.९%) या राज्यांमध्ये सर्वाधिक बालकांवरील अत्याचाराचे गुन्हे नोंद झाले दिसून येतात. ही आकडेवारी मुली आणि मुले यांसाठी कमीअधिक प्रमाणात समान आहे. यामध्ये दोन महिन्याच्या अर्भकापासून १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या बालकांचा समावेश आहे. ही हृदयद्रावक आकडेवारी पाहता या विषयाची संवेदनशीलता लक्षात येते. लहान मुलांचे पालक आणि शिक्षक यांना या पॉक्सो कायद्याविषयी माहिती असणे गरजेचे आहेच परंतु या विषयावर मुलांशी संवाद साधणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि मुख्यतः त्यांना योग्य आणि अयोग्य स्पर्श समजावून सांगणे हे त्याही पेक्षा महत्त्वाचे आहे.

## संवादाचे प्रशिक्षण

सध्या कोल्हापूर येथे सुरू असलेल्या पॉक्सो जागरूकता कार्यक्रमात याच गोष्टींचे प्रशिक्षण दिले जाते. याचा पहिला टप्पा कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली २०१८ साली जुलै महिन्यापासून राबवण्यात आला. यामध्ये कोल्हापूर महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या ५९ शाळांमधील ११८ शिक्षकांना 'अर्पण फाऊंडेशन' या संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये मुलांशी संवाद कसा साधावा, अत्याचाराला मुले बळी पडू नये यासाठी प्रतिबंधात्मक गोष्टी आणि अशी घटना एखाद्यासोबत घडल्यास उपाययोजनात्मक गोष्टींचे सखोल आणि विविध प्रात्यक्षिकांमार्फत प्रशिक्षण देण्यात आले. यानंतर याच प्रकल्पांतर्गत कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमान मित्तल यांच्या मार्गदर्शखाली करवीर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या २०१७ शाळांपैकी १८१ शाळांमध्ये अर्पण संस्थेमध्ये प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षण देण्यात आलेल्या शिक्षकांनी पुढे आपल्या शाळेत जाऊन विद्यार्थ्यांशी, पालकांशी संवाद साधला आणि पॉक्सो कायद्याचे महत्त्व समजावून सांगितले. जेव्हा खेड्यातील मुलांशी पालकांनी संवाद साधला तेव्हा गोष्टी स्पष्टपणे मांडण्यास त्यांना सुरुवातीला त्रास नक्कीच झाला. परंतु प्रशिक्षणात मिळालेले साहित्य (अर्पण संस्थेचे पुस्तकांचे किट) यामुळे त्यांना मदत झाली. विषयाची संवेदनशीलता लक्षात घेऊन कोल्हापूर शहर आणि करवीर तालुक्यात सुरू झालेला प्रकल्प पुढच्या टप्प्यात संपूर्ण जिल्ह्यात राबवण्यात येणार आहे. असाच प्रकल्प फेलोंमार्फत चंद्रपूर जिल्ह्यातदेखील राबवण्यात आला आहे.




## अमूल्य प्रशिक्षण

'बालमन हे मातीच्या गोळ्यासारखे असते, त्याला जसा आकार आपण देऊ तसे ते घडत जाते'. त्यामुळेच शिक्षकांच्या माध्यमातून या प्रकल्पाची सुरुवात करण्याचे ठरले. शिक्षक हा विद्यार्थ्यांचा सर्वांत जवळचा मित्र असतो. त्यांनी सांगितलेल्या गोष्टी बालकांच्या मनात घर करतात. त्यांच्यासाठी शिक्षक म्हणजे ज्ञानाचा झरा वाटणारा महासामुद्रच. त्यांच्या मदतीने का होईना बालमनावर सदैव ज्ञानाचा आणि चांगल्या विचारांचा दिवा तेवत राहावा आणि होणाऱ्या चांगल्या-वाईट विचारांवर त्यांनी स्वक्षमतेने मात करावी, कुठलीही गोष्ट, कसलाही संकोच न बाळगता आपल्या विश्वासू व्यक्तीला त्या बालकाने सांगावी. बाल अत्याचाराविरोधात लढण्यासाठी शिक्षक-पालक-बालक अशी विश्वासाची साखळी या प्रशिक्षणामार्फत बनण्यास सुरुवात झाली. क्रूर प्रवृत्तीच्या दुष्टांच्या कृतीला पूर्णविराम लागावा आणि आणि त्या इवल्याशा मनावर होणारे आघात थांबावेत हाच खरा अट्टहास.

या अमूल्य प्रशिक्षणाला मूल्य काही लागले नाही पण अनमोल असे ज्ञान समाजातील दुर्गम भागात पोहोचले. प्रशिक्षणानंतर एका शाळेला भेट दिली तेव्हा मुख्य फळ्यावरील पॉक्सो ई-बॉक्स असे लिहिलेले पाहून एक वेगळेच समाधान मिळाले. मुख्यमंत्री फेलोशिप नक्की काय आहे इथुन सुरू झालेला हा प्रवास इतका नावीन्यपूर्ण, कल्पक आणि समाधानकारक असेल असे कधीच वाटले नव्हते. नक्कीच ही फक्त सुरुवात आहे. देशाचे अनेक भाग अजून या संवेदनशील गोष्टींपासून अलिप्त आहेत. त्यांच्यापर्यंत हे प्रशिक्षण पोहोचवायचे आहे. बालकांना समजून घेऊन समुपदेशन करणे आणि त्या बालमानाचे बालपण कोलमडून पडू नये, यासाठीच हा छोटासा उपक्रम.

पाश्चिमात्य विचारवंत लिओ तुत्से म्हणतो,'हजारो मैलांचा प्रवास एका पावलाने सुरू होतो. लहान मुले कुठल्याही प्रकारच्या लैंगिक शोषणाला बळी पडणार नाही याची आपल्याला काळजी घ्यायची आहे. त्या दृष्टीने एक सकारात्मक पाऊल टाकायचे आहे. ते टाकू या...'




लेखक मुख्यमंत्री फेलो आहेत.


संग्रहित छायाचित्र

**सध्याचे युग हे स्पर्धेचे आहे. स्पर्धा परीक्षेला बसणे हा विद्यार्थ्याच्या आयुष्यातील महत्त्वाचा निर्णय असतो. विद्यार्थी जेव्हा स्पर्धा परीक्षा देण्याचा हा निर्णय घेतात तेव्हा नक्की कोणती परीक्षा द्यायची आहे याचा नीट विचार करायला हवा. आपला कल, आवड यांचा आधी नीट लेखाजोखा मांडावा व मगच स्पर्धा परीक्षेच्या तयारीला लागावे.**

# राज्यसेवेची तयारी

**भरत खताळ**

ज्या स्पर्धा परीक्षा देण्याचे ठरवले आहे, त्यांच्या पद्धतीचा अभ्यास करा. त्यातील टप्पे, लागणारा वेळ , अभ्यासक्रम, पुस्तके आणि परीक्षेसाठीची मानसिक तयारी यांची नीट तपासणी करा. त्यानुसार नियोजन करून अभ्यासातील सातत्य ठेवण्याचा प्रयत्न करा. अभ्यासाला सुरुवात करण्यापूर्वी खालील काही गोष्टी कराव्यात.

परीक्षेचा अभ्यास कराल त्या परीक्षेचा अभ्यासक्रम सर्वप्रथम पाठ असला पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे मागच्या कमीत कमी दहा वर्षांच्या प्रश्नपत्रिका पाहा. तिसरी गोष्ट अभ्यासाला सुरुवात करताना पुस्तके चांगल्या दर्जाची निवडावीत. त्यानंतर अभ्यास हीच आपली भक्ती!

## राज्यसेवा परीक्षा

प्रशासनामध्ये स्वतःचा ठसा उमटवण्याचे ध्येय बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने ही परीक्षा महत्त्वाची असते. यामध्ये तीन टप्पे असतात. राज्यसेवा पूर्व परीक्षा ४०० गुण, राज्यसेवा मुख्य परीक्षा ८०० गुण, मुलाखत १०० गुण. यामध्ये पूर्वपरीक्षा फक्त चाळणी परीक्षा असते. विद्यार्थांचे अधिकारी बनण्याचे स्वप्न हे मुख्य परीक्षा आणि मुलाखत यांच्या एकूण गुणांवर आधारित असते.

## परीक्षेसाठीची अर्हता

**वयोमर्यादा –** साधारण प्रवर्गासाठी किमान १९ व कमाल ३८ वर्षे आहे. (आयोगाच्या अधिसूचनेत नमूद केलेल्या तारखेपर्यंत.) वयोमर्यादा शिथिलक्षम खालीलप्रमाणे :

- महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षे
- अपंग उमेदवारांच्या बाबतीत ४५ वर्षापर्यंत
- पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत
- माजी सैनिक / आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांच्यासाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षापर्यत

**शैक्षणिक पात्रता:** मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने विहित केलेली समतूल्य अर्हता, मराठीचे ज्ञान आवश्यक.

## राज्यसेवा (पूर्व) परीक्षा

राज्यसेवा पूर्वपरीक्षा उत्तीर्ण झाल्यावरच मुख्य परीक्षा देण्याची संधी उपलब्ध होते. पूर्वपरीक्षा एकूण ४०० गुणांची असून यात दोन पेपर असतात. यांपैकी सामान्य अध्ययन पेपर – १ हा २०० गुणांसाठी आणि पेपर २ हा २०० गुणांसाठी. असे पूर्वपरीक्षेचे स्वरूप असते.

## पेपर १ ची तयारी

राज्यसेवा ही परीक्षा विविध विद्याशाखांतील पदवीधर विद्यार्थी

देऊ शकतात. त्यामुळे सामान्य अध्ययन पेपर १ मध्ये विद्यार्थ्यांची कला, वाणिज्य आणि विज्ञान या घटकांच्या सामान्य ज्ञानाची चाचणी घेतली जाते. यातील प्रश्नांचा दर्जा हा पदवी पातळीपर्यंत असतो. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यागणिक परीक्षेच्या तयारीची पद्धत बदलणारी असते.

## सामान्य अध्यायन – १ मधील समाविष्ट घटक

■ **चालू घडामोडी–** राज्य , राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या प्रचलित घडामोडींचा अभ्यास करावा. चालू घडामोडींचा आवाका आता विस्तारलेला असल्याचे प्रश्नपत्रिकांचा अभ्यास करताना जाणवेल. उमेदवारांनी या घटकांचा सविस्तर अभ्यास करावा. यासाठी नियमित वृत्तपत्रांचे वाचन महत्त्वाचे ठरते.

■ **भारताचा इतिहास–**(महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह) – भारताचा इतिहास आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळ या अभ्यासक्रमाचे सुरुवातीला व्यवस्थित वर्गीकरण करून घ्यावे, त्यानुसार इतिहासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांसाठी दर्जेदार पुस्तकाचे व्यवस्थित वाचन करून ऐतिहासिक प्रक्रियांचा संदर्भ समजून घ्यावा.

■ **महाराष्ट्र, भारत व जगाचा भूगोल –** आयोगाच्या मागील वर्षाच्या परीक्षांचा अभ्यास केला तर भूगोल घटकांमधील बदल लक्षात येतो. त्यानुसार अभ्यासाचे नियोजन करावे.

■ **राज्यातील व भारतीय राज्यपद्धती व शासन –** या घटकाची तयारी करताना राज्यघटनेनुसार दैनंदिन जीवनात ज्या घडामोडी घडत आहेत, त्याचा संदर्भ ध्यानात घ्यावा.



■ **आर्थिक व सामाजिक विकास –** अभ्यासक्रमात अर्थव्यवस्थेऐवजी आर्थिक व सामाजिक विकास असा शब्दप्रयोग आहे. अभ्यास करताना सर्वप्रथम अर्थशास्त्राच्या काही संकल्पना समजावून घ्याव्यात. अभ्यासाची सांगड शाश्वत विकास, लोकसंख्या. सामाजिक क्षेत्र, देशाची व राज्याची कृषी व्यवस्था व सहकार अशा मुद्द्यांशी घातल्यास तयारी परिपूर्ण होईल.

■ **सामान्य विज्ञान –** या घटकात जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व दैनंदिन जीवनात घडणाऱ्या विविध घटनांशी संबंधित प्रश्न विचारले जातात. यासाठी शालेय बोर्डाची पुस्तके उपयोगी ठरतात.

■ **पर्यावरण –** या घटकामध्ये पर्यावरणविषयक सामान्य मुद्दे, परिस्थिती, जैववैविध्य आणि हवामान बदल यासारख्या घटकांवर बारकाईने लक्ष ठेवून अभ्यास करावा लागतो.

■ **सामान्य अध्ययन पेपर –१** मधील विषयनिहाय घटकांच्या अभ्यासाचे योग्य नियोजन व उजळणी केल्यास तसेच योग्य आणि दर्जेदार साहित्याचा अभ्यास करून नोट्स काढल्यास अधिक फायदा होईल.

## पेपर २

राज्यसेवा पूर्व परीक्षेत सी–सॅट या पेपरचा २०१३ पासून समावेश कारण्यात आला आहे. यूपीएससी परीक्षेत सी–सॅटचे गुण फक्त पात्रतेसाठी ग्राह्य धरले जातात. एमपीएससी परीक्षेसाठी मात्र पेपर एक व पेपर दोनचे एकत्रित गुण ग्राह्य घातले जातात. त्यामुळे सी–सॅटच्या पेपरचे पूर्वपरीक्षेत जास्त महत्त्व आहे.

राज्यसेवा परीक्षेच्या अभ्यासक्रमात सी–सॅट विषयाचा उल्लेख पेपर क्र. २ असा केला आहे. सी–सॅट म्हणजे नागरी कौशल्य चाचणी.

## सी–सॅटचे स्वरूप

राज्यसेवा पूर्व परीक्षेत सी–सॅटच्या पेपर साठी २ तास वेळ असतो. यामध्ये एकूण ८० प्रश्न विचारलेले असतात. त्यासाठी एकूण २०० गुण असतात. एक प्रश्न हा अडीच गुणांचा असतो.

## सी–सॅटमधील समाविष्ट घटक

■ **आकलन कौशल्य –** यामध्ये आपल्याला काही उतारे दिलेले असतात उतारे वाचून विचारलेल्या प्रश्नांची अचूक उत्तरे देणे आवश्यक असते. ■ सर्वसामान्य बुद्धिमत्ता चाचणी ■ संवाद कौशल्यासह आंतरवैयक्तिक कौशल्ये ■ अनुमानात्मक चाचणी आणि विश्लेषणात्मक क्षमता ■ मूलभूत अंकगणित (संख्या, संख्यात्मक संबंध, घातांक इ.) ■ निर्णय प्रक्रिया आणि समस्या सोडवणूक ■ मराठी आणि इंग्रजी भाषेतील उताऱ्यावरील आकलनात्मक कौशल्ये (दहावी / बारावी स्तर)

## टीप

■ मराठी आणि इंग्रजी भाषेतील कौशल्य चाचणीसाठीचे प्रश्न अनुक्रमे मराठी आणि इंग्रजी भाषेतच असतील आणि त्यांचे भाषांतरित उतारे उपलब्ध नसतील.

■ सर्व प्रश्न वस्तुनिष्ठ असतील.

■ राज्यसेवा (पूर्व) परीक्षेच्या दोन्ही पेपरची उपस्थिती मूल्यांकनाच्या दृष्टीने अनिवार्य आहे. म्हणून उमेदवार दोन्ही पेपरला उपस्थित नसेल तर अपात्र ठरेल.

## सी–सॅटचा अभ्यास कसा करावा?


■ पूर्व परीक्षेत उत्तीर्ण व्हायचे असेल तर सी–सॅट कडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही. कोणतीही मॅच नेटमधील सरावाने जिंकता येते. त्यामुळे येथेही सरावातील सातत्य राखणे महत्त्वाचे ठरेल. ■ राज्यसेवा परीक्षेच्या दृष्टीने सी–सॅटचा पेपर सामान्य अध्ययनाइतकाच महत्त्वाचा आहे. अभ्यासक्रमात सी–सॅट पेपरची काठीण्यपातळी केंद्रीय लोकसेवा परीक्षेतील सी–सॅटपेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. ■ सी–सॅटला कोणत्याही पुस्तकांपेक्षा जुन्या प्रश्नपत्रिका जास्त महत्त्वाच्या ठरतील. त्याचे सविस्तर विश्लेषण केल्यानंतर कोणत्या प्रकारचे प्रश्न येतात, त्याची काठिण्यपातळी किती असते ते कळून येते. अभ्यासाची

सुरुवात आधीचे पेपर सोडवून करावी. त्यानुसार बाजारातील दर्जेदार साहित्य घेऊन सराव करावा.

### सी-सॅटचा अभ्यास किती वेळ?

हा अभ्यास दररोज दुपारी दोन ते पाच वाजण्याच्या दरम्यान केल्यास जास्त फायद्याचे होईल. कारण आयोगाचा पेपर याच कालावधीत असतो. सरावात सोप्या प्रश्नांकडून अवघड प्रश्नांकडे जावे. त्यामुळे अभ्यासादरम्यान सर्व प्रकारच्या काठीण्यपातळीचा सराव होईल.

पूर्व परीक्षेचा पेपर संपला की विद्यार्थ्यांना नेहमी पडणारा प्रश्न म्हणजे, आता काय करावे? याचे उत्तर आहे, मुख्य परीक्षेचा अभ्यास लगेच सुरू करावा. पूर्वपरीक्षेच्या बाबतीत वास्तव वर्णन करणारे एक वाक्य आहे ते म्हणजे 'पूर्वपरीक्षेचे काहीही महत्त्व नाही, पण पूर्वपरीक्षेशिवाय काहीही शक्य नाही.'



### मुख्य परीक्षा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सुधारित अभ्यासक्रमामध्ये सहा अनिवार्य विषयांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये मराठी व इंग्रजी भाषा पेपरचे पेपर १ स्वरूप वर्णनात्मक १०० गुण आणि पेपर २ - वस्तुनिष्ठ बहुपर्यायी १०० गुण अशा प्रकारे भाषा पेपरसाठी २०० गुण असतात. यासोबत सामान्य अध्ययनचे चार स्वतंत्र पेपर प्रत्येकी १५० गुणांसाठी असतात त्याचे स्वरूप वस्तुनिष्ठ बहुपर्यायी असते. मुख्य परीक्षा अशी एकूण ८०० गुणांची असते.

### सामान्य अध्ययन -१

या पेपरमध्ये इतिहास, भूगोल (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह आणि कृषी या घटकाच्या समावेशासह)चा समावेश असतो. या पेपरचा अभ्यास करताना आयोगाच्या मागील प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण करूनच अभ्यासाला सुरुवात करावी, इतिहास या घटकामध्ये आधुनिक, प्राचीन भारताचा इतिहास, महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह अभ्यासावा लागतो, यासाठी एनसीआरटी आणि शालेय पुस्तके उपयोगी ठरतील. भूगोल आणि कृषी घटकात प्राकृतिक भूगोल, आर्थिक भूगोल, हवामान, मृदा जल व्यवस्थापन यासारख्या प्रमुख घटकांचा समावेश होतो. यासाठी शालेय अभ्यासक्रमासाठी असलेली शासनाची अधिकृत पुस्तके उपयोगी ठरतील.

### सामान्य अध्ययन - २

भारतीय राज्यघटना आणि भारतीय राजकारण (महाराष्ट्राच्याा विशेष संदर्भासह ) आणि कायदे यावर भर दिला जातो. विद्यार्थ्यांनी या पेपरचा अभ्यास करताना भारतीय राज्यघटना, शासन रचना, प्रशासन, निवडणूक प्रक्रिया, महत्त्वाचे कायदे यासारखे घटक समजावून घेण्याचा प्रयत्न करावा. राज्यघटना घटक अभ्यास करताना डी.डी. बासू , लक्ष्मीकांत यांच्यासारख्यांची दर्जेदार पुस्तके उपयुक्त ठरतील.

### सामान्य अध्ययन -३

पेपर दोन घटकांमध्ये विभागला जातो. ज्यामध्ये मानवी साधनसंपत्ती विकास (एचआरडी) आणि मानवी हक्क (एचआर) याा घटकांचा समावेश असतो. विद्यार्थ्याने या पेपरचा अभ्यास करण्याआधी अभ्यासक्रमाचे स्वरूप समजावून घ्यावे. त्यानुसार अभ्यासक्रमात दिलेल्या घटकांचा अद्ययावत व चालू घडामोडींचा अभ्यास करणे अपेक्षित आहे. यातील उपघटक नीट समजावून घेण्यावर जास्त भर देण्यात यावा. एकंदर या घटकांच्या अभ्यासासाठी चालू घडामोडींच्या अभ्यासक्रमाशी सांगड घातल्यास हा पेपर सोपा जाईन.

### सामान्य अध्ययन - ४

पेपरमध्ये अर्थव्यवस्था आणि नियोजन हा एक घटक असतो. ज्यामध्ये विकासाचे अर्थशास्त्र, आर्थिक सुधारणा, उद्योग, सहकार, रोजगारनिर्मिती यासारखे घटक अभ्यासणे प्रामुख्याने आवश्यक असते. या घटकांचा अभ्यास करण्यासाठी अर्थशास्त्राच्या संकल्पना समजून घेण्यावर भर द्यावा.

विज्ञान आणि तंत्रज्ञान विकास यामध्ये संगणक तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान अवकाश तंत्रज्ञान, ऊर्जा आणि आणि आण्विक तंत्रज्ञान या उपघटकांचा विकास अभ्यासावा लागतो. विद्यार्थ्यांने घटकांमधील नवीन तंत्रज्ञानाचा विकास चालू घडामोडी व घटकांसोबत केल्यास अधिक फायदा होईल.

### प्रशासकीय कौशल्य

स्पर्धा परीक्षेचा अभ्यास हा दैनंदिन जीवनात उद्‌भवणाऱ्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी क्षमता विकसित करणारा असतो.

### स्वप्नपूर्ती

विद्यार्थ्यांनी पाहिलेल्या स्वप्नपूर्तीसाठी परीक्षेच्या तयारीत सातत्य ठेवावे, परंतु त्याला शिस्तबद्धतेची जोड हवी. अभ्यासाकरिता जे साहित्य वापरावयाचे ते विचारांना चालना देणारे हवे. स्वतःचे विचारक्षेत्र प्रगल्भ करणारे हवे.

**मुलाखत :** परीक्षेमधील अंतिम टप्पा म्हणजे मुलाखत. यासाठी १०० गुण असतात. मुलाखतीचा अगदी प्राथमिक उद्देश म्हणजे उमेदवाराचे व्यक्तिमत्व व विशिष्ट पदाला न्याय देण्याची क्षमता तपासणे होय. ज्या व्यक्तीकडे, राज्याच्या प्रशासनाची धुरा द्यायची आहे त्याची अनुकूलता, समयसूचकता इत्याची महत्त्वाच्या गुणांची चाचणी मुलाखतीत होते. त्यामुळेच उमेदवारांनी 'अधिकारी व्हावयाचे तर अधिकाऱ्यांसारखेच राहायचे' हे वाक्य नेहमी लक्षात ठेवावे.

**नागरी सेवा परीक्षा ही संयम आणि प्रयत्नांची पराकाष्ठा पाहणारी म्हणून ओळखली जाते. या परीक्षेच्या तयारिला सुनियोजित प्रयत्नांची जोड मिळाली तर यश मिळवणे अवघड नसते. स्वत:वर विश्वास ठेऊन आपले 'स्वॉट' (एस–स्ट्रेंग्थ, डब्ल्यू–विकनेसेस, ओ–अपॉर्च्युनिटी ॲण्ड टी–थ्रेट्स ) ॲनेलिसीस करून या परीक्षेच्या तयारीला लागले तर हमखास यश मिळवता येत असल्याचे सांगताहेत इंदापूर (जि.पुणे) येथील राहुल जावीर. २०१७ च्या नागरी सेवा परीक्षेत त्यांची आयएएस म्हणून निवड झाली आहे. यापूर्वी २०१६ च्या परीक्षेत भारतीय रेल्वे सेवेत (आयआरपीएस) देखील त्यांची निवड झाली होती. मात्र भारतीय प्रशासन सेवेत जाण्याच्या निर्णयावर ठाम राहत त्यांनी नियोजनबद्ध तयारी केली व आपले ध्येय साध्य केले.**

# इच्छाशक्तीला प्रयत्नांची जोड

यूपीएसी परीक्षेत यश मिळवणे म्हणजे खूप मोठे दिव्य आहे असा अनेकांचा समज असतो. किंबहुना ही परीक्षा खूप अवघड आहे. त्यासाठी खूप प्रयत्न व तासनतास अभ्यास करावा लागतो, असाही समज आहे. या परीक्षेची व्याप्ती पाहता असा समज असणे साहजिकच आहे. परंतु परीक्षेचे स्वरूप आपण समजून घेणे महत्त्वाचे आहे. परीक्षेमध्ये प्रामुख्याने काय विचारले जाते, उमदवाराकडून परीक्षा मंडळाच्या काय अपेक्षा आहेत, त्या तुलनेत आपली तयारी कुठपर्यंत झाली आहे हे समजून घेऊन अभ्यास केला तर यशाचा मार्ग सोपा होतो.



**राहुल जावीर** (भा.प्र.से), परिवीक्षाधीन अधिकारी, आसाम

ही परीक्षा किती अवघड वा सोपी आहे हे आपले आपणच सांगू शकतो. अभ्यासक्रम, परीक्षेचे स्वरुप आणि आयोगाच्या उमेदवारांकडून काय अपेक्षा आहेत हे समजून घेतले तर कळते की आपली तयारी किती आहे आणि आणखी किती तयारी करायला हवी. शिवाय आपल्याला शिकवणी वर्गाची गरज आहे की नाही हेदेखील कळते. खरं तर या परीक्षेच्या तयारीचा योग्य वेळी निर्णय घेऊन त्या दृष्टीने अभ्यास केला तर शिकवणी वर्गाची गरज भासत नाही.

## तयारी

आई शिक्षक असल्याने घरी शैक्षणिक वातावरण होते. १२ वी (विज्ञान शाखा) ला असतानाच यूपीएससीची तयारी करायचे मी ठरवले. त्या दृष्टीने माहिती मिळवली. ग्रामीण भागातील उमेदवारांना यापूर्वी या परीक्षेची माहिती करून घेणे व तयारीसाठी अडचणी येत असत. परंतु आता माहितीच्या युगात आपल्या मोबाईलवर, संगणकावर इंटरनेटच्या माध्यमातून सर्व माहिती एका क्लिकवर उपलब्ध होते.




गरज आहे ती फक्त तीव्र इच्छाशक्तीची. या परीक्षेची तयारी जेवढ्या लवकर सुरू करता येईल तेवढ्या लवकर सुरू करायला हवी. पुढे अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमादरम्यान मी या परीक्षेच्या तयारीलाही वेळ दिला. पुणे विद्यापीठात चांगला अभ्यास करता आला. स्वयं अध्ययन करून या परीक्षेत यश मिळवता आले. २०१६ च्या परीक्षेत आयआरपीएस ही सेवा मिळाली. मात्र भारतीय प्रशासकीय सेवेत दाखल होण्याच्या निर्णयावर मी ठाम होतो. त्या दृष्टीने पुन्हा अभ्यासाला लागलो. मुख्य परीक्षा व मुलाखतीच्या तयारीमध्ये कोठे कमी पडलो यावर आत्मचिंतन करून पुन्हा तयारीला लागलो. सातत्यपूर्ण अभ्यास आणि वेळेचे योग्य नियोजन यामुळे २०१७ च्या यूपीएससीच्या परीक्षेत मला ६११ रँकसह उत्तीर्ण होत माझे ध्येय गाठता आले.

## परीक्षा ज्ञानाची नव्हे व्यक्तिमत्त्व विकासाची


ही परीक्षा म्हणजे वैयक्तिक क्षमता चाचणी म्हणता येईल. यामध्ये अधिकारी म्हणून आपण विशिष्ट पदाला न्याय मिळवून देऊ शकतो का ते तपासले जाते. एखादा प्रश्न आपण कसा हाताळतो ते पाहिले जाते. तो सोडवण्यास आपण समर्थ आहोत की नाही ते तपासले जाते. आपली निर्णयक्षमता, युक्तीवाद, तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता, नेतृत्वगुण तपासले जातात. खरे तर पूर्व परीक्षेतील वस्तुनिष्ठ आणि मुख्य परीक्षेतील विश्लेषणात्मक प्रश्न तुमच्या ज्ञानाबरोबरच व्यक्तिमत्त्वाचा ठाव घेणारे असतात. त्यामुळे ही परीक्षा ज्ञानापेक्षा व्यक्तिमत्त्व विकासाची परीक्षा आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

आपण सर्व गोष्टींचा अभ्यास करतो. खूप संदर्भ वाचतो. अध्ययनविषयक सर्व तयारी आपण करतो. मात्र स्वत:मध्ये डोकावून पाहण्यास आपण विसरतो. आपल्याला स्वत:चीदेखील चांगली ओळख हवी. चौकटीबाहेर जाऊन वेगळा विचार करता यायला हवा.

## परीक्षकाशी संवाद

कुठल्याही परीक्षेत परीक्षकासमोर आपले उत्तर हेच आपले प्रतिनिधित्व करत असते. त्यामुळे मोजक्या शब्दांत समर्पक उत्तर परीक्षेत आणि मुलाखतीत देता आले पाहिजे. उत्तरपत्रिकेने परीक्षकाशी संवाद साधायला हवा. आपले म्हणणे व्यवस्थित मांडता यायला हवे.

## यशाची सूत्रे...


संग्रहित छायाचित्र

● स्वत:वर विश्वास हवा व तीव्र इच्छाशक्ती असावी. ● या परीक्षेची तयारी शक्य तितक्या लवकर सुरू करावी. १२ वी अथवा पदवी अभ्यासक्रमादरम्यान या परीक्षेची तयारी करता येईल.● पाया मजबूत हवा. ● संकल्पना स्पष्ट असाव्यात. ● वेळेचे काटेकोर नियोजन करावे. ● परीश्रम घेण्याची तयारी आणि संयम महत्त्वाचा. ● 'ऑउट ऑफ बॉक्स' जाऊन विचार करण्याची सवय लावावी. ● आपल्यातील नेतृत्वगुण विकसित करावा. ● परीक्षेसोबतच व्यक्तीमत्व विकासावरही भर द्यायला हवा. ● नियमित वृत्तपत्रीय वाचन करावे. ● आपल्या लिखाणात व बोलण्यात मुद्देसूदपणा आणण्याचा प्रयत्न करावा. ● स्वत:शी प्रामाणिक राहावे.

मुद्देसूद लिखाण आणि ओघवती शैली यासाठी त्यादृष्टीने अधिक सराव करायला हवा. उत्तराची मांडणी, कल्पकता, संदर्भ आदी बाबी आपले वेगळेपण सिद्ध करत असतात.

## वृत्तपत्र वाचन

स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्यांनी नियमित वृत्तपत्र वाचनाची सवय लावयला हवी. एक दिवसही चुकता कामा नये. एक दिवस चुकला म्हणजे एका दिवसात झालेल्या घडामोडींच्या माहितीला आपण मुकतो. याची मोठी किंमत आपल्याला परीक्षा किंवा मुलाखतीत चुकवावी लागू शकते. वृत्तपत्रीय वाचनामुळे स्वत:चे मत तयार होते. एक दृष्टिकोन तयार होतो. एखाद्या घटनेचे विविध पैलू समजून घेता येतात. एखाद्या विशिष्ट परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था टिकून कशी राहील या दृष्टीने आपले विचार आणि निर्णयक्षमता महत्त्वाची ठरते. या बाबींचा परीक्षेत मुलाखत आणि प्रश्नपत्रिका सोडवताना खूप उपयोग होतो.



## मुलाखत

मुलाखतीसंदर्भात अनेकांचे बरेच गैरसमज आहेत. मुलाखत आपल्याला ज्ञानाचा कस लावणारी नव्हे तर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा कस लावणारी असते. आपले ज्ञान आधीच पूर्व व मुख्य परीक्षेत तपासले जाते. त्यामुळे आपल्या ज्ञानाची परीक्षा घेण्यात पॅनलला रस नसतो. मुलाखत ही केवळ आपल्या व्यक्तिमत्त्व विकासाची असते. आपण विशिष्ट पदाला किती न्याय देऊ शकतो एवढेच तपासले जाते. त्यामुळे मुलाखतीत विचारले जाणारे प्रश्नदेखील आपले व्यक्तिमत्व तपासणारे असतात.

थोडक्यात आपण परीक्षा अर्जामध्ये जी वैयक्तिक, शैक्षणिक व इतर माहिती भरतो त्याभोवती आपली मुलाखत फिरते. त्यामुळे या परीक्षेच्या अभ्याससोबतच स्वत:चाही तेवढाच अभ्यास असावा. स्वत:मध्ये डोकावून पाहावे. आपण जे आहोत ते साध्या आणि सोप्या पद्धतीने समोर मांडता यायला हवे. आपल्या उत्तरांमध्ये भंपकपणा नसावा. कारण तो समोरच्यांच्या लगेच लक्षात येतो. त्यामुळे स्वत:शी प्रमाणिक राहायला हवे. त्याचबरोबर भाषेचा म्हणेच इंग्रजीचा बाऊ करण्याची मुळीच गरज नाही. आपण इंग्रजीतून मुलाखत देण्यास समर्थ असाल तर चांगलेच परंतु मराठीतही आपण मुलाखत देऊ शकतो. जी भाषा सोयीची असेल त्या भाषेत उत्तरे द्यायला हवी.

## पाया पक्का हवा

इमारत बांधताना त्या इमारतीचा पाया जेवढा मजबूतअसतो तेवढीच ती इमारत मजबूत असते. हेच सूत्र या परीक्षेलाही लागू आहे. आपल्या तयारीचा पाया जेवढा मजबूत तेवढे यश पक्के. १२ पर्यंतच्या पुस्तकांतून पाया पक्का होतो. बारावीपर्यंत आपला अभ्यास चांगला राहिला तर या परीक्षेची बरीचशी तयारी झालेली असते. त्यामुळे शालेय शिक्षणापासूनच यूपीएससी परीक्षेची तयारी आपण करत असतो असे समजण्यात हरकत नाही. हा पाया मजबूत असला की पुढील अभ्यास कठीण वाटत नाही. त्यामुळे या परीक्षेची तयारी करण्याचा निर्णय जेवढा लवकर घेणार तेवढी तयारी होत जाते. शैक्षणिक अभ्यासक्रम आपण ही परीक्षा लक्षात ठेवून करत असल्याने त्याचा खूप फायदा होतो. मूलभूत संकल्पना स्पष्ट असल्या की यशाचा मार्ग सुकर होतो.

## इच्छाशक्ती

कुठलेल्या शेत्रात मोठे यश मिळवायचे असेल तर इच्छाशक्ती खूप महत्त्वाची असते. या परीक्षेचेही तसेच आहे. यश मिळवायचे असेल तर तीव्र इच्छाशक्ती असणे आवश्यक आहे. इच्छाशक्तीला प्रयत्नाची जोड दिली तर यश मिळाल्याशिवाय राहत नाही. त्यामुळे तीव्र इच्छाशक्ती असणाऱ्या उमेदवारांनी नियोजनपूर्वक तयारी करून या परीक्षेला सामोरे जावे, यश नक्कीच मिळेल.

**शब्दांकन : राजाराम देवकर**



**महाराष्ट्राने २०१८ मध्ये विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली. या वर्षभरात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आपला ठसा उमटवला. अशा सर्व घडामोडींचा विस्तृत आढावा अभ्यासक, स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी व इतर सर्वांना उपयुक्त ठरेल.**

# असे होते २०१८

## जानेवारी २०१८

- राष्ट्रपुरुष तसेच थोर व्यक्ती यांची जयंती दरवर्षी मंत्रालय आणि राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात साजरी करण्यात येते. या वर्षीपासून संत सेवालाल महाराज जयंती (१५ फेब्रुवारी), संत गाडगे बाबा जयंती (२३ फेब्रुवारी), संत तुकडोजी महाराज जयंती (३० एप्रिल), स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती (२८ मे) आणि बिरसा मुंडा जयंती (१५ नोव्हेंबर) साजरी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.
- सांस्कृतिक संचालनालयातर्फे प्रतिवर्ष भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांच्या नावे शास्त्रीय संगीतासाठी दिला जाणारा पुरस्कार ज्येष्ठ गायिका माणिक भिडे यांना प्रदान करण्यात आला.
- अर्भक मृत्यू (० ते १ वर्ष) पाठोपाठ महाराष्ट्राचा बालमृत्यू (१ ते ५ वर्ष) दर २४ वरून २१ वर आला असून मागील वर्षापेक्षा तीन अंकांनी घट झाल्याची नोंद केंद्र शासनाच्या सॅम्पल रजिस्ट्रेशन सिस्टिम (एसआरएस) २०१६ च्या अहवालात नमूद केले आहे. या अहवालानुसार केरळ, तामिळनाडू पाठोपाठ महाराष्ट्राचा बालमृत्यू दर देशात कमी झाल्याचे नमूद केले आहे. आता बालमृत्यूबाबत २०१६ च्या अहवालात सर्वात कमी बालमृत्यू केरळ (११), तामिळनाडू(१९) त्यानंतर महाराष्ट्राचा (२१) क्रमांक येतो. संपूर्ण देशाचा बाल मृत्यू दर हा ३९ एवढा असून त्यामध्ये गेल्या वर्षीपेक्षा चार अंकांनी घट झाली आहे. सर्वाधिक बालमृत्यू मध्य प्रदेश (५५), ओडिशा (५०), आसाम (५२), छत्तीसगढ (४९), उत्तर प्रदेश (४७), राजस्थान (४५), कर्नाटक (२९), गुजरात (३३), दिल्ली (२२) अशी नोंद आहे. २०१३ मध्ये महाराष्ट्राचा बालमृत्यू दर २६ होता. २०१४ मध्ये २३, २०१५ मध्ये २४ आणि २०१६ मध्ये तो २१ वर आला आहे. यावरून राज्याच्या बालमृत्यूच्या दरात सातत्याने घट होत असल्याचे दिसून येत आहे. गेल्या तीन वर्षांत पाच अंकांनी घट झाली आहे.
- स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत देशात गेल्या तीन वर्षात ५ कोटींहून अधिक घरगुती शौचालये बांधण्यात आली आहेत. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात गेल्या तीन वर्षात ५० लाख ८ हजार ६०१ शौचालयांची उभारणी करण्यात आली. राज्यातील १६ जिल्हे व ३४ हजार गावे हागणदारीमुक्त म्हणून घोषित करण्यात आली आहेत. केंद्रीय पेयजल व स्वच्छता मंत्रालयाने देशाच्या ग्रामीण भागात स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत झालेल्या कामाचा अहवाल प्रसिद्ध केला.
- सर्वंकष आर्थिक विकासात देशात अग्रेसर राज्याचा मान महाराष्ट्राने मिळवला. ग्रोथ इनोव्हेशन लिडरशीप इंडेक्स फॉर इकॉनॉमिक डेव्हलपमेंट इन इंडिया याबाबत फ्रोस्ट सॉलिव्हॅन या जागतिक संघटनेच्यावतीने करण्यात आलेल्या संशोधनातून महाराष्ट्राला प्रथम क्रमांक मिळाला. देशातील २९ राज्यांचा १०० निर्देशकांच्या माध्यमातून संशोधन करण्यात आले.
- परळच्या पशू वैद्यकीय महाविद्यालयातील सहयोगी अधिष्ठाता डॉ. आशिष मोतीराम पातुरकर यांची नागपूर येथील महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या (माफ्सु) कुलगुरूपदी नियुक्ती करण्यात आली.
- महाराष्ट्राच्या वतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त राजपथावरील पथ संचलनात सादर केलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळा' या विषयावरील चित्ररथाला देशात पहिला क्रमांक मिळाला.




- वस्तू व सेवा निर्यातीत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले. देशाच्या एकूण वस्तू व सेवा निर्यातीमध्ये महाराष्ट्राचा वाटा २२.३ टक्के इतका आहे. देशाचा आर्थिक सर्वेक्षण पाहणी अहवाल २०१७ – २०१८ प्रकाशित करण्यात आला. या अहवालानुसार वस्तू व सेवा निर्यातीमध्ये देशातील महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू, तेलंगणा ही पाच राज्य अग्रेसर ठरली.
- महाराष्ट्रातील दारिद्र्य निर्मूलनाचा लढा आता अधिक तीव्र झाला असून, संयुक्त राष्ट्र संघाच्या सहकार्याने देशातील पहिली ॲक्शन रुम नियोजन विभागात स्थापन करण्यात आली. संयुक्त राष्ट्र


संघाच्या सहकार्याने नियोजन विभागात सुरू करण्यात आलेल्या ॲक्शन रूमचे उद्घाटन करण्यात आले.

### फेब्रुवारी २०१८

- अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या छत्रपती राजाराम महाराज उद्योजकता व कौशल्य विकास अभियानांतर्गत राबवण्यात येणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील उद्योजकांना भरघोस अर्थसाहाय्य करणाऱ्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट प्रकल्प कर्ज व्याज परतावा योजना, गट प्रकल्प कर्ज योजना, शेतकरी कुशल योजना या चार योजनांचा २ फेब्रुवारी २०१८ रोजी शुभारंभ करण्यात आला.
- एसटी महामंडळाच्या मुंबई सेंट्रल बसस्थानकातील महिला प्रसाधनगृहात सॅनिटरी नॅपकिनच्या स्वयंचलित यंत्राचा शुभारंभ.




- बडोदा येथे ९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरवण्यात आले. या वेळी सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवास पाटील, मराठी भाषा मंत्री विनोद तावडे, बडोद्याचे महापौर भरत डांगर, संमेलनाध्यक्ष लक्ष्मिकांत देशमुख, मावळते अध्यक्ष डॉ. अक्षयकुमार काळे, मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष श्रीपाद जोशी, स्वागताध्यक्ष श्रीमंत राजमाता शुभांगिनीराजे गायकवाड, साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष बाबा भांड, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते रघुवीर चौधरी उपस्थित होते.
- मुंबईजवळ असलेल्या घारापुरी (एलीफंटा) बेटाच्या विद्युतीकरणाचा लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या हस्ते २२





फेब्रुवारी रोजी झाला. सत्तर वर्षानंतर या बेटाला वीज पुरवठा झाला. देशात प्रथमच समुद्राखालून केबल टाकून बेटाचे विद्युतीकरण होऊ शकले.
- ग्रामीण भागातील किशोरवयीन मुलींना फक्त ५ रुपयांमध्ये ८ सॅनिटरी नॅपकीन देण्याची योजना ग्रामविकास विभागांतर्गत 'उमेद' अभियानामार्फत राबवण्याचा निर्णय, या योजनेचा लोगो, योजनेच्या अंमलबजावणीसाठी तयार करण्यात आलेले मोबाइल ॲप आणि डिजिटल अस्मिता कार्ड यांचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांच्या २२ फेब्रुवारी रोजी करण्यात आला.
- यंदाचा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांना,श्री. पु. भागवत स्मृती उत्कृष्ट प्रकाशन पुरस्कार पुणे येथील वरदा प्रकाशन यांना, डॉ. अशोक केळकर भाषा अभ्यासक पुरस्कार अविनाश बिनीवाले यांना आणि कविवर्य मंगेश पाडगावकर भाषा संवर्धक पुरस्कार मराठी विज्ञान परिषद संस्थेला मराठी भाषा गौरव दिनी प्रदान करण्यात आला.

### मार्च २०१८

- विज्ञान व तंत्रज्ञानात होत असलेला विकास विचारात घेता, मराठी भाषेचा अधिकाधिक वापर केला जावा या उद्देशाने भाषा संचालनालयाने, निवडक शब्दकोशांचा समावेश असलेला शासन शब्दकोश भाग-१ हा भ्रमणध्वनी उपयोजक (ॲप) तयार केला आहे. मराठी भाषा गौरव दिनी या शासन शब्दकोश : भाग-१ या भ्रमणध्वनी उपयोजकाचे लोकार्पण करण्यात आले.
- ग्रामविकास विभागामार्फत सुरू करण्यात आलेल्या अस्मिता योजनेचा महिला दिनी मुंबई विद्यापीठातील दीक्षांत सभागृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.
- कौटुंबिक अत्याचार, कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण यासारख्या अनेक अन्यायाला बळी पडणाऱ्या आणि त्यामुळे नैराश्यग्रस्त झालेल्या महिलांना मदत आणि मार्गदर्शनासाठी राज्य महिला आयोगाने 'सुहिता' या नावाची समुपदेशन हेल्पलाइन कार्यान्वित केली. कार्यालयीन वेळेत असणाऱ्या या हेल्पलाइनचा ७४७७७२२४२४ हा क्रमांक आहे.
- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या महाराष्ट्र शासन (Govt of Maharashtra) या जिओ चॅट चॅनलचे लोकार्पण करण्यात आले.
- राष्ट्रपतींच्या हस्ते ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, सिंधुताई सपकाळ व महिलांना आत्मनिर्भर बनवण्यात मोलाचे योगदान देणाऱ्या उर्मिला आपटे यांना उल्लेखनीय कार्यासाठी नारीशक्ती या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- व्यापार व उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी रामेश्वरलाल काबरा, बहुआयामी कलावंत मनोज जोशी, कलाक्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी तर प्रसिद्ध दिग्दर्शक सिसीर मिश्रा यांना कला व चित्रपट क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- ६५व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्काराची घोषणा करण्यात आली. सर्वोत्तम मराठी चित्रपटाचा मान 'कच्चा लिंबू' या चित्रपटाला मिळाला. याशिवाय धप्पा, म्होरक्या, पावसाचा निबंध आणि मयत हे मराठी चित्रपट विविध श्रेणींमध्ये सर्वोत्तम ठरले. दिवंगत

अभिनेते विनोद खन्ना यांना मानाचा दादासाहेब फाळके पुरस्कार तर दिवंगत अभिनेत्री श्रीदेवी यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार जाहीर करण्यात आला.

- राज्य शासनाच्यावतीने दिला जाणारा राज कपूर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद व राज कपूर विशेष योगदान पुरस्कार प्रसिद्ध दिग्दर्शक राजकुमार हिराणी यांना तर चित्रपती व्ही.शांताराम जीवनगौरव पुरस्कार प्रसिद्ध अभिनेते विजय चव्हाण आणि चित्रपती व्ही.शांताराम विशेष योगदान पुरस्कार प्रसिद्ध अभिनेत्री, दिग्दर्शिका मृणाल कुलकर्णी यांना घोषित करण्यात आला.

## एप्रिल २०१८

- संसदेचे वरिष्ठ सभागृह असणाऱ्या राज्यसभेत महाराष्ट्रातील ६ खासदारांनी सभागृहाच्या सदस्यपदाची शपथ घेतली. राज्यसभेचे सभापती तथा उपराष्ट्रपती एम. व्यंकय्या नायडू यांनी राज्यसभेच्या नवनिर्वाचित खासदारांना शपथ दिली. शपथ घेणाऱ्यांमध्ये महाराष्ट्रातून नवनिर्वाचित खासदार नारायण राणे, कुमार केतकर आणि व्ही. मुरलीधरन यांच्यासह पुन्हा राज्यसभेवर निवडून आलेले केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर, वंदना चव्हाण आणि अनिल देसाई यांचा समावेश आहे.



- गडचिरोली जिल्ह्याची प्रधानमंत्री मोदी यांच्या आकांक्षित जिल्ह्यांपैकी एक म्हणून निवड झाली. ती बदलून गडचिरोली जिल्हा प्रगतिशील करण्याचे उद्दिष्ट गाठायचे आहे. यासाठी ४० कोटीचा विशेष निधी यंदा नियोजन अंतर्गत देण्यात आला आहे.
- महावितरणच्या ग्राहकांना विविध सेवांची माहिती मिळावी. तसेच त्यांच्या तक्रारींचे निराकरण आठवड्यातील सातही दिवस व २४ तास करण्यासाठी महावितरणने टोल-फ्री क्रमांक उपलब्ध करून दिले. यासाठी ग्राहकांना १८००-१०२-३४३५ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.
- राज्य शासनाने २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून दहावीच्या अभ्यासक्रमातील विज्ञान विषयाच्या पुस्तकात अवयवदानाची माहिती देणारा पाठ समाविष्ट केला.
- आदिवासी विकास विभागाद्वारे तयार केलेल्या क्रेस्ट (Quality Evaluation for Sustainable Transformation) Office या नावीन्यपूर्ण, नियोजन व मूल्यमापन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. क्रेस्ट केंद्र ही देशातील पहिले शासकीय योजनांचे संनियत्रण, मूल्यमापन करणारे केंद्र असून यामुळे विकास योजनांची परिणामकारकता वाढवणे, उपलब्ध निधींचा योग्य वापर करणे, नावीन्यपूर्ण कार्यक्रम राबवणे यासाठी उपयुक्त ठरणार आहे. क्रेस्ट अंतर्गत आदिवासी उपयोजना (टीएसपी), केंद्रीय अर्थसाहाय्य आणि विशेष प्रकल्पांचे योग्य नियोजन आणि प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मोठे योगदान राहणार आहे. हे केंद्र आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेंतर्गत मुंबईत स्थापन केले असून, त्याचे मुख्य कार्यालय पुणे येथे आहे.




- सॉइल हेल्थ कार्ड योजनेंतर्गत देशात १२ कोटीहून अधिक मृदा आरोग्य अर्थात सॉइल हेल्थ कार्डचे वितरण करण्यात आले आहे. हे कार्ड वितरित करण्यात उत्तर प्रदेश देशात प्रथम स्थानावर तर महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर आहे. मध्यप्रदेश तिसऱ्या स्थानावर आहे. मृदा आरोग्य योजनेचा लाभ घेण्यात अहमदनगर जिल्ह्यातील शेतकरी राज्यात आघाडीवर आहेत. नाशिक हा जिल्हा दुसऱ्या स्थानावर असून बुलडाणा तिसऱ्या स्थानावर आहे.
- ग्रामपंचायतींना सशक्त करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उत्कृष्ट वापर केल्याबद्दल महाराष्ट्राच्या ग्रामविकास विभागाला राष्ट्रीय ई-पंचायत पुरस्काराने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार मध्य प्रदेशातील मंडला येथे आयोजित पंचायतराज दिन कार्यक्रमात देण्यात आला. पंचायत राज मंत्रालयाच्यावतीने डिजिटल इंडिया या कार्यक्रमांतर्गत हा पुरस्कार देण्यात आला. या श्रेणीतील पहिला पुरस्कार सिक्कीम राज्यास तर दुसरा पुरस्कार ओरिसा राज्यास मिळाला.

## मे २०१८

- अडचणीत सापडलेल्या महिलांना तत्काळ मदत पोहोचवण्यासाठी देशभर नव्याने १०० वन स्टॉप सेंटर उभारण्यास महिला व बाल कल्याण मंत्रालयाने मंजुरी दिली. महाराष्ट्रात वर्धा येथे असे सेंटर उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे. देशातील ९ राज्यांमध्ये नव्याने १०० वन स्टॉप सेंटर उभारण्यास मंजुरी दिली. महाराष्ट्रासह हरियाणा, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश, मिझोरम, नागालँड, ओरिसा, तामिळनाडू आणि उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये ही केंद्रे उभारण्यात येणार आहेत. महिलांविरोधातील हिंसा रोखण्यासाठी महिलांना एकाच ठिकाणी विविध सुविधा पुरवण्याच्या उद्देशाने ही केंद्रे उभारण्यात येतात. यामध्ये पोलीस साहाय्य, आरोग्य साहाय्य, मानसिक समुपदेशन, कायदेविषयक समुपदेशन आदी सुविधा पुरवल्या जातात. पीडित महिलेला ५ दिवस वास्तव्याची सुविधा याद्वारे पुरवण्यात येते.




- फ्लोरेंस नाइटिंगेल यांच्या जन्मदिन हा आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन म्हणून साजरा केला जातो. या वेळी आरोग्य क्षेत्रात अतुलनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना राष्ट्रीय फ्लोरेंस नाइटिंगेल

पुरस्काराने गौरवण्यात आले. मुंबईतील परळमधील बी.जे. वाडिया बाल रूग्णालयातील मेट्रन (मुख्य परिचारीका) श्रीमती आशा नरेंद्र महाजन यांना तर जळगाव जिल्ह्यातील कसोडा तालुक्याच्या एर्नाडोल येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिचारिका सहायक (एएनएम) शोभा माधव पाटील यांना त्यांच्या उत्कृष्ट कार्यासाठी या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

- आदिवासी विकास विभागाच्यावतीने मिशन शौर्य या मोहिमेत भारताचा झेंडा एव्हरेस्टवर लावण्यात आदिवासी विद्यार्थी विद्यार्थिनी यशस्वी ठरले आहेत. एकात्मिक आदिवासी प्रकल्प चंद्रपूर, जिल्हा प्रशासन चंद्रपूर आणि आदिवासी विकास



विभागाने आदिवासी विद्यार्थ्यातील नैसर्गिक काटक व धाडसीपणाला साद घालत मिशन शौर्यची आखणी केली. चंद्रपूर जिल्ह्यातील शासकीय आदिवासी आश्रमशाळा देवाडा येथील उमाकांत मडावी, प्रमेश आळे, मनीषा धुर्वे आणि शासकीय आदिवासी आश्रमशाळा जिवती येथील कविदास काठमोडे, विकास सोयाम या विद्यार्थ्यांनी माऊंट एव्हरेस्ट सर केले.
- हिमालयातील शिवालिक रेंजमधील १३ हजार ८०० फुटांवरील काळाकुट्ट भोवताल, उणे ८ अंश सेल्सियस तापमान आणि ताशी ३० ते ४० कि.मी. वेगाने वाहणारे वारे, तितक्याच वेगाने होणारी बर्फ वृष्टी, कडाडणाऱ्या विजा अशा पार्श्वभूमीवर मूळच्या सांगलीच्या व सध्या गोव्यात वास्तव्य करणाऱ्या उर्वी अनिल पाटील या १० वर्षाच्या मुलीने सरपास हे शिखर सर केले. एवढ्या लहान वयात सरपास सर करणारी ती पहिली महाराष्ट्रीय मुलगी ठरली.
- स्वच्छ सर्वेक्षण २०१८ चा निकालात महाराष्ट्र हे देशात स्वच्छतेच्या कामगिरीत दुसऱ्या क्रमांकाचे राज्य ठरले. महाराष्ट्रातील ९ शहरांना स्वच्छता पुरस्कार जाहीर झाला. देशात सर्वाधिक १० पुरस्कार महाराष्ट्राला मिळाले.
- महाराष्ट्र शासनाच्या रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाकडे प्राप्त सहितांचे पूर्वपरीक्षण करून योग्यता प्रमाणपत्र देण्यासाठी प्रचलित मंडळावरील अध्यक्ष व सदस्यांची फेरनियुक्ती करून मंडळाची पुनर्रचना करण्यात आली. या मंडळावर अध्यक्षपदी अरुण नलावडे यांची फेरनिवड करण्यात आली.
- अल्पसंख्यांक समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या 'मौलाना आझाद शिष्यवृत्ती' अंतर्गत गेल्या चार वर्षात महाराष्ट्रातील २४९ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळवली.

## जून २०१८

- केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात देशात गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (जीइएम) चा प्रभावी वापर करून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या राज्यांचा सन्मान करण्यात आला. यात महाराष्ट्राला बेस्ट बायर्स राज्याचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.
- वन विभागामार्फत जलयुक्त शिवार अभियानामध्ये मागील तीन वर्षांपासून मोठ्या प्रमाणात कामे करण्यात आल्याने वनातील जलव्याप्त क्षेत्रात ४३२ चौ.कि.मी.ची भरीव वाढ झाली. याची नोंद भारतीय वन सर्व्हेक्षण अहवाल २०१७ मध्ये देखील घेण्यात आली.
- बीड जिल्ह्यातील सावित्रीबाई फुले महिला बचतगट व चंद्रपूर जिल्ह्यातील वैष्णवी महिला बचतगटाला दिनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण आजिवीका मिशन अंतर्गत उत्कृष्ट कार्यासाठी राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- अमेरिकेतील जॉर्जटाऊन युनिव्हर्सिटी, इंडिया इनिशिटिव्ह आणि सेंटर फॉर इंटरनॅशनल स्टडीज यांच्याकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वॉशिंग्टन येथे आऊटस्टँडिंग लिडरशिप इन डेव्हलपमेंट हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.
- देशात राष्ट्रीय गोकुळ मिशन अंतर्गत दूध उत्पादनात सर्वाधिक प्रगती करणारे राज्य महाराष्ट्र ठरले. 'इंडिया टूडे' या नियतकालिकाच्या ग्रो समीटमध्ये महाराष्ट्राचा गौरव करण्यात आला.
- माता मृत्युदर कमी करण्यात महाराष्ट्राने देशभरात द्वितीय क्रमांक पटकावला. या कामगिरीसाठी महाराष्ट्राला पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. माता मृत्युदर कमी करण्यात केरळ राज्य देशात प्रथम आहे. महाराष्ट्राचा द्वितीय क्रमांक आहे, तर तिसऱ्या क्रमांकावर तामिळनाडू हे राज्य आहे. जागतिक आरोग्य संघटनेने भारताला वर्ष २०३० पर्यंत प्रत्येकी १००० गर्भवती महिलेमागे ७० पर्यंत मृत्यूदर कमी करण्याचे लक्ष्य दिले होते. केरळ राज्याने हा दर ४६ पर्यंत आणला आहे. महाराष्ट्राने हा दर ६१ पर्यंत आणला असून तामिळनाडू मध्ये हा दर ६८ आहे.
- युनेस्कोच्या जागतिक वारसा समितीच्या बहारिनमधील मनामा येथे ३० जून रोजी झालेल्या ४२ व्या परिषदेत, दक्षिण मुंबईतील व्हिक्टोरियन गॉथिक व कला वास्तूंचा (आर्ट डेको) समावेश जागतिक वारसा स्थळांच्या यादीमध्ये समावेश झाल्याची घोषणा करण्यात आली. राज्यात पाचव्या जागतिक वारसा स्थळाचा



समावेश होणार असून देशातील सर्वात जास्त वारसा स्थळांचा मान असलेले महाराष्ट्र हे एकमेव राज्य ठरले आहे. यापूर्वी अजंठा, एलिफंटा, वेरुळ व छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसची इमारत यांचा समावेश जागतिक वारसास्थळांच्या यादीत झाला आहे. या परिसराचा जागतिक वारसा यादीत समावेशामुळे देशातील या यादीत ३७ व्या स्थळाचा समावेश झाला आहे. सर्वात जास्त वारसा स्थळे असलेल्या देशांच्या जागतिक क्रमवारीत भारत ७ व्या क्रमांकावर आहे.

## जुलै २०१८

- लोकसभेत महाराष्ट्रातील पालघर लोकसभा मतदारसंघातून नव्याने निवडून आलेले खासदार राजेंद्र गावीत आणि भंडारा व गोंदिया लोकसभा मतदासंघातून निवडून आलेले खासदार मधुकरराव कुकडे यांनी शपथ घेतली.
- जळगाव येथील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला अहिराणी भाषेतील कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे नाव देण्याच्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयकाला विधानपरिषदेत सर्वपक्षीय सदस्यांनी एकमताने मंजुरी दिली.
- राज्य शासनाच्यावतीने संत साहित्यासाठी तसेच मानवतावादी कार्यासाठी दिला जाणारा २०१७-१८ चा ज्ञानोबा-तुकाराम पुरस्कार हा डॉ.किसन महाराज साखरे यांना घोषित करण्यात आला.

## ऑगस्ट २०१८

- ऊर्जा बचत व कार्यक्षमता क्षेत्रात नवी नाम मुद्रा उमटवत महाराष्ट्र देशात अग्रेसर राज्य ठरले. देशात ऊर्जा बचतीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊले उचलत निती आयोगाने प्रथमच राज्यांचा ऊर्जा कार्यक्षमता सज्जता निर्देशांक तयार केला. केंद्रीय ऊर्जा मंत्रालयांतर्गत कार्यरत ऊर्जा दक्षता ब्युरोच्या सहकार्याने देशातील सर्व राज्यांकडून माहिती संकलित करण्यात आली.



- राज्यातील पहिल्या मराठा वसतिगृहाचा कोल्हापूर येथे शुभारंभ
- 'स्वच्छ रेल स्वच्छ भारत' अहवालामध्ये महाराष्ट्रातील ३६ रेल्वे स्थानकांचा समावेश असून श्रेणी 'अ'-१ मध्ये वांद्रे रेल्वे स्थानकाने ७ वा क्रमांक पटकावत देशात पहिल्या १० मध्ये स्थान मिळवले. गुणांकनात सुधार झालेल्या रेल्वे स्थानकांच्या श्रेणी 'अ'-१ मध्ये मुंबई-सीएसटी स्थानकाने ९व्या तर दादर रेल्वे स्थानकाने १० व्या क्रमांकावर झेप घेतली.
- देशात राहण्यायोग्य आणि जगण्यायोग्य शहरांच्या यादीमध्ये (ईज ऑफ लिव्हिंग इंडेक्स) महाराष्ट्राने बाजी मारली असून पहिल्या दहा क्रमांकामध्ये अव्वल स्थानासह राज्यातील सर्वाधिक चार शहरांचा समावेश आहे. या यादीमध्ये पुण्याने



अव्वल क्रमांक तर नवी मुंबई आणि मुंबईने अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक पटकावला. या यादीत पहिल्या तिन्ही क्रमांकावर महाराष्ट्राने मोहोर उमटवली. त्यात पहिल्या तीन क्रमांकासह ठाणे (सहा), अमरावती (सोळा), वसई- विरार (वीस), नाशिक (एकवीस), सोलापूर (बावीस) या शहरांचा समावेश आहे.
- प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) ठाणे जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. राज्यातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या पहिल्या दोन तालुक्यांमध्ये कल्याण आणि भिवंडी या तालुक्यांचा समावेश आहे. मोठ्या प्रमाणात संख्येनुसार घरकुले पूर्ण करणाऱ्या पहिल्या दहा तालुक्यांमध्ये शहापूर तालुक्याने प्रथम क्रमांक मिळवला आहे.

## सप्टेंबर २०१८

- केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्यावतीने देण्यात येणाऱ्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार पुरस्कार - २०१८ (मनरेगा) अंतर्गत महाराष्ट्राला चार पुरस्कार जाहीर झाले. मुख्यमंत्र्याची महत्त्वाकांक्षी योजना 'जलयुक्त शिवार' व 'मागेल त्याला शेततळे' योजनेंतर्गत झालेल्या रोजगार निर्मितीची खास दखल घेण्यात आली.
- महाराष्ट्र बँकेला हिंदी भाषेत बँकेचे कामकाज उत्कृष्टपणे केल्याबद्दल द्वितीय क्रमांकाचा राजभाषा कीर्ती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- केंद्रीय कामगार व रोजगार मंत्रालयाच्यावतीने महाराष्ट्राला ६ राष्ट्रीय सुरक्षा पुरस्कार जाहीर.
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे देशातील विविध ठिकाणी मान्यवर व विद्यार्थ्यांशी संवाद साधून, 'स्वच्छता ही सेवा' अभियानाचा १५ सप्टेंबर रोजी शुभारंभ केला.
- लातूर आणि हिंगोली जिल्ह्यातील ३ शाळांना स्वच्छ विद्यालय या राष्ट्रीय पुरस्काराने, तर लातूर जिल्ह्याचा विशेष पुरस्काराने

सन्मान करण्यात आला.

- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने तयार केलेल्या 'आसरा' या मोबाइल ॲप्लिकेशनचा शुभारंभ.
- महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (महारेरा) अधिनियम – २०१६ च्या अंमलबजावणी करण्यामध्ये संपूर्ण देशात महाराष्ट्र राज्य अग्रेसर ठरले.
- झारखंड रांची येथून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'आयुष्मान भारत' प्रधानमंत्री जनआरोग्य योजनाचा राष्ट्रव्यापी शुभारंभ करीत व्हीडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून. तर मुंबईतील सह्याद्री अतिथिगृहात या योजनेचा राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला.




- क्रीडा क्षेत्रातील सर्वोत्तम कामगिरीसाठी महाराष्ट्र कन्या नेमबाज राही सरनोबत यांना अर्जुन पुरस्कार तर रुस्तम– ए– हिंद दादू दत्तात्रय चौगुले यांना ध्यानचंद पुरस्कार प्रदान करण्यात आला.
- अभिनेत्री रविना टंडन यांची संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या 'उद्यान राजदूत' म्हणून अधिकृत घोषणा.
- २९ सप्टेंबर २०१६ रोजी भारतीय सैन्य दलाने पाकिस्तान हद्दीत घुसून सर्जिकल स्ट्राईकद्वारे अतिरेक्यांचा खात्मा केला. त्यामुळे २९ सप्टेंबर हा दिवस भारतवासियांसाठी अभिमानाचा दिवस आहे. भारतीय सैन्याची ही अभिमानास्पद कामगिरी राज्यातील जनतेपर्यंत जावी तसेच माजी सैनिकांचा सन्मान व्हावा यासाठी राज्य शासनामार्फत २९ सप्टेंबर हा दिवस शौर्य दिन म्हणून साजरा करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.




- राज्य शासनातर्फे संगीत क्षेत्रात गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या नावाने दरवर्षी दिला जाणारा पुरस्कार यंदा ज्येष्ठ संगीतकार विजय पाटील ऊर्फ राम लक्ष्मण यांना घोषित करण्यात आला.

### ऑक्टोबर २०१८

- केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्यावतीने पुणे येथील सिंबॉयसिस विद्यापीठाला स्वच्छ व निरोगी परिसर ठेवण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी स्वच्छ कॅम्पस रँकिंग च्या प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तांत्रिक संस्था (निवासी) श्रेणीमध्ये सातारा जिल्ह्यातील कराड येथील कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस तथा अभिमत विद्यापीठाला सन्मानित करण्यात आले. या श्रेणीत एकूण १० पुरस्कार प्रदान करण्यात आले. या संस्थेला ५ व्या क्रमांकाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तांत्रिक महाविद्यालयांच्या श्रेणीमध्ये देशातील ५ महाविद्यालयांना सन्मानित करण्यात आले. यात नवी मुंबई येथील महात्मा गांधी मिशन वैद्यकीय महाविद्यालयाला तिसऱ्या क्रमांकाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपासून सुरू करण्यात आलेल्या स्वच्छ भारत अभियानाच्या निमित्ताने आता उघड्यावर बंद (खुले में बंद) हे अभियान भारतीय स्त्री शक्ती संस्थेने सुरू केले.
- संयुक्त राष्ट्रसंघाकडून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना 'चॅम्पिअन ऑफ दी अर्थ' पुरस्कार प्रदान करण्यात आला.
- विविध तालुक्यातील पर्जन्यमान, पीक परिस्थिती, भूजल पातळी आदींची माहिती एकत्रित करून त्याचे विश्लेषण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेऊन मदत व पुनर्वसन विभागाने महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटरच्या (एमआरएसएसी) मदतीने 'महामदत' या नवीन संकेतस्थळाची व ॲपची निर्मिती केली आहे.
- फळांचा राजा असलेल्या हापूस आंब्याला बौद्धिक संपदा कायद्यांतर्गत भौगोलिक मानांकन जाहीर झाले. केंद्रीय आद्योगिक धोरण व प्रोत्साहन विभागाने मानांकनाची अधिकृत घोषणा केली. देशातील ३२५ उत्पादनांना भौगोलिक मानांकन प्राप्त झाले आहे, यामध्ये महाराष्ट्रातील ३१ उत्पादनांचा समावेश आहे.



- एस.टी कर्मचाऱ्यांच्या मुलांना १२ वी नंतर उच्च शिक्षणासाठी सावित्रीबाई जोतिबा फुले शिष्यवृत्ती योजना महामंडळातर्फे सुरू करण्यात आली.
- राष्ट्रीय कौशल्य स्पर्धा २०१८ च्या विविध श्रेणींमध्ये महाराष्ट्राने उत्तम कामगिरी करत ९ सुवर्ण, ८ रजत आणि ६ कांस्य असे एकूण २३ पदक मिळवित अव्वल स्थान पटकाविले. या स्पर्धेत सर्वाधिक २३ पदक मिळवून महाराष्ट्र देशात अव्वल ठरला. ओडिशा २१ पदकांसह दुसऱ्या तर प्रत्येकी १६ पदक मिळवून कर्नाटक व दिल्ली तिसऱ्या स्थानावर राहिले.
- केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयाच्यावतीने देशभर राबवण्यात आलेल्या पोषण माह कार्यक्रमामध्ये उत्कृष्ट कार्यासाठी महाराष्ट्राला एकूण १४ राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाले. यात सर्वाधिक ५ पुरस्कार कोल्हापूर जिल्ह्याने पटकाविले.
- पत्रकारितेच्या क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी महाराष्ट्र शासनाच्यावतीने दिला जाणारा २०१६ आणि २०१७ सालीचा लोकमान्य टिळक जीवन गौरव पत्रकारिता पुरस्कार हा अनुक्रमे

दैनिक हितवादचे संपादक विजय फणशीकर आणि साप्ताहिक विवेकचे संपादक रमेश पतंगे यांना जाहीर करण्यात आला.

- ऊर्जा विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत उभारण्यात आलेले सौर ऊर्जा प्रकल्प, विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन्स व शेतकऱ्यांच्या कृषीपंपाला नवीन वीज जोडणी देण्याकरिता उच्चदाब वितरण प्रणाली (एचव्हीडीएस) या तीन अभिनव योजनांचा शुभारंभ १६ ऑक्टोबर रोजी करण्यात आला.
- सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे दिला जाणारा २०१८- १९ सालचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार ज्येष्ठ संगीतकार विजय पाटील ऊर्फ राम लक्ष्मण यांना गत वर्षीच्या गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार प्राप्त गायिका पुष्पा पागधरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.
- न्या. नरेश हरिश्चंद्र पाटील यांना २९ ऑक्टोबर रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश पदाची शपथ देण्यात आली.
- जागतिक बँकेने जाहीर केलेल्या व्यवसाय सुलभता (इझ ऑफ डुईंग बिझनेस) निर्देशांकामध्ये भारताने आजवरचे सर्वोच्च असे ७७ वे स्थान गाठले.
- स्वाईन फ्लूच्या रुग्णांवर प्राधान्याने करावयाच्या उपचारांसाठी मार्गदर्शक (प्रोटोकॉल) तत्त्वे तयार करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले.
- शिल्पकलेच्या माध्यमातून दिलेल्या बहुमूल्य योगदानासाठी ज्येष्ठ शिल्पकार पद्मविभूषण राम सुतार यांना २०१६ साठी टागोर सांस्कृतिक सौहार्द पुरस्कार जाहीर.
- देशातील मुंबई-गोवा या पहिल्या लक्झरी क्रुझ सेवेचा २० ऑक्टोबर रोजी शुभारंभ करण्यात आला. आंग्रीया नावाच्या या जहाजाला झेंडा दाखवून मुख्यमंत्र्यांनी या सेवेचा शुभारंभ केला. याबरोबरच मुंबईतील देशांतर्गत क्रुझ टर्मिनलचेही या वेळी उद्घाटन करण्यात आले.




## नोव्हेंबर २०१८

- राज्य शासनामार्फत देण्यात येणाऱ्या नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कारासाठी ज्येष्ठ अभिनेते जयंत सावरकर यांची तर संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कारासाठी ज्येष्ठ रंगकर्मी विनायक थोरात यांची निवड करण्यात आली.
- राज्यपालांचे निवासस्थान असलेल्या राजभवन, मुंबई येथे प्रत्येकी २२ टन वजनाच्या दोन ब्रिटिशकालीन तोफा सापडल्या.



- राज्यातील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांचे सेवा समाप्तीचे वय ६० वरून ६५ वर्षे करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.
- सौर ऊर्जेवर आधारित उपसा सिंचन हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आर्वी तालुक्यातील बोथली नटाळा व पिंपळगाव भोसले या दोन गावांत यशस्वीपणे राबवण्यात आला आहे. या अभिनव प्रकल्पासाठी चीनच्या युनॉन रिन्युएबल एनर्जी या कंपनीने सौर ऊर्जेवर आधारित यंत्रणा उपलब्ध करून दिल्यामुळे दोन्ही गावांत शंभर हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले. अशा प्रकारचा हा राज्यातील पहिला प्रकल्प ठरला.
- शारीरिक स्वास्थ आणि त्याचे आहाराशी असलेले नाते याबाबत संशोधन करून स्वत:ची पद्धती विकसित करणारे डॉ. जगन्नाथ दीक्षित यांची राज्य शासनाने स्थूलता नियंत्रण मोहिमेसाठी ब्रॅण्ड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे.
- केंद्र शासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय दिव्यांगजन पुरस्कार-२०१८ ची घोषणा करण्यात आली. नागपूरची आंतरराष्ट्रीय जलतरणपटू कांचनमाला पांडे देशातील सर्वोत्कृष्ट दिव्यांग खेळाडू ठरली. नाशिकचा स्वयं पाटील यास देशातील सर्वोत्कृष्ट सृजनशील बालकाचा पुरस्कार जाहीर झाला.
- आदिवासी विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या अटल आरोग्य वाहिनी व कायापालट अभियान या योजनेचे उद्घाटन व लोकार्पण.
- महाराष्ट्राने आर्थिक क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीसाठी इंडिया टुडे समूहाच्यावतीने स्टेट ऑफ स्टेट्स पुरस्काराने गौरवण्यात आले.
- महाराष्ट्रातील ५०३ ठिकाणी एकाचवेळी १८ नोव्हेंबर रोजी महावॉकेथॉन रॅलीची सुरुवात करण्यात आली. संपूर्ण महाराष्ट्रात एकूण ५ लाख ७ हजार ३६७ नागरिकांनी महावॉकेथॉन २०१८

मध्ये सहभाग घेतला. याची नोंद लिम्काबुक ऑफ रेकॉर्डने घेतली.

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना 'न्यूज २४ या वृत्तवाहिनीकडून 'यंग लीडर ऑफ द ईयर' हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे.
- राज्य शासनातर्फे २०१८ साठीचा भारतरत्न पं.भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ बासरी वादक पं. केशव गिंडे यांना जाहीर.
- महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशांकरिता जागांचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे आणि पदांचे आरक्षण विधेयक, २०१८ विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात एकमताने मंजूर झाले.
- स्टार्ट अपमध्ये महाराष्ट्र हे देशामध्ये प्रथम क्रमांकावर असून आतापर्यंत देशात सुरू झालेल्या १० हजार ९४९ स्टार्टअप पैकी २ हजार १३० स्टार्टअप एकट्या महाराष्ट्रात सुरू झाले आहेत.
- प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंमलबजावणीत राज्य देशात पहिल्या क्रमांकावर आहे.
- राज्य विधानसभेच्या उपाध्यक्षपदी विजय भास्करराव आवटी यांची निवड.

## डिसेंबर २०१८

- एचआयव्ही एड्सविषयी माहिती देणारे 'समाधान ॲप'चे उद्घाटन.
- शेतकऱ्यांच्या उत्पादनाला चांगला भाव मिळावा तसेच शेतकऱ्यांना त्यांची उत्पादने थेट कॉर्पोरेट कंपन्यांना किंवा थेट बाजारात विकता यावीत यासाठी राज्य शासनाने जागतिक बँकेच्या साहाय्याने हाती घेतलेल्या 'स्मार्ट' प्रकल्पाचा शुभारंभ.
- मार्केट रिसर्चसाठी जागतिक पातळीवर प्रसिद्ध असलेल्या फ्रॉस्ट ॲण्ड सॅलिव्हन कंपनीच्यावतीने दिला जाणार इंडिया मॅन्युफॅक्चरिंग एक्सलन्स वार्ड महाराष्ट्राला जाहीर झाला आहे. फ्रॉस्ट ॲण्ड सॅलिव्हन कंपनीने केलेल्या सर्वेक्षणात 'मॅन्युफॅक्चरिंग कॉँपिटेटिव्ह' इंडेक्समध्ये म्हणजे उत्पादन करण्यासाठी उपयुक्ततेच्या मानांकनात महाराष्ट्राने देशात प्रथम स्थान मिळवले.
- 'खेलो इंडिया-२०१९' शालेय क्रीडा स्पर्धेचे यजमानपद महाराष्ट्राला.
- जीत प्रकल्पाच्या माध्यमातून क्षयरोगमुक्त महाराष्ट्राचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जास्तीत जास्त क्षय रुग्णांना वेळेवर व संपूर्ण उपचार घेण्यास प्रवृत्त करण्यात येत आहे. राज्यातील १३ शहरांमध्ये हा प्रकल्प राबवण्यात येईल. राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत 'जीत' प्रकल्पाच्या उद्घाटन करण्यात आले.




- मुंबई येथील विशबेरी कंपनीच्या सहसंस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंका अग्रवाल यांना निती आयोगाचा मानाचा 'वुमेन ट्रान्सफॉर्मिंग पुरस्कार' प्रदान करण्यात आला.
- जागतिक बँकेच्या अहवालानुसार १९० देशांच्या अर्थव्यवस्थांमध्ये देशाने पहिल्या शंभरात स्थान मिळवले आहे. १७० वरून देशाचा क्रमांक ७७ वर पोहोचला आहे.
- 'राज्यांची स्टार्टअप रँकिंग २०१८' जाहीर करण्यात आली. या रँकिंगमध्ये महाराष्ट्र राज्य उद्योन्मुख राज्य ठरले. केंद्र शासनाच्या 'स्टार्टअप इंडिया' या कार्यक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्रीय औद्योगिक धोरण व प्रोत्साहन विभागाच्यावतीने घालून दिलेल्या निकषानुसार राज्या-राज्यांमध्ये स्पर्धा आयोजित करण्यात आली. यासाठी केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री यांनी ६ फेब्रुवारी २०१८ मध्ये 'स्टार्टअप रँकिंग २०१८' कार्यक्रमाची सुरुवात केली.



- आदिवासी भागात बांबूच्या माध्यमातून रोजगार निर्मितीची नवी दालने उपलब्ध करून देणाऱ्या राज्यातील चंद्रपूर येथील पहिल्या बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्रास 'स्कॉच ॲवार्ड २०१८' च्या सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात आले.
- भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीदिनी सह्याद्री अतिथिगृह येथे महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळांतर्गत राज्यातील १३ भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते डिजिटल पद्धतीने शुभारंभ करण्यात आला.
- राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांसाठी १ जानेवारी २०१६ पासून सातवा वेतन आयोग लागू करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.
- महाराष्ट्र केसरी विजेता बाला रफिक शेख हे ठरले.
- नंदुरबार या आकांक्षित जिल्ह्याने आरोग्यक्षेत्रात चांगली कामगिरी केली असल्यामुळे या जिल्ह्यात कुपोषणामध्ये घट झाल्याचे निती आयोगाने जाहीर केलेल्या आकांक्षित जिल्ह्यांच्या क्रमवारीमध्ये पुढे आले.

**संकलन : गजानन पाटील,** उपसंपादक

# राजपथावर महाराष्ट्राची छाप





'वंदे मातरम' च्या सुरात १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनाचा इतिहास जिवंत करणारा महाराष्ट्राचा चित्ररथ ७० व्या प्रजासत्ताकदिनी राजपथावरील पथसंचलनाचे आकर्षण ठरला. देशप्रेमाने ओतप्रोत 'वंदे मातरम..'ची धून आणि 'करेंगे या मरेंगे', 'भारत छोडो' अशा घोषणांच्या निनादात 'भारत छोडो' आंदोलनाचे सादरीकरण करणारा ३५ कलाकारांचा राज्याचा चित्ररथ.

## ऐतिहासिक क्षण

या प्रजासत्ताक दिनापासून ब्रिटिश मार्शल धूनऐवजी, प्रथमच भारतीय मार्शल धून 'शंखनाद' वाजवण्यात आली. भारतीय लष्करासाठी ही धून नागपूर येथील धरमपेठ महाविद्यालयाच्या संगीताच्या प्राध्यापिका डॉ. नाफडे यांनी संगीतबद्ध केली आहे.

औरंगाबाद येथील देवगिरी महाविद्यालयाचा कॅडेट सागर मुगले याला राजपथावरील १४४ सदस्यीय एनसीसी पथकाचे नेतृत्व करण्याचा मान मिळाला. राज्यातील २२ कॅडेट्स पथसंचलनात सहभागी झाले.



R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट
हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई - ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह